सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. ३ जानेवारी २०२६ | वर्ष – ३ रे | अंक २६७ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### डोंबिवलीत भाजपची सातवी जागाही बिनविरोध

**मुंबई :** डोंबिवलीत भाजपची सातवी जागा देखील बिनविरोध. डोंबिवलीच्या प्रभाग क्रमांक २७ ड मधील उमेदवार महेश पाटील हे बिनविरोध विजयी. विशेष म्हणजे या ठिकाणी मनसेचे शहर अध्यक्ष मनोज घरत हे महेश पाटील यांच्या विरोधात लढत होते. मात्र आज मनोज घरत यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने महेश पाटील हे बिनविरोध विजयी झाले. मनसेचे नेते माजी आमदार राजू पाटील यांनी हात मिळवणी केली का? राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे.

### मुंबईत मनसेला मोठं भगदाड

**मुंबई :** वांद्रे येथील मनसेच्या बालेकिल्ल्यात पक्षाला मोठे खिंडार पडलं. प्रभाग क्रमांक ९७ आणि ९८ मधील तब्बल ११ प्रमुख पदाधिकाऱ्यांनी आपल्या पदाचे राजीनामे दिले आहेत. उद्धव ठाकरे यांच्या 'मशाल' चिन्हावर उमेदवार रिंगणात उतरवल्याने पक्ष निर्मितीपासून निष्ठावंत राहिलेले मनसैनिक नाराज झाले. यातूनच त्यांनी तडकाफडकी राजीनामा दिला. या बंडाचा मनसेला मोठा फटका बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे. राजीनामा देणाऱ्या या पदाधिकाऱ्यांनी गेल्या १९ वर्षे ९ महिन्यांपासून राज ठाकरे यांच्या खांद्याला खांदा लावून काम केलं आहे. मनसेच्या स्थापनेपासून पक्षाशी एकनिष्ठ राहिलेल्या या सैनिकांनी अचानक राजीनामे दिल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

### एकाचं जागेसाठी दोन पक्षांकडून उमेदवारी

**पुणे :** पिंपरी चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीत भलतंच घडलंय. एकाचं जागेसाठी दोन पक्षांकडून उमेदवारी मिळालेले दोन उमेदवार रिंगणात आहेत. प्रभाग क्रमांक २० 'ब' आणि ३० 'अ' जागेवर हा पेच निर्माण झालाय. नीलम म्हात्रे यांना प्रभाग २० मधील ब जागेसाठी शरद पवार राष्ट्रवादी आणि ठाकरे शिवसेनेकडून एबी फॉर्म घेतले. तसेच संदीप गायकवाड यांना प्रभाग ३० मधील 'अ' जागेसाठी शरद पवार राष्ट्रवादी आणि शिंदे शिवसेनेनं ही एबी फॉर्म घेतले.

### नाशिकमध्ये शहराध्यक्षलाच ठेवलं डांबून

**नाशिक :** महापालिका निवडणुकीत तिकीट नाकारल्याच्या कारणातून विविध राजकीय पक्षांमधील अंतर्गत कलह चव्हाट्यावर येऊ लागला आहे. नाशिकमध्ये भारतीय जनता पक्षात उमेदवारी वाटपावरून मोठा उद्रेक बघायला मिळाला. निष्ठावंतांना डावलल्याच्या रागातून संतप्त पदाधिकाऱ्यांनी नाशिकचे शहराध्यक्ष सुनील केदार आणि मंडलाध्यक्ष शांताराम घंटे यांना नाशिकरोड येथील पक्ष कार्यालयात चक्क डांबून ठेवले. या घटनेमुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, पोलिसांच्या हस्तक्षेपानंतर दोघांची सुटका करण्यात आली. गेल्या तीन वर्षांपासून पक्षासाठी अहोरात्र काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना डावलून, ऐनवेळी पक्षात आलेल्यांना आयारामांना 'एबी' फॉर्म दिल्याचा आरोप नाराज इच्छुकांनी केला. यानंतर भाजपमधील हा असंतोष उफाळून आला आहे. नाशिकरोडच्या सहा प्रभागांतील २३ जागांसाठी भाजपकडे १८४ इच्छुकांनी उमेदवारी मागितली होती.

### पनवेलमध्ये भाजपचा बिनविरोध धमाका

**नवी मुंबई :** राज्यातील अनेक महापालिका निवडणुकीत भाजपने बिनविरोध उमेदवार विजयी करण्यात यश मिळवलं आहे. त्यामध्ये, कल्याण डोंबिवलीतून भाजपने खातं खोलल्यानंतर आता ठाणे, भिवंडी, अहिल्यानगर आणि आता पनवेल महापालिकेतही मोठ्या संख्येने उमेदवार बिनविरोध केले आहेत. पनवेल महानगरपालिकेत महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला असून पनवेल महापालिका निवडणुकासाठी आज अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या दिवशी ७ उमेदवारांनी आपला अर्ज माघारी घेतला आहे.

### वंचितच्या तालुका अध्यक्षाकडून आत्मदहनाचा प्रयत्न

**अमरावती :** अमरावतीच्या दर्यापूर तहसीलमध्ये वंचितच्या तालुका अध्यक्षाकडून आत्मदहनाचा प्रयत्न. हातात पेट्रोलची बॉटल घेऊन वंचितचा पदाधिकारी पोहोचला तहसीलमध्ये. पोलीस प्रशासनाच्या सतर्कतेमुळे आत्मदहनाचा प्रयत्न टाळला. चंदू रायबोले असं आत्मदहन करण्यासाठी आलेल्या वंचितच्या पदाधिकाऱ्याचे नाव आहे.

### नाशिकमध्ये भाजपची बंडखोरी रोखण्यासाठी गिरीश महाजन मैदानात

**नाशिक :** नाशिकमध्ये भाजपातील अंतर्गत बंडखोरी रोखण्यासाठी संकटमोचक मानले जाणारे मंत्री गिरीश महाजन यांनी आता नाशिकमध्येच तळ ठोकला आहे. विधानसभा निवडणुकीच्या उमेदवारी अर्ज माघारीचा आजचा शेवटचा दिवस असल्याने भाजपसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. नाशिकमधील विविध मतदारसंघांत पक्षाच्या अनेक अधिकृत उमेदवारांविरुद्ध कार्यकर्त्यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केल्याने महायुतीसमोर पेच निर्माण झाला आहे. या बंडखोरांची मनधरणी करण्यासाठी गिरीश महाजन स्वतः मैदानात उतरले आहेत. विशेष म्हणजे, सुधाकर बडगुजर आणि मुकेश शहाणे यांच्या माध्यमातून मध्यस्थी करून ही बंडखोरी शमवण्याचे मोठे आव्हान महाजन यांच्यासमोर आहे.

# अर्ज मागे घेण्यावरुन मनसे पदाधिकाऱ्याची हत्या

**सोलापूर :** महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सोलापुरात राजकीय वादातून भाजपमधील दोन गटात टोकाचा वाद झाल्याच चित्र पाहायला मिळालं. महापालिका निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी चांगलाच राडा झाला. सोलापुरातील जोशी गल्ली परिसरातील भाजपचे माजी नगरसेवक शंकर शिंदे यांचे संपर्क कार्यालय भाजपच्याच दुसऱ्या गटाने फोडले. आपल्या समर्थक उमेदवारास उमेदवारी न मिळाल्याच्या करणावरून दुसऱ्या गटाने कार्यालय फोडल्याचा आरोप करण्यात आला. यावेळी, पोलिसांनी मोठा बंदोबस्त लावून हस्तक्षेप केला. मात्र, येथील राड्यातच एका तरुणाची हत्या करण्यात आल्याची धक्कादायक



घटना उघडकीस आली आहे.

दरम्यान, या घटनेनंतर महापालिका परिसरातील घटनास्थळी पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात आहे.

## भाजपच्या दोन गटात राडा

सोलापूर शहरात राजकीय वादातून एकाची हत्या करण्यात आली असून बाळासाहेब सरवदे असे हत्या झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. मनसे विद्यार्थी सेनेचे पदाधिकारी असलेल्या बाळासाहेब सरवदे यांची राजकीय वादातून हत्या झाल्याचा आरोप केला जात असून या घटनेनं परिसरात खळबळ उडाली आहे.

सोलापूर महापालिका प्रभाग २ मध्ये अर्ज माघारी घेण्यावरून आज भाजपच्या दोन गटात वाद झाला. प्रभाग दोनमध्ये शालन शिंदे ह्या भाजपच्या अधिकृत उमेदवार आहेत, तर त्यांच्याविरोधात भाजपच्या बंडखोर रेखा सरवदे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता.

रेखा सरवदे यांनी अर्ज माघारी घ्यावा यासाठी शिंदे आणि सरवदे या दोन गटात मोठा वाद झाला, या वादात भाजप नेते शंकर शिंदे यांचे कार्यालय देखील फोडण्यात आले. मात्र, त्याचवेळी शिंदे गटाच्या लोकांनी मध्यस्तीसाठी आलेल्या बाळासाहेब सरवदे यांच्यावर जीवघेणा हल्ला केल्याचा आरोप सरवदे यांच्या नातेवाईकांनी केला आहे.

या हल्यात गंभीर जखमी झालेल्या बाळासाहेब सरवदे यांना उपचारासाठी सोलापूरच्या सहकारी रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मात्र, उपचारा दरम्यान त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती डॉक्टरांनी दिली. या घटनेनंतर शहरात तणावाचे वातावरण असून पोलिसांनी मोठा बंदोबस्त तैनात केला आहे.

सोलापुरातील मनसेच्या नेत्याचा गंभीर आरोप

दरम्यान, प्रभाग २ मधून भाजप आमदार विजयकुमार देशमुख यांचे पुत्र किरण देशमुख हे निवडणुकीच्या रिंगणात आहेत. हे संपूर्ण पॅनल बिनविरोध करण्यासाठी भाजपकडून मोठा दबाव होता, त्यामुळे सरवदे कुटुंबावर भाजप नेत्यांकडून दबाव आणला जातं होता. समाजात वाद नको म्हणून ते सोडवायला मनसे नेते बाळासाहेब सरवदे गेले होते. त्यावेळी शिंदे गटातील लोकांनी त्यांची हत्या केल्याचा आरोप मनसेचे पदाधिकारी प्रशांत इंगळे यांनी केला आहे. मनसेचे लोकसभा क्षेत्र प्रमुख प्रशांत इंगळे यांनी हा गंभीर आरोप केला आहे.

# भाजप आज प्रचाराचा नारळ फोडणार

## मुख्यमंत्री फडणवीसांचा इचलकरंजीत रोड शो, रवींद्र चव्हाणांची कोल्हापुरात पदयात्रा

**कोल्हापूर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज (३ जानेवारी) महायुतीच्या उमेदवारांचा प्रचार करण्यासाठी इचलकरंजी दौऱ्यावर असणार आहेत. आज दुपारी मुख्यमार्गावर फडणवीस यांचा रोड शो होणार असल्याची माहिती भाजप आमदार राहुल आवाडे यांनी दिली. हा रो शो राजश्री छत्रपती शाहू महाराज पुतळा येथून होणार आहे. त्यानंतर शिवतीर्थ, शंभूतीर्थ, महात्मा गांधी पुतळा राजवाडा चौक या मार्गावर हा रोड शो होणार आहे. त्याच ठिकाणी या रोड शोची सांगत होणार आहे. या दौऱ्याचे नियोजन करण्यासाओठी भाजप कार्यालयामध्ये बैठक पार पडली. या बैठकीसाठी संघटन मंत्री मकरंद देशपांडे, प्रदेश उपाध्यक्ष सुरेश हाळवणकर, माजी मंत्री प्रकाश आवाडे आदी उपस्थित होते.





दरम्यान, कोल्हापूर महानगरपालिका निवडणुकीसाठी सुद्धा भाजपचा आज प्रचार शुभारंभ होणार आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष झाल्यानंतर रवींद्र चव्हाण यांचा पहिल्यांदा कोल्हापूर दौरा असल्याने त्यांच्या स्वागताची तयारी कार्यकर्त्यांकडून सुरू आहे. कोल्हापूर आणि इचलकरंजी अशा दोन ठिकाणी प्रचाराचा शुभारंभ या निमित्ताने होणार आहे. रवींद्र चव्हाण कोल्हापूरमध्ये आगमन झाल्यानंतर अंबाबाई दर्शन घेणार आहेत. त्यानंतर त्यांची पदयात्रा होणार आहे. कोल्हापूर तसेच इचलकरंजी मनपात आपलाच महापौर व्हावा, यासाठी प्रयत्नशील आहे. जागा वाटपामध्ये कोल्हापूरमध्ये भाजपाच मोठा भाऊ ठरला आहे. भाजपच्या वाट्याला ३६ जागा असून शिवसेना शिंदे गट ३० जागा लढवत आहे, तर राष्ट्रवादी १५ जागांवर निवडणुकीच्या रिंगणात आहे.

कोल्हापूरमध्ये महायुतीमध्ये एकमत झाला असून ८१ जागांमध्ये भाजप मोठा भाऊ आहे. भाजप ३६ जागांवर निवडणूक लढवणार असून शिवसेना ३० जागांवर निवडणूक लढवणार आहे, तर राष्ट्रवादी काँग्रेसला १५ जागा मिळाल्या आहेत. कोल्हापूरमध्ये तिरंगी लढत होणार असल्याचे स्पष्ट झालं आहे. कोल्हापूरमध्ये महाविकास आघाडीमध्ये फुट झाली असून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने तिसऱ्या आघाडीसोबत हातमिळवणी केली आहे.



**सातारा :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि ज्येष्ठ लेखिका व विचारवंत डॉ. मृदुला गर्ग यांच्या हस्ते '९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलना'चे उदघाटन संपन्न झाले. यावेळी मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, मंत्री जयकुमार गोरे, संमेलनाध्यक्ष विश्वास पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते.



# खासगी बसला ताम्हिणी घाटात भीषण अपघात

**रायगड :** रायगड जिल्ह्यातील माणगाव इथं ताम्हिणी घाटात एका खासगी बसला भीषण अपघात झाला आहे. शुक्रवारी दुपारी ही घटना घडली. एका तीव्र वळणावर हा अपघात झाला. यावेळी खासगी बसने एका कारला देखील उडवलं आहे. यामुळे ही कार रस्ता ओलांडून झाडीत अडकून बसली. या अपघातात २७ प्रवासी जखमी झाले असून यातील आठ ते दहा प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, ही बस आज सकाळी साडे अकराच्या सुमारास पुण्यातील भोसरी परिसरातून निघाली होती. बसमध्ये भोसरी येथील सावन आयबी ॲटो प्रा. लिमिटेड कंपनीचे ५० कर्मचारी होते. हे सर्वजण काशिद बीचला फिरायला जात होती. दरम्यान, शुक्रवारी दुपारी ही खाजगी बस ताम्हीणी घाटात आली असता एका तीव्र वळणावर चालकाचं बसवरील नियंत्रण सुटलं.

ही बस रस्त्यावरून खाली उतरली आणि बाजुच्या खडकाळ भागाला जाऊन धडकली. यावेळी या बसने एका कारला देखील उडवलं. ही अपघात ग्रस्त कारही रस्ता ओलांडून एका झाडीत जाऊन अडकली. या अपघातात २७ प्रवासी जखमी झाले असून ८ ते १० जण गंभीर जखमी झाले आहेत. सर्व जखमींना उपचारसाठी माणगाव उपजिल्हा रुग्णालयला पाठवण्यात आले आहे.

हा अपघात ताम्हिणी घाटातील प्रसिद्ध 'गारवा हॉटेल' परिसरात झाला. तीव्र वळणावर चालकाचे नियंत्रण सुटल्याने बस रस्त्याच्या कडेला असलेल्या डोंगरावर जाऊन आदळली. बस दरीत कोसळली असती तर मोठा अनर्थ घडला असता, मात्र डोंगराला धडकल्यामुळे बस थांबली. या धडकेचा वेग इतका प्रचंड होता की बसमधील प्रवासी जागीच जखमी झाले आणि बसचेही मोठे नुकसान झाले आहे.

# साईचरणी ८० लाखांचा मुकुट अर्पण

**शिर्डी :** जगभरातील कोट्यवधी भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या शिर्डीच्या साईबाबांच्या चरणी नववर्षाच्या पहिल्याच दिवशी दानाचा वर्षाव झाला आहे. साईबाबांच्या चरणी नववर्षाच्या पहिल्याच दिवशी एका दानशूर भाविकाने सुमारे ८० लाख रुपये किमतीचा सुवर्ण मुकुट अर्पण केला आहे.

या दानामुळे शिर्डीत नववर्षाचा उत्साह द्विगुणित झाला असून, या आकर्षक मुकुटाची सध्या भाविकांमध्ये मोठी चर्चा आहे. हरियाणा राज्यातील फरीदाबाद येथील एका साईभक्ताने बाबांना अत्यंत देखणा आणि मौल्यवान असा सुवर्ण–हिरेजडीत मुकुट अर्पण केला आहे. या मुकुटाची एकूण किंमत सुमारे ८० लाख रुपये आहे. यामध्ये अंदाजे ५८५ ग्रॅम शुद्ध सोन्याचा वापर करण्यात आला आहे. मुकुटाची शोभा वाढवण्यासाठी त्यात सुमारे १५३ कॅरेटचे मौल्यवान हिरे जडवण्यात आले आहेत. मुकुटाचे एकूण वजन ६५५ ग्रॅम इतके आहे. हरियाणातील फरीदाबाद येथील साईभक्त प्रदीप मोहंती आणि प्रतिमा मोहंती यांनी हा मुकुट बाबांच्या चरणी अर्पण केला. साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांच्याकडे हा मुकुट सुपूर्द करण्यात आला. यावेळी संस्थानच्या वतीने मोहंती दांपत्याचा सत्कार करून त्यांचे आभार मानण्यात आले.



# पुण्यात भाजपचे दोन उमेदवार बिनविरोध

**पुणे :** राज्यभर अनेक ठिकाणी बिनविरोध नगरसेवक निवडून आणण्याचा सपाटा लावणाऱ्या भाजपने पुण्यातही खातं खोललं आहे. प्रभाग क्रमांक ३५ सनसिटी माणिक बाग येथून भाजपच्या उमेदवार मंजुषा नागपुरे आणि ३५ ड मधून श्रीकांत जगताप हे दोन उमेवदार बिनविरोध निवडून आले आहेत. यानंतर भाजप कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष सुरू केला.





राज्याचं लक्ष लागलेल्या पुणे महापालिका निवडणुकीसाठी भाजप वि. दोन्ही राष्ट्रवादी वि. शिंदेंची शिवसेना वि. काँग्रेस–ठाकरेंची शिवसेना अशी चौरंगी लढत पाहायला मिळणार आहे. कोणत्याही परिस्थितीत पुण्याची सत्ता कायम ठेवण्यासाठी भाजपने कंबर कसली आहे. तर अजित पवारांनीही पुणे महापालिकेवर पुन्हा एकदा वर्चस्व मिळवण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

अर्ज माघार घ्यायच्या शेवटच्या दिवशी विरोधी उमेदवारांनी अर्ज माघारी घेतल्यामुळे प्रभाग क्रमांक ३५ मधून मंजुषा नागपुरे या बिनविरोध निवडून आल्या आहेत. या प्रभागात एकूण सहा अर्ज दाखल झाले होते. त्यापैकी दोन अर्ज छाननीमध्ये बाद झाले, तर इतर तीन जणांनी त्यांची उमेदवारी मागे घेतली. त्यामुळे मंजुषा नागपुरे या बिनविरोध निवडून आल्या. यानंतर भाजपच्या कार्यकर्त्यांनी जोरदार जल्लोष केला. तर दुसरीकडे प्रभाग ३५ ड या सर्वसाधारण जागेसाठी नितीन गायकवाड यांनी अर्ज मागे घेतल्याने त्या ठिकाणी भाजपचे श्रीकांत जगताप हे बिनविरोध निवडून आले.

# ३० वर्षांनंतर ऐतिहासिक अध्यात्मिक–सांस्कृतिक महोत्सव

**तभा वृत्तसेवा,**

**छत्रपती संभाजीनगर– दि.२ :** छत्रपती संभाजीनगरमध्ये ३० वर्षांनंतर एका मोठ्या आध्यात्मिक–सांस्कृतिक उपक्रमाचे स्ट्रॅटेजिक आयोजन करण्यात येत असून, श्री खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत पार्श्वनाथ मंदिर यांच्या वतीने ६ ते १२ जानेवारी २०२६ या कालावधीत सात दिवसीय 'दिव्य योग साधना शिबीर' आणि भव्य सांस्कृतिक महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. ऐतिहासिक शहराच्या सामाजिक–सांस्कृतिक ब्रँड व्हॅल्यूला बळकटी देणारा हा उपक्रम बीड बायपासवरील जबींदा ग्राऊंड येथे संपन्न होणार आहे.

हा महोत्सव परमपूज्य आचार्यश्री शांतीसागरजी गुरुदेव यांच्या आचार्य पदारोहन शताब्दी वर्षानिमित्त तसेच तीर्थरक्षा शिरोमणी आचार्य आर्यनंदीजी महाराज यांच्या २५ व्या समाधी वर्षानिमित्त आयोजित करण्यात आला आहे. गणाधिपती गणधराचार्य श्री कुंथुसागरजी गुरुदेव यांच्या मंगल सान्निध्यात आणि राष्ट्रसंत आचार्य श्री गुणधरनंदीजी गुरुदेव यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम होईल. हरिद्वारचे योगगुरू स्वामी रामदेव बाबा योग साधनेचे सत्र घेणार असून, दररोज सकाळी ६ ते ९ योग शिबीर आणि सायंकाळी ६ ते १० सांस्कृतिक कार्यक्रम होतील. महोत्सवाचे प्रमुख आकर्षण म्हणजे पद्मभूषण डॉ. वीरेंद्र हेगडे यांचा भव्य नागरी सत्कार. शिक्षण, आरोग्य व ग्रामीण विकासातील त्यांच्या दीर्घकालीन योगदानाची औपचारिक दखल यावेळी घेतली जाणार आहे. महोत्सवात खुशबू जैन, अंकित जैन, अनूप जलोटा, अनुराधा व कविता पौडवाल, डॉ. कुमार विश्र्वास यांच्यासह अनेक नामवंत कलाकारांचे सादरीकरण होणार आहे. कर्नाटक व राजस्थानचे राज्यपाल, केंद्रीय व राज्य मंत्र्यांच्या उपस्थितीमुळे या कार्यक्रमाचे सामाजिक महत्त्व अधिक दृढ होणार आहे.

## सात दिवसीय दिव्य योग साधना शिबीराचे आयोजन



CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## आस्थापनांनी मासिक विवरणपत्र ३१ जानेवारीपूर्वी ऑनलाईन सादर करावीत

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २ जानेवारी :** सर्व शासकीय व खाजगी आस्थापनांना कार्यरत मनुष्यबळाची माहिती दर्शविणारे त्रैमासिक विवरणपत्र ईआर-१ प्रत्येक तिमाही संपल्यानंतर ३० दिवसांच्या आत ऑनलाईन सादर करणे सेवायोजन कार्यालये रिक्तपदे सक्तीने अधिसुचित करणारा अधिनियम १९५९ व त्याअंतर्गत नियमावली १९६० नुसार बंधनकारक असल्याने विवरणपत्र तात्काळ सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. केंद्र व राज्य शासन, अंगिकृत उद्योग, व्यवसाय, महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषद, पंचायत समिती, महापालिका, नगरपालिका, तसेच खाजगी क्षेत्रातील आस्थापनांना ईआर-१ विवरणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. सेवायोजन कार्यालय वेबपोर्टलवर नियोक्त्यांच्या लॉगइन मध्ये ईआर-१ सादर करताना पोर्टलवर एम्प्लॉयर (लिस्ट अ जॉब) वर क्लीक करुन एम्प्लॉयर लॉगइन मध्ये युजर आयडी व पासवर्ड वापरुन लॉगईन करुन डॅशबोर्डवरील ईआर-१ ऑप्शनवर क्लीक करावे, त्यानंतर एंटर ईआर-१ वर क्लीक करुन तिमाही विवरणपत्र ईआर-१ ऑनलाईन सादर करता येईल.

याचा वापर करुन ३१ जानेवारी, २०२६ अगोदर ईआर-१ विवरणपत्र सादर करावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त निशांत सूर्यवंशी यांनी केले आहे.



# भाजपचे वेगाने होणारे ‘काँग्रेसीकरण’ घातकच !

## जनसंघापासून पक्षाशी एकनिष्ठ असणाऱ्यांनाही उमेदवारीपासून वंचित ठेवल्याचा जाहीर आरोप

**त.भा. वृत्तसेवा/श्रीधर स्वामी**

**लातूर, २ जानेवारी :** राज्यात महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने भाजपमधील अंतर्गत बंडाळी मोठ्या प्रमाणात बाहेर पडताना दिसतेय. भाजपमध्ये उमेदवारी वा अन्य लाभाच्या पदांसाठी प्रवेश करणाऱ्यांना तिकिटे देऊन निष्ठावंतांवर हेतुतः अन्याय केल्याच्या भावना संतप्त कार्यकर्त्यांतून व्यक्त होत आहेत. माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे यांना भाजपने उमेदवारी नाकारताच त्यांनी तात्काळ भाजपचा त्याग करून राष्ट्रवादी काँग्रेसशी हातमिळवणी करून उमेदवारी मिळविली. हे ज्वलंत उदाहरण महत्वाचे असून भाजपाचे वेगाने होणारे ‘काँग्रेसीकरण’ भविष्यात भाजपासाठी अत्यंत घातक ठरणार असल्याच्या प्रतिक्रिया जनमाणसातून व्यक्त होताना दिसत आहेत. हे तर काहीच नाही, जनसंघापासून भाजपशी एकनिष्ठ असणाऱ्यांनाही उमेदवारीपासून वंचित ठेवण्यात आल्याचा जाहीर आरोपही केला जात आहे.

निवडणूक म्हटले की, शह-काटशह ओघाने आलाच. युद्धात आणि प्रेमात सर्व काही क्षम्य असते, असेही म्हटले जाते. आताच्या परिस्थितीत निवडणुकीच्या काळात काहीही केले तरी ते क्षम्यच समजले जावे, अशीच जणू भाजपच्या वरिष्ठ नेत्यांची मानसिकता बनत गेल्याचे निदर्शनास येत आहे. विरोधी पक्ष चहुबाजूने संपविण्याचा भाजप नेत्यांचा हा प्रयत्न लोकशाहीसाठी धोकादायक असल्याच्या भावनाही व्यक्त होताना दिसत आहेत. लोकशाही खऱ्या अर्थाने जिवंत ठेवण्यासाठी प्रबळ विरोधी पक्ष अस्तित्वात असणे महत्वाचे आहे. दुर्दैवाने भाजपच्या काही नेतेमंडळींकडून विरोधकांनाच या ना त्या कारणावरून जाळ्यात ओढण्याचे काम शिस्तबद्धरीत्या सुरु आहे.

भाजपच्या नेत्यांनी अवलंबलेला हा पायंडा राज्याच्या राजकारणात अन्य कोणत्याही राजकीय पक्षाच्या नेत्यांनी अवलंबला नसल्याचेही बोलले जात आहे. यात बऱ्यापैकी तथ्य असल्याचेही पाहावयास मिळते. मनपा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अनेक प्रमुख कार्यकर्त्यांनी या पक्षातून त्या पक्षात, त्या पक्षातून या पक्षात अशा कोलांटउड्या मारल्या. कोणत्याही निवडणुकीच्या काळात असे प्रकार मागच्या काही वर्षात सर्रास होताना दिसत आहेत. निवडणुकीच्या कालावधीत केले जाणारे अशा प्रकारचे पक्षांतर कोणत्याही राजकीय पक्षासाठी लाभाचे ठरेलच असे नाही.

लातूरचे माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत उदगीरमध्ये भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला होता. मात्र, याचा लक्ष्मण कांबळेंना लातूर मनपा निवडणुकीत भाजपकडून उमेदवारी नाही मिळताच त्यांनी लगेच भाजपचा त्याग करून अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश मिळवून उमेदवारी दाखल केली. हा प्रकार कोणीही आपल्या स्वार्थाच्या राजकारणास सध्यस्थितीत प्राधान्य देत असल्याचेच दर्शवणाराआहे. अशा कार्यकर्त्यांना आपल्या पक्षात प्रवेश देताना सर्वच राजकीय पक्षाच्या नेत्यांनी दहादा विचार केला पाहिजे. आपल्या पक्षात येणाऱ्यांची संख्या वाढत आहे, हे दाखवण्यासाठी भाजप अथवा अन्य कोणत्याही प्रमुख राजकीय पक्षाने कोणाला प्रवेश द्यायचा आणि कोणाला नाही? यावरहीविचार मंथन करणे आजघडीला गरजेचे वाटते.

लातूर मनपाच्या निवडणुकीत सगळ्यात जास्त बंडाळी भाजपमध्ये झाली. भाजपमध्ये निवडणूक प्रमुख पदावरून कोणतेही कारण न देता डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांना बाजूला केले गेले. लातूरला अजिबात वेळ न देणाऱ्या पालकमंत्री भोसले यांना निवडणूक प्रभारी केले गेले. तर संभाजी पाटील निलंगेकर यांना निवडणूक प्रमुख पद दिले गेले. पक्षाच्या या कृतीने सुशिक्षित समाजात अतिशय चुकीचा संदेश गेल्याचे पदोपदी जाणवत आहे. पक्षाची ही कृती भाजपच्या अनेक प्रभागातील उमेदवारांना पराभवाच्या गर्तेत टाकू शकते, असाही मतप्रवाह व्यक्त होताना दिसला.

त्यातच जे कार्यकर्ते वर्षानुवर्षे भाजपशी एकनिष्ठ आहेत, अशांना हेतुतः टाळून अगदी काल परवापर्यंत जी मंडळी अन्य राजकीय पक्षात राहून भाजपाला शिव्या घालायची, अशा मंडळींना उमेदवारी बहाल करण्यात आल्याची उदाहरणे आहेत. अर्थात हा प्रकार भाजपच्या आगामी वाटचालीसाठी लाभदायक नाही. मात्र ज्या नेत्यांच्या हाती पक्षाची सूत्रे आहेत, त्यांच्या लक्षात हा प्रकार येत नाही, हे खरे दुर्दैव आहे. अगदी जनसंघापासून भाजपशी निगडित असणाऱ्यांनाही यावेळच्या निवडणुकीत उमेदवारी दिली गेली नसल्याचे पाहावयास मिळाले आहे. अशा मंडळींनी भाजप बंडखोर म्हणून नव्हे तर भाजप निष्ठावंत म्हणून अपक्ष या नात्याने निवडणुकीच्या आखाड्यात उतरण्याचा निर्णय घेतला आहे. निवडून आल्यानंतर पुन्हा भाजपसोबत राहण्याचा मनोदयही काहींनी व्यक्त केला आहे. त्यामुळे या निवडणुकीत लातुरात प्रत्यक्षात काय घडणार? याबद्दल आजच ठामपणे सांगणे अवघड झाले आहे. मागच्या काही वर्षात भाजपने आपली कार्यप्रणाली पूर्णतः बदलली आहे. व्यावसायिक राजकारण करण्यास प्राधान्य देणाऱ्या भाजपचे वेगाने होणारे ‘काँग्रेसीकरण’ पक्षासाठी घातक असल्याने भाजप नेत्यांनी वेळीच सावध व्हावे, अन्यथा फार उशीर झालेला असेल अशा भावना निष्ठावंत भाजप कार्यकर्त्यांतून व्यक्त होताना दिसत आहेत.



## पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांचा तपासणी दौरा

**लातूर, २ जानेवारी :** नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप हे वार्षिक परीक्षण, तपासणी व प्रशासकीय आढाव्याच्या अनुषंगाने आठ दिवसांच्या अधिकृत दौऱ्यावर लातूर जिल्ह्यात उपस्थित आहेत. या दौऱ्याचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणून पोलीस मुख्यालय, बाभळगाव, लातूर येथील प्रशस्त मैदानावर लातूर जिल्हा पोलीस दलाची भव्य परेड तसेच विविध विशेष पथकांची प्रात्यक्षिके आयोजित करण्यात आली होती. या परेडचे परीक्षण उमाप यांनी केले. परेडचे संचालन पोलीस अधीक्षक अमोल तांबे व अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांनी अत्यंत शिस्तबद्ध, काटेकोर व नियोजनबद्ध पद्धतीने केले. परेडमध्ये सहभागी पोलीस अधिकारी व अंमलदारांनी आपली शिस्त, एकात्मता, शारीरिक क्षमता, प्रशिक्षणाची गुणवत्ता व कर्तव्यनिष्ठा यांचे प्रभावी दर्शन घडविले.

परेडनंतर लातूर जिल्हा पोलीस दलाकडून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या विविध विशेष पथकांची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. यामध्ये मॉब डिसपर्सल पथक, किट परेड, लाठी ड्रिल, स्कॉड ड्रिल, वाद्य पथक, बॉम्ब शोधक व नाशक पथक तसेच श्वान पथक यांचा समावेश होता. आपत्कालीन परिस्थिती, जमाव नियंत्रण, दंगल नियंत्रण, दहशतवादी कारवाया तसेच संशयास्पद साहित्याच्या शोध व नाशासाठी पोलीस दल किती सज्ज, सक्षम व प्रशिक्षित आहे, याचे सविस्तर व प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांद्वारे सादरीकरण करण्यात आले.

या वार्षिक परीक्षण दौऱ्याच्या निमित्ताने लातूर जिल्ह्यात सेवेत कार्यरत तसेच सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्यासाठी स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

या स्नेहसंमेलनात पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पोलीस दलातील अधिकारी व अंमलदारांशी मुक्त संवाद साधत त्यांच्या वैयक्तिक, कौटुंबिक तसेच सेवासंबंधी अडचणी जाणून घेतल्या. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा अनुभव प्रशासनासाठी मौल्यवान असून, त्याचा योग्य लाभ घ्यावा, असे मत व्यक्त करत उपस्थित प्रश्न व समस्यांवर तातडीने उपाययोजना करण्याचे स्पष्ट निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

## एमआयडीसीतील बांधकाम अट शिथील करण्याची व्यापारी संघाची मागणी

### उद्योग राज्यमंत्र्याचा सकारात्मक प्रतिसाद

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २ जानेवारी :** राज्यभर सर्वच एमआडीसीमध्ये एक एकर किंवा त्यापेक्षा कमी जागा असलेल्या भूखंड धारकांना ४० टक्के बांधकामाची अट टाकण्यात आली असून ही अट जाचक असल्याचे मराठवाडा व्यापारी महासंघाचे सल्लागार ॲड. संतोष गिल्डा यांनी उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून याचा राज्यातील सर्वच छोट्या व्यावसाईकांना लाभ होणार आहे. सरकारने लोकल फॉर व्होकल ही योजना अस्तित्वात आणल्यानंतर व स्वदेशी व्यावसायीकांना प्राधान्य दिल्यानंतर एमआयडीसीतील छोट्या व्यापार्यांना ज्यांच्याकडे एक एकरपेक्षा कमी भूखंड आहे अशांना ४० टक्के बांधकाम बंधनकारक केले आहे. छोटे व्यापारी असल्यामुळे कमी भांडवलात व्यवसाय सुरू करताना एवढ्या मोठ्या प्रमाणावर बांधकाम करणे व्यापार्यांना अडचणीचे होत असल्याचे मराठवाडा व्यापारी महासंघाचे सल्लागार संतोष गिल्डा यांनी लक्षात आणून दिल्यानंतर त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याने राज्यातील छोट्या व्यावसायीकांना त्याचा लाभ होणार आहे.



राज्याचे उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक हे लातूर येथे एका खाजगी कार्यक्रमासाठी आले होते. यावेळी त्यांना लातूरसह राज्यातील व्यवसायीकांच्या अडी-अडचणीबाबतची चर्चा मराठवाडा व्यापारी महासंघाचे सल्लागार ॲड. संतोष गिल्डा यांच्यासह अन्य व्यावसायीकांसोबत झाली. यावेळी छोट्या व्यावसायीकांना येत असलेल्या अडचणींबाबत व व्यवसाय वाढी संदर्भात सकारात्मक चर्चा झाल्यानंतर तसेच केंद्र व राज्याचे धोरण स्वदेशी व्यावसायीकांना प्रोत्साहन देणारे असल्याने छोटे-मोठे व्यावसायीक आपआपल्या एमआयडीसीमध्ये नवनवीन प्रयोग तयार करत आहेत. त्यातून रोजगार उपलब्ध होत असल्याने बेरोजगारी दूर होण्यास मदत होते आहे. व्यवसायाला लागणारे भांडवल व मशनरीचा खर्च हे कर्ज रूपाने घेतल्यानंतर व्यावसायीक हा आर्थिक अडचणीतून आपला व्यवसाय करत असताना त्याला एमआयडीसीत ४० टक्के बांधकाम करण्याची अट टाकल्याने व्यवसायातील भांडवल कमी होते शिवाय अनेक आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. ही गोष्ट मराठवाडा व्यापारी संघाच सल्लागार ॲड. संतोष गिल्डा यांनी उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या लक्षात आणून दिल्यानंतर त्यांनीही या संदर्भात आपण योग्य तो पर्याय उपलब्ध करून असे आश्वासन दिल्याने लातूरसह महाराष्ट्रातील एमआयडीसीतील छोट्या व्यावसायीकांना याचा फायदा होणार आहे.

## प्रशिक्षणास अनुपस्थित कर्मचाऱ्यांना बजावल्या नोटीस

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १ जानेवारी :** लातूर शहर महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने मतदान प्रक्रियेतील अधिकारी - कर्मचाऱ्यांसाठी नुकतेच प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणास अनुपस्थित राहणाऱ्या २६५ अधिकारी - कर्मचाऱ्यांना नोटीस बजावणयता आल्या आहेत.

मनपा निवडणुकीसाठीचे हे प्रशिक्षण सराव सिद्धेश्र्वर व रत्नेश्र्वर देवस्थानच्या सभागृहात आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणास अनुपस्थित राहणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना निवडणूक नियमानुसार नोटीस बजावण्यात आली आहे. नोटीस देण्यात आल्यानंतर संबंधित अधिकारी - कर्मचाऱ्यांकडून समाधानकारक खुलासा प्राप्त न झाल्यास कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची व फौजदारी स्वरूपाची कारवाई केली जाणार असल्याचे मनपा उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यांनी दिली.

## आज अराजपत्रित सेवा संयुक्त पूर्वपरीक्षा

**लातूर, २ जानेवारी :** महाराष्ट्र गट- ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२५ रविवार, ४ जानेवारी, २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी १२ वाजेपर्यंत एक सत्रामध्ये परीक्षा आयोजित करण्यात आलेली आहे. लातूर जिल्ह्यातील २७ उपकेंद्रावर ही परीक्षा आयोजित केलेली असून परीक्षा कालावधीमध्ये परीक्षा केंद्राच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर परीक्षार्थी येणार आहेत. त्यामुळे परीक्षा कालावधीत परीक्षा कालावधीत परीक्षा केंद्रावर व परिसरात गर्दीमुळे कोणताही अनुचित प्रकार घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये, यासाठी भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये या परीक्षा केंद्राच्या १०० मीटरच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

परीक्षा केंद्राच्या परिसरात प्रवेश करतेवेळी परिक्षार्थी व्यतिरिक्त पाचपेक्षा जास्त व्यक्ती एकत्रितरित्या प्रवेश करणार नाहीत. कोणत्याही प्रकारच्या घोषणा देण्यात येणार नाहीत. परीक्षा केंद्राच्या परिसरात परीक्षार्थी अथवा अन्य व्यक्तीकडून शांततेस बाधा निर्माण होईल, असे कृत्य करण्यात येणार नाही. १०० मीटरच्या परिसरातील झेरॉक्स सेंटर्स, पानटपरी, टायपींग सेंटर, ध्वनिक्षेपक इत्यादी माध्यमे आदेशाची मुदत संपेपर्यत बंद राहतील. परीक्षा केंद्राच्या परिसरात मोबाईल फोन, सेल्युलर फोन, ई-मेल व इतर प्रसारमाध्यमे घेवून प्रवेश करण्यास मनाई असेल.

## पोषक आहार हीच क्षयरोग मुक्तीची त्रिसुत्री : डॉ. गायकवाड

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २ जानेवारी :** सध्या भारतात प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियान अंतर्गत केंद्र सरकरने क्षयरोगमुक्त भारत करण्यासाठी क्षयरोगाचे उच्चाटनाचे



नियोजन केलेले आहे. या अनुषंगाने १ जानेवारी, २०२६ रोजी नवीन वर्षाच्या सुरुवातीस लातूर परिमंडळाच्या उपसंचालक डॉ. रेखा गायकवाड यांनी निक्षयमित्र बनून ५५ क्षयरुग्णांना दत्तक घेवून त्यांच्या पोषणाची जबाबदारी घेतली.

तसेच आहार किट देण्यासाठी परिमंडळातील सर्व जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, सर्व विभाग प्रमुख यांनी स्वतः निक्षय मित्र बनून प्रत्येकी २० ते ५० पोषण आहार किटचे वितरण करावे. जेणेकरून एकही रुग्ण पोषक आहारासाठी वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच पोषण आहार किटमधील घटकाचे आरोग्यासाठी उपयोग, हे सागून आदर्श जीवनशैलीचे कशी असावी, प्रथिनयुक्त पोषण आहार, पुर्ण औषणी कोर्स व व्यसनांपासून मुक्त राहणे या माध्यमातून क्षयरोगमुक्ती मिळवता येते, असे आरोग्य उपसंचालक डॉ. रेखा गायकवाड यांनी सांगितले.

या कार्यक्रमास पुणे येथील सेवानिवृत्त आरोग्य उपसंचालक डॉ. गायकवाड, लातूर येथील सहाय्यक संचालक डॉ. संजय ढगे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी बरुरे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. एस. एन. तांबारे, एडीएचएस कुष्ठरोग विभागाचे डॉ. ताबांळे, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. सावंत, जिल्हा क्षयरोग केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. हर्षवर्धन राऊत, औसाचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. देवणीकर, रेणापूर तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रेड्डी, तसेच उपसंचालक आरोग्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# लातूर येथे राज्य रस्ता सुरक्षा अभियान २०२६ ला प्रारंभ

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २ जानेवारी :** प्रत्येक व्यक्तीचा जीव मौल्यवान असतो, मात्र वाहतूक नियमांचे पालन न केल्याने आपण आपला आणि इतरांचाही जीव धोक्यात टाकतो. देशात जवळपास एक ते दीड लाख व्यक्तींचा दरवर्षी अपघातात मृत्यू होतो, यामध्ये सुमारे दहा ते अकरा टक्के मृत्यू आपल्या राज्यात होतात. हे मृत्यू टाळण्यासाठी प्रत्येकाने वाहतूक नियमांचे पालन करण्याची गरज आहे. विशेषतः युवा वर्गाने यासाठी पुढाकार घ्यायला हवा, युवक-युवतींनी वाहतूक नियमांचे पालन करून इतरांनाही त्याबाबत जागरूक करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले.

लातूर जिल्हा रस्ता सुरक्षा समिती, परिवहन विभाग व पोलीस विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्य रस्ता सुरक्षा अभियान २०२६ चे उद्घाटन जिल्हाधिकारी कार्यालय येथील नियोजन समिती सभागृहात जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांच्या हस्ते झाले. रस्ते परिवहन महामंडळाचे विभागीय नियंत्रक अश्र्वजीत जानराव, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता देवेंद्र निळकंठ, उप प्रादेशिक परिवहन




जिल्हा पोलिस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्यंकटेश गिरवलकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बाबासाहेब थोरात, प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, राज्य अधिकारी आशिषकुमार अय्यर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते रस्ते सुरक्षा विषयक माहितीपुस्तिका, भिंतीपत्रिका, जनजागृती फलकाचे प्रकाशन करण्यात आले.

रस्ता सुरक्षा का आवश्यक आहे, याची जाणीव प्रत्येकाला असणे गरजेचे आहे. अपघातामध्ये मृत्यू होणे दुर्दैवी बाब असून, मृत्यूमुळे होणारी हानी भरून न निघणारी आहे. अपघात रोखण्यासाठी प्रत्येकाने वाहतूक नियमांचे पालन

**अपघातातील मृत्यू रोखण्यासाठी वाहतूक नियमांचे पालन आवश्यक**

करावे. दुचाकी चालवताना हेल्मेट आणि चारचाकी वाहन चालवताना सीट बेल्टचा वापर करणे आवश्यक आहे. अपघातात होणारे बहुतांशी मृत्यू हे हेल्मेट, सीट बेल्ट न वापरल्यामुळे होतात, असे जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे म्हणाले.

प्रास्ताविक मोटार वाहन निरीक्षक अभिजीत रेळे यांनी केले. यावेळी त्यांनी रस्ते सुरक्षा अभियानांतर्गत आयोजित केल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. यावेळी अपघातग्रस्तांना मदत करणारे दयाराम जगन्नाथ सुडे, गणेश गिराम, आबासाहेब शिंदे यांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांना ई-चलनद्वारे दंड आकारण्याची कार्यवाही वाहतूक पोलीस आणि परिवहन विभागामार्फत केली जात होती. मात्र, आता परिवहन विभागाच्या ताफ्यात आता २ नवीन ‘रडार’ वाहने दाखल झाली आहेत. यामुळे महामार्गांवर, रहदारीच्या ठिकाणी वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनधारकांवर कॅमेरा, सेन्सरद्वारे लक्ष ठेवता येणार आहे. या वाहनांना आज जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्यंकटेश गिरवलकर यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखविण्यात आली.

## ‘राजमाता जिजामाता’तर्फे मतदान जनजागृती



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २ जानेवारी :** महापालिकेच्या निवडणूक विभागाच्या मतदान जनजागृती उपक्रमाला राजमाता जिजामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठा प्रतिसाद दिला. ‘माझ्या उज्ज्वल भविष्यासाठी व लोकशाही मजबूत करण्यासाठी मी आई-बाबाला मतदान करण्यास प्रवृत्त करणार’, असा संकल्प विद्यार्थ्यांनी केला. यावेळी शिक्षक व कर्मचाऱ्यांनी मतदानाची शपथ घेतली.

यावेळी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, प्रा. कविता केंद्रे, प्रा. अश्विनी केंद्रे, प्रा. वैशाली केंद्रे, राजीव मुंढे, संजय गुरमे, शिवकांत वाडीकर, विष्णू कराड आर. पी मुंडे आदी उपस्थित होते.

## थोडक्यात...



**सोयगाव :** सिल्लोड-सोयगावचे माजी मंत्री तथा आमदार अब्दुल सत्तार यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रभाकर आबा काळे, सोयगाव शिवसेना शहरप्रमुख तथा नगरसेवक संतोष बोडखे, युवासेना ता.प्रमुख कुणाल राजपूत,नगरसेवक हर्षल काळे, नगरसेवक रोऊफ शेख, रमेश गव्हाडे आदींसह उपस्थित होते.

### स्वामी समर्थ पतसंस्थेचे चेअरमन, वकील बार संघाचे अध्यक्ष ॲड. राजेश गिरी यांचा वाढदिवस उत्साहात



**सोयगाव :** श्री.स्वामी समर्थ पतसंस्था व सोयगाव तालुका वकील बार संघाचे अध्यक्ष राजेश भैय्या गिरी यांचा वाढदिवस श्री स्वामी समर्थ पतसंस्था येथे विविध मान्यवरांच्या हस्ते साजरा करण्यात आला.यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई काळे,नंदाताई आगे, राष्ट्रवादी शहराध्यक्ष रवींद्र काळे, पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन विष्णू दुसाने, सतीष कोलते, अमोल निकम, सुनिल निकम, बाबू पटेल, अर्जुन बोडखे,सोमनाथ पाटील, युवराज आगे, पतसंस्थेचे मॅनेजर बाळू बोरसे, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष विवेक महाजन, पतसंस्थेचे सुनील सैदाणे, ॲड. सचिन गिरी, ॲड. स्वप्निल सुरळकर, कार्तिक बोडखे, कडूबा ठाकरे, मयुर मनगटे, पत्रकार कृष्णा पाटील जुनघरे, रवींद्र पाटील, निलेश गाडेकर, प्रशांत जाधव, गणेश पवार, देविदास बैरागी, सह सर्वांनी वाढदिवसानिमित्त ॲड. राजेश गिरी यांना शुभेच्छा दिल्या.

### भीमा-कोरेगाव युद्धातील वीर सैनिकांना मानवंदना



**सोयगाव :** येथील डॉ.आंबेडकरनगरातील पूर्णाकृती पुतळ्यासमोर आंबेडकरप्रेमींनी गुरुवारी सकाळी १० वाजता एकत्र येत त्यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर भीमा-कोरेगाव येथील युद्धातील शहीद वीर सैनिकांना मानवंदना दिली. यावेळी रिपब्लिकन सेना तालुकाध्यक्ष अंकुश मधुकर पगारे, राष्ट्रवादी शहर अध्यक्ष रवींद्र काळे, मराठा क्रांती मोर्चाचे अध्यक्ष विजय काळे, भाजपा व्यापारी आघाडी जिल्हा महासचिव प्रमोद पाटील, नगरसेवक हर्षल काळे, राहुल श्रीखंडे, अतुल पगारे, मंगेश साळवे, दयानंद पगारे, विजय वाकेकर, भीमा निकम, रमेश साळवे उपस्थित होते.

### सेवानिवृत्तीनिमित्त शिक्षक संजय दौड यांना निरोप



**सिल्लोड :** ३१ डिसेंबर रोजी सिल्लोड येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात मुख्याध्यापक संजीव दौड यांना नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती निमित्त निरोप देण्यात आला, त्यांनी राजर्षी शाहू शिक्षण संस्थेत एकूण ३४ वर्ष सेवा बजावली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे नवनियुक्त मुख्याध्यापक कृष्णा सपाटे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक गजानन डमाळे, सेवानिवृत्त शिक्षक रमेश सोनवणे हे होते. कार्यक्रम प्रसंगी विद्यालयाचे पर्यवेक्षक निशांत म्हस्के यांनी संजीव दौड यांच्या एकूण कारकिर्दीवर प्रकाश टाकला. याप्रसंगी विद्यालयाचे अमोल ताटू, अरविंद सोनवणे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक गणेश चव्हाण यांनी, प्रास्ताविक गजानन दौड यांनी तर आभार रमेश परदेशी यांनी मानले. कार्यक्रमोसाठी विद्यालयाच्या शिक्षिका संगीता तायडे,संगीता काळे, मधुकर मगर, लक्ष्मण कोलोड, नरेशसिंग राजपूत, अंगद काळे, भास्कर सागरे, श्रीमती वडमारे, हर्षदा सनांसे, प्राथमिक विद्यालयाचे राजू गाढवे, अमोल दांडगे, भाऊसाहेब गावंडे, गणेश सुरडकर, अमोल पालोदकर, रामेश्वर वाघ, शितल गीते, सुवर्णा तारो, मीरा पांगळे, सोनाली जाधव, सेवक रमेश सपकाळ, शैलेश मोरे यांनी परिश्रम घेतले.

### 'टेडएक्स एमजीएमयु २०२६'चे आज आयोजन

**छत्रपती संभाजीनगर :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वतीने शनिवार, दि. ३ जानेवारी २०२६ रोजी विद्यापीठाच्या रुक्मिणी सभागृहात 'टेडएक्स एमजीएमयु २०२६' आयोजित करण्यात आले आहे. 'इंबर : वन स्पार्क, एंडलेस पॉसिबिलिटीज' या संकल्पनेवर आधारित या कार्यक्रमात नवकल्पना व प्रेरणादायी विचार मांडले जाणार आहेत. कुलपती अंकुशराव कदम, पद्मश्री प्रा. जी. डी. यादव, अमित लुथरा, शेफ पूनम कौर बिंद्रा, कल्पेन शुक्ला, सिद्धेश साकोरे, दीक्षा दिंडे, अमोल सुतार, नैना साहनी व डॉ. शिरीष रावण हे मान्यवर सहभागी होणार आहेत. कार्यक्रमास कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, प्राचार्या प्रा. डॉ. विजया मुसांडे, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित राहणार आहेत.

### सिताराम हिंगे यांचे निधन

**सोयगाव :** सोयगाव शहरातील रहिवासी सिताराम अकाराम हिंगे (वय ७५) यांचे शुक्रवारी ११:३० वा.निधन झाले. त्यांच्यावर शनिवारी सकाळी दहा वाजता सोयगाव येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली,सुन,नातवंडे असा परिवार होत.

# लोकनेते आ. सत्तार यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव

**तभा.वृत्तसेवा**

**सिल्लोड, दि.२ जानेवारी :** माजी मंत्री व आमदार अब्दुल सत्तार यांच्या वाढदिवसानिमित्त शहरात उत्साहपूर्ण आणि व्यापक सहभाग असलेला अभिष्टचिंतन सोहळा पार पडला. शहरातील शिवसेना पक्ष कार्यालय, सेना भवन परिसरात शिवसेना, युवासेना, महिला आघाडी व मित्रमंडळाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याला राजकीय, सामाजिक व प्रशासकीय पातळीवरील विविध घटकांचा मोठा प्रतिसाद लाभला.

आमदार अब्दुल सत्तार यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, खासदार श्रीकांत शिंदे यांच्यासह आजी-माजी मंत्री, आमदार तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी दूरध्वनीद्वारे शुभेच्छा देत अभिष्टचिंतन केले. यासोबतच पक्षाचे पदाधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, व्यापारी, नागरिक व युवकांनी प्रत्यक्ष भेटी, संदेश आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून शुभेच्छांचा वर्षाव केला.

**नवनियुक्त नगरसेवकांसह मान्यवरांची उपस्थिती**

सेना भवन येथे आयोजित कार्यक्रमात खासदार डॉ. कल्याणराव काळे, माजी आमदार चंद्रकांत दानवे, नवनियुक्त नगरसेवक बाबू शेख, जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा. गाढे, व्हाईस चेअरमन किरण डोणगावकर, भरत राजपूत, माजी सभापती रवींद्र काळे, जिल्हा दूध संघाचे अध्यक्ष गोकूळसिंग राजपूत, कन्नडचे शेख जावेद, छत्रपती संभाजीनगर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती श्रीराम बाबा शेळके, रामुकाका शेळके, राधाकृष्ण पठाडे, सुदाम ठोंबरे यांच्यासह विविध राजकीय, सामाजिक संस्था व संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.



यावेळी आमदार अब्दुल सत्तार यांनी शुभेच्छांचा स्वीकार करताना, थोरामोठ्यांचे आशीर्वाद व मित्रांची साथ हीच आपली प्रेरणा असल्याचे नमूद केले. जनतेने दाखवलेला विश्वास हीच आपली सर्वात मोठी ताकद असून भविष्यात मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

> आमदार अब्दुल सत्तार हे नाव राज्यभर लौकिक असून छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यामध्ये त्यांची मजबूत पकड आणि सर्व पक्षांमध्ये असलेल्या जिव्हाळ्याचे संबंध यामुळे सेना भवान येथे सर्वपक्षीय नेते आणि पदाधिकारी यांचा गराडा पहायला मिळाला.

वाढदिवसानिमित्त उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना फळे व ब्लँकेट वाटप, गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वितरण असे सामाजिक उपक्रमही राबविण्यात आले. राज्यभरात असलेला आमदार अब्दुल सत्तार यांचा लौकिक, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील मजबूत नेतृत्व आणि सर्वपक्षीय समन्वयाचे प्रतिबिंब सेना भवन येथे झालेल्या सर्वपक्षीय उपस्थितीतून ठळकपणे दिसून आले.

आमदार अब्दुल सत्तार यांच्या वाढदिवसानिमित्त विविध ठिकाणी सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना फळ व ब्लँकेट वाटप, गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप असे विविध उपक्रम राबविण्यात आले.

## महारेराची बिल्डरला अर्धवट काम पूर्ण करण्याचे आदेश

**तभा.वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि.२ जानेवारी :** शेंद्रा येथील बालाजी बिल्डकॉन चे बिल्डर दिवेंश हरीभाऊ देलवाडीया यांच्या ४२ कॉपर स्टोन येथील रोजचे अर्धवट काम केल्यामुळे महारेराने एक महिन्याच्या करून देण्याच्या आदेश देण्यात आले.

दिनांक १८ ऑक्टोबर २०२५ रोजी, विजयकुमार गंगाधर दाभाडे रा. संजयनगर मुकुंदवाडी छत्रपती संभाजीनगर यांनी शेंद्रा येथील बालाजी बिल्डकॉन चे बिल्डर दिवेंश हरीभाऊ देलवाडीया यांच्या ४२ कॉपर स्टोन या रो हाऊस प्रकल्पातील ३० नं.चे रो हाऊस खरेदी केले. बिल्डर यांनी ठरलेली पुर्ण रक्कम घेऊन घराची ताबा पावती बनवुन दिली.पण घरातील लाईट फिंटिंग,प्लंबिंग चे कलर चे काम करुन दिले नाही.

विजयकुमार दाभाडे यांनी बिल्डर दिवेंश देलवाडिया यांना अनेक वेळा संपर्क करुन राहिलेले काम करुन देण्यास विनंती केली परंतु बिल्डर यांनी कसल्याच प्रकारचा प्रतिसाद दिला नाही बिल्डर ला अनेक वेळा सांगुन सुध्दा बिल्डर काम करुन देत नसल्या मुळे विजयकुमार दाभाडे यानी दिनांक २५ मे २०२४ रोजी वकिला मार्फत कायदेशीर नोटीस पाठवुन राहिलेले काम करुन देण्यास विनंती केली.

कायदेशीर नोटिस पाठवुन सुध्दा बिल्डर ने राहिलेले काम करुन न दिल्या मुळे दिनांक २४/०७/२०२४ रोजी विजयकुमार दाभाडे यांनी महारेरा पुणे येथे बालाजी बिल्डकॉन चे बिल्डर दिंवेश देलवाडीया यांच्या विरोधात ऑनलाईन तक्रार दाखल केली नाही. विजयकुमार दाभाडे याच्या बाजूने पुणे येथिल अँड. रामहरी नुस्ते यांनी बाजु मांडली.

महारेरा चे सदस्य महेश पाठक यांनी या तक्रारीचा पुर्ण अभ्यास करुन दिनांक २४ नोव्हेंबर २०२५ रोजी विजयकुमार दाभाडे यांच्या बाजुने निकाल देत रो हाऊसचे राहिलेले काम एका महिन्याच्या आत करुन देण्यात यावे असे आदेश बालाजी बिल्डकॉन ते बिल्डर दिवेंश हरिभाऊ देलवाडीया यांना देण्यात आले.

## आजचे अपयश हीच उद्याच्या यशाची पायाभरणी : डॉ. बोरीकर

**तभा वृत्तसेवा,**

**बिडकीन, दि. २ जानेवारी :** स्नेहसंमेलनासारखे उपक्रम हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ असून स्पर्धेत अपयश आले तरी खचून न जाता सातत्य, कठोर परिश्रम आणि जिद्दीच्या बळावर यशाचा पाठलाग करावा, कारण आजचे अपयश हेच उद्याच्या यशाची भक्कम पायाभरणी असते, असे प्रतिपादन श्री सरस्वती भुवन शिक्षण संस्थेच्या सहचिटणीस डॉ. रश्मी बोरीकर यांनी केले.

त्या पैठण तालुक्यातील बिडकीन येथील श्री सरस्वती भुवन प्रशालेच्या स्नेहसंमेलनानिमित्त आयोजित बक्षीस वितरण समारंभात अध्यक्ष म्हणून बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर सहचिटणीस डॉ. रश्मी बोरीकर, प्रमुख अतिथी परिक्षित देशपांडे, डॉ. मिलिंद कोनार्डे, मुख्याध्यापक धर्मेंद्र येवले, उपमुख्याध्यापिका मनिषा मिश्रा, शालेय समिती सदस्य नंदकुमार वैद्य, डॉ. आत्माराम धरपळे, किशोर कुलकर्णी, जगन्नाथ आर्वीकर, विद्यार्थी संसदेचे अध्यक्ष युवराज शेळके, सांस्कृतिक प्रतिनिधी यश सर्जे, विद्यार्थिनी प्रतिनिधी जिज्ञासा औटी, प्रभारी पर्यवेक्षक महेश बहाळकर, राजू शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते सरस्वती प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. संगीत शिक्षिका संध्या शिंदे व स. भु. गीतमंचाने स्वागतगीत सादर केले.

प्रमुख अतिथी परिक्षित देशपांडे यांनी विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास असणे अत्यावश्यक असल्याचे सांगत सरस्वती भुवन शिक्षण संस्थेच्या दैदिप्यमान परंपरेचा उल्लेख केला.



अध्यक्षीय भाषणात डॉ. रश्मी बोरीकर यांनी स्त्री-पुरुष समानता, मूल्याधिष्ठित जीवनशैली आणि राष्ट्रनिर्मितीत योगदान देण्याचे आवाहन केले.

स्नेहसंमेलनानिमित्त क्रीडा, सांस्कृतिक, वक्तृत्व, हस्ताक्षर, निबंध, मेहंदी, रांगोळी, चित्रकला, विज्ञान व गणित प्रदर्शन अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. सन २००० बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी प्रशालेला १२ संगणक संच भेट दिले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी समन्वयात्मक प्रयत्न केले.

## कै. बाबुरावजी काळे स्कूलची जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला भेट

**तभा.वृत्तसेवा**

**सोयगाव, दि.२ जानेवारी :** बँकेचे आर्थिक व्यवहार कशा पद्धतीने चालतात?, खातेदार म्हणून आपली जबाबदारी काय ? हे जाणून घेण्यासाठी दि. २ शुक्रवार रोजी या दिवशी सोयगाव येथील कै.बाबुरावजी काळे स्कूलच्या इयत्ता ९ वी आणि १० वीच्या ५० विद्यार्थ्यांनी जिल्हा बँकेच्या सोयगाव शाखेला भेट दिली.

या भेटीदरम्यान शाखा व्यवस्थापक अनिल पाटील, बँक इन्स्पेक्टर चेतन सिसोदिया सह अमोल पाटील,सतीष कोलते, रमेश जाधव यांनी विद्यार्थ्यांना बँक खाते, पैसे भरणे, पैसे काढणे, एटीएम, डिजिटल व्यवहार यांविषयी सविस्तर माहिती दिली. अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या शंका विचारून शंकासमाधान करून घेतले.

या वेळी शाळेचे मुख्याध्यापक निलेश पाटील, उपमुख्याध्यापक ज्ञानेश्वर एलिस, पर्यवेक्षक सागर घाटे, रुपाली मानकर, लिपीक देवानंद आव्हाड आदी उपस्थित होते.सर्वांनी या भेटी मुळे समाधान व्यक्त केले.

## आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात एमजीएम स्कूल ऑफ फिल्म आर्ट्सचे यश

**तभा वृत्तसेवा,**

**छत्रपती संभाजीनगर, दि.३१ डिसेंबर :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या स्कूल ऑफ फिल्म



आर्ट्सने तामिळनाडू येथे आयोजित तमिझगम आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामध्ये घवघवीत यश संपादन करत पुन्हा एकदा आपली सर्जनशीलता आणि शैक्षणिक गुणवत्ता राष्ट्रीय पातळीवर सिद्ध केली आहे. या महोत्सवात सहभागी झालेल्या एमजीएमच्या विद्यार्थ्यांनी मानाच्या विशेष ज्यूरी पुरस्कारावर आपले नाव कोरले आहे.

या महोत्सवात एमजीएम स्कूल ऑफ फिल्म आर्ट्सच्या विद्यार्थी लघुपटास स्पेशल ज्यूरी अवॉर्ड प्रदान करण्यात आला. यामध्ये दिग्दर्शक निहार गोरे याच्या 'दास्तान -ए-दियापूर' या शॉर्ट फिल्मला स्पेशल ज्यूरी अवॉर्ड (बेस्ट स्टुडंट शॉर्ट फिल्म) देऊन सन्मानित करण्यात आले.

या यशाबद्दल एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, विभागप्रमुख डॉ. शिव कदम व सर्व संबंधित मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. एमजीएम विद्यापीठाच्या स्कूल ऑफ फिल्म आर्ट्सने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांमध्ये सातत्याने आपला ठसा उमटवला असून भारतातील अग्रगण्य चित्रपट संस्था म्हणून आपली ओळख निर्माण केलेली आहे. सातत्यपूर्ण मार्गदर्शन, प्रयोगशीलतेला प्रोत्साहन देणारे वातावरण, अध्यापन पद्धती आणि विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष चित्रपट क्षेत्रातील मान्यवरांसमवेत काम करण्याची उपलब्ध करून देण्यात आलेली संधी, यामुळे आमचे विद्यार्थी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर यश प्राप्त करीत आहेत. तमिझगम आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासारख्या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश निश्चितपणे कौतुकास्पद आहे, असे उद्गार स्कूल ऑफ फिल्म आर्ट्स, एमजीएम विद्यापीठाचे विभागप्रमुख डॉ.शिव कदम यांनी काढले.

## डॉ. आंबेडकरांच्या बंधुता मूल्याची समाजाला गरज : किशोर मकवाना



**पुणे, दि २ :** बंधुतेच्या मार्गानेच समाजात समता प्रस्थापित करता येईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या याच बंधुतेची समाजाला गरज आहे. असे मत राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे अध्यक्ष किशोर मकवाना यांनी व्यक्त केले. सामाजिक समरसता मंच आयोजित बंधुता परिषदेत ते बोलत होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९३९ च्या एप्रिल महिन्यात पुण्यात आयोजित राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शिबिराला भेट दिली होती. त्याच पेरू गेट भावे हायस्कूलमध्ये सामाजिक समरसता मंचाच्या वतीने बंधुता परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी किशोर मकवाना, आयडीबीआय आणि इंडियन बँकेचे माजी अध्यक्ष किशोर खरात, 'बार्टी'चे महासंचालक सुनील वारे, खा. बाळासाहेब साळुंके सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष कश्यप साळुंके, भंते बुधभूषण उपस्थित होते.

किशोरजी मकवाना म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुणे येथील संघ शिबिराला भेट दिल्याचे माहिती होते. मात्र, आज प्रत्यक्ष या भेटीचा ऐतिहासिक संदर्भ मांडला गेला. डॉ. आंबेडकरांनी कधीच राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर टीका केली नाही. उलट संघाकडे ते आपलेपणाच्या भावनेने पाहत होते. डॉ. आंबेडकरांच्या बंधुतेचे स्मरण या परिषदेच्या निमित्ताने होत आहे.

### हेमंत खेर चे नाट्यमय पुनरागमन

**तभा.वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर :** गुपिते, फसवेगिरी आणि असंभव वाटणारे पर्याय यांनी भरलेल्या दमदार कथानकाच्या बळावर सोनी सबवरील 'पुष्पा इम्पॉसिबल' मालिकेने प्रेक्षकांना खिळवून ठेवले आहे. या मालिकेत एका गृहिणीमधून न्यायासाठी झगडणाऱ्या वकिलापर्यंतचा प्रवास करणाऱ्या पुष्पाची (करुणा पांडे) कहाणी उलगडून सांगितली आहे. मालिका आत्ता एका अत्यंत तीव्र आणि धक्कादायक टप्प्यावर येऊन पोहोचली आहे. त्यात विरेन सेतलवाडच्या रूपात हेमंत खेरच्या पुनरागमनामुळे मालिकेतील नाट्य आणखीनच वाढणार आहे.

**जाहीर प्रगटन**

**जा.क्र./नपंसो/नामांतर/२०२५/२६**
**कार्यालय नगर पंचायत, सोयगांव**

दिनांक :- ३०/१२/२०२५

सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, श्री./सौ. बशीराबी सरफराज खा) शकिलाबी शमीम सय्यद शाबास खा) निसारखाँ जकियाबी अहमद वसीम पठाण साजेद पठाण नाजिया पठाण स.नं. मधील प्लॉट/घर क्रमांक त्यांचे नांवे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला यांनी मोहल्ला वार्डकृय ७८ व १३४ आहे. अर्जानुसार जागेची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे. पूर्व ज्ञानेश्वर रामदास चौधरी, पश्चिम रस्ता,
दक्षिण दगडू बुधा देहाडराय, उत्तर शाबास खाँ सरफराज पठाण १०४५.५ व १९८ चौफ आकार : पूर्व पश्चिम दक्षिणोत्तर. वरील नामांतराबाबातच्या कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसांचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे. येईल. मुदती नंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत सोयगांव**

**जाहीर प्रगटन**

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगाव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद,(छत्रपती संभाजीनगर)**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.०३/२०२६
१)शेनफडाबाई पंढरीनाथ गव्हांडे, वय ७९ वर्ष, धंदा घरकाम, रा. पळसखेडा, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर, २) राजेंद्र पंढरीनाथ गव्हांडे, वय ४६ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे, ३) सविताबाई आत्माराम भोंबे वय ४० वर्ष, धंदा शेती, रा. आडगाव भोंबे ता.भोकरदन, जिल्हा जालना.
विरूद्ध- निल
प्रकरण - वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत
सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरीक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ड. सचिन सु. गिरी, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत पंढरीनाथ नामदेव गव्हांडे यांचा दि. १४.०७.२०२४ मौजे पळसखेडा, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर, येथे मृत्यू झालेला असुन त्यांच्या पश्र्चात वरील अर्जदार क्र. १ ते ३ हे वारस आहेत असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत पंढरीनाथ नामदेव गव्हांडे यांचे वारस असुन त्यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी बारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. आज रोजी दि. ०२.०१.२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.
पु. ता. २५.०२.२०२६

**आदेशावरून**
**क. लिपीक**
**(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)**
**सहाय्यक अधीक्षक**
**(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)**
**प्रतिलीपी :**
**१) नोटीसबोर्ड, दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव**
**२) ग्रामपंचायत पळासखेडा ता सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर**

**जाहीर प्रगटन**

**मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगाव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद,(छत्रपती संभाजीनगर)**

दिवाणी किरकोळ अर्ज क.०२/२०२६
१) टोंगलबाई भिमसिंग सोनेत, वर. ७० वर्ष, धंदा घरकाम, रा. पळसखेडा, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर, २)लताबाई रुमसिंग सोनेत, वय ५६ वर्ष, धंदा घरकाम, रा. वरीलप्रमाणे. ३) राज रुमसिंग सोनेत, वय २६ वर्ष, धंदा हेती, रा. वरीलप्रमाणे,
विरूद्ध- निल
प्रकरण वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत
सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ड, सचिन सु. गिरी, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत रुमसिंग भिमसिंग सोनेत यांचा दि. २४.१०.२०२४ मौजे पळसखेडा, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर येथे मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्र्चात वरील अर्जदार क्र. १ ते ३ हे वारस आहेत असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत रुमसिंग भिमसिंग सोनेत यांचे वारस असुन त्यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यवा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. आज रोजी दि. ०२.०१.२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.
पु. ता. २३.०२.२०२६,

**आदेशावरून**
**क. लिपीक**
**(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)**
**सहाय्यक अधीक्षक**
**(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)**
**प्रतिलीपी**
**१. नोटीसबोर्ड, दिवाणी व फौजदार सोयगाव**
**२. ग्रामपंचायत पळसखेडा तालुका सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर,**

**जाहीर प्रगटन**

**मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगाव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद,(छत्रपती संभाजीनगर)**

दिवाणी किरकोळ अर्ज क.०४/२०२६
१) सुशिलाबाई बाळू बाबुराव गाडेकर, वय ६० वर्ष, धंदा घेती, रा. सोयगाव, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर, २) संदीप बाळू बाबुराव गाडेकर, वय १ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे,
विरूद्ध- निल
प्रकरण- वारसप्रमाणपत्र मिळणेबाबत
सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ड.सचिन सु. गिरी, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.मयत बाबू बाबुराव लक्ष्मन गाडेकर यांचा दि. २८.०४.२०२५ भौजे सोयगाव, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर, येथे मृत्यू झालेला असुन त्यांच्या पश्र्चात वरील अर्जदार क्र.१ व २ हे वारस आहेत असा अर्ज मा. न्यायालयांत दाखल केलेला आहे. अर्जदार क्र. १ व २ हे मयत बाबू बाबुराव लक्ष्मन गाडेकर यांचे वारस असुन त्यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारय प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप अरोल स्थांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. आज रोजी दि. ०२.०१.२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्यासह दिले असे,
पु. ता. २३.०२.२०२६,

**आदेशावरुन,**
**क.लिपीक**
**(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)**
**सहाय्यक अधीक्षक**
**(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)**
**प्रतिलीपी : १. नोटीसबोर्ड, दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव. २. ग्रामपंचायत/ नगर पंचायत सोयगाव, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर.**

**जाहीर प्रगटन**

**मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगाव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद,(छत्रपती संभाजीनगर)**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.०५/२०२६
१)विलास सोपान बोर्डे, वय.६५ वर्ष, धंदा शेती, रा. सोयगाव, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर, २) अशोक सोपान बोर्ड, वय ६२ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ३)प्रकाश सोपान बोर्ड, वय ५९ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.
विरूद्ध- निल
प्रकरण- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत
सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी अँड. सचिन सु. निरी, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. उत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत शांताबाई सोपान बोर्ड यांचा दि. ३०.०९.२०२५ मौजे सोयगाव, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर, येथे मृत्यू झालेला असुन त्यांच्या पश्र्चात वरील अर्जदार क्र. १ ते ३ हे वारस आहेत असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्र.१ ले ३ हे मयत शांताबाई सोपान बोर्डे यांचे वारस असुन त्यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासून ३० दिवसांच्या आत मा न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. आज रोजी दि. ०२.०१.२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.
पु. ता. २३.०२.२०२६

**आदेशावरून**
**क. लिपीक**
**(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)**
**सहाय्यक अधीक्षक**
**(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)**
**प्रतिलीपी :**
**१)नोटीसबोर्ड, दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव**
**२)ग्रामपंचायत/ नगरपंचायत सोयगाव, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर:**

## अग्रलेख...

# प्रश्न खूप झाले; उत्तरे शोधूया...

ऐतिहासिक व सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध असलेल्या सातारा नगरीत तब्बल ३२ वर्षांनी होत असलेल्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला गुरुवारी सुरुवात झाली. गेल्या काही आठवड्यांपासून सुरू असलेल्या निवडणुकांच्या राजकारणाच्या रटाळ, काहीशा उद्वेगजनक आणि काहीशा निराशाजनक बातम्यांच्या गदारोळापासून मराठमोळ्या महाराष्ट्राचे लक्ष आता साहित्य आणि संस्कृतीच्या परंपरेची पालखी वाहून नेणाऱ्या सारस्वतांच्या मेळाव्याकडे लागले आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतरचे हे दुसरे संमेलन असल्याने त्याची प्रतिष्ठा अधिक वृद्धिंगत झाली आहे. आजवरच्या जवळपास प्रत्येक साहित्य संमेलनात अनेक प्रकारचे वाद निर्माण झाले. यंदाचे ९९ वे साहित्य संमेलन त्यास अपवाद ठरले तर साहित्यशारदेची पालखी वाहून नेण्याची ही परंपरा शतकाच्या उंबरठ्यावर प्रगल्भ आणि समृद्ध झाली, असे म्हणता येईल.

'साहित्य संमेलन हा एक प्रचंड वार्षिक समारोह असून त्याच्या अध्यक्षपदासाठी सर्व महत्त्वाकांक्षी स्त्री-पुरुष साहित्यिकांची भयंकर चढाओढ लागत असे. साहित्याशी संबंध असलेल्या व नसलेल्यांचाही या चढाओढीत समावेश असल्याने त्यातून अनेकांच्या सात्त्विकपणाचे मुखवटे गळून पडतात', असा शेरा जुन्या पिढीतील प्रख्यात साहित्यकार व वात्रटिकाकार चिं. वि. जोशी यांनी १९५८ साली, 'अध्यक्षीय निवडणूक समारोह' या कथेतून मारला होता. वादाचा हा वारसा तेव्हापासूनच सुरू आहे, असे म्हणता येईल. त्या वाक्यातून वादाची मुळे उघडी पडली आणि तरीही ती हट्टाने खोलवर रुजत गेली. त्यामुळे संमेलनाआधी वाद झडावेत किंवा वाद निर्माण होण्याची शक्यताच नसेल तर कोणताही साहित्यबाह्य मुद्दा उकरून तो कुटत बसावा, असा जणू मराठी मनाचा बाणाच असला पाहिजे. राजकारणी नेत्यांनी संमेलनाच्या मंचावर हजेरी लावावी का, हा शाश्वत वादाचा मुद्दा, अन्य काहीच नसण्याच्या काळात पुढे येतो आणि वर्षानुवर्षे त्यावर चर्चा करूनही त्याचे उत्तर सापडत नाही, अशा चाचपडल्या अवस्थेतच अनेक संमेलने संपन्न होऊनही जातात. राजकारण आणि साहित्य व्यवहार यांच्यातील नात्याशी या वादाचे धागेदोरे जोडले गेलेले आहेत. 'मराठी भाषा फाटक्या वस्त्रांनिशी मंत्रालयाच्या दाराशी वर्षानुवर्षे ताटकळत उभी आहे,' अशी विदारक व लाजीरवाणी खंत कविवर्य कुसुमाग्रजांनी व्यक्त केली; त्यालादेखील आता चार दशकांहून अधिक काळ लोटला असावा. आता अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्यानंतर मराठीची ती दुर्दैवी दशा संपून समृद्धीचे दिवस सुरू होतील, या अपेक्षांना धुमारे फुटत असताना होणाऱ्या या साहित्य संमेलनात त्या दृष्टीने काही समजूतदार, प्रगल्भ आणि परंपरेच्या नकोशा समजुतींना मूठमाती देणारे काही घडावे ही मराठीजनांची अपेक्षा आहे. अंगावरच्या फाटक्या वस्त्रांची जागा संपन्न वस्त्रांनी घ्यावी, डोईवरच्या काटोरी मुकुटाची जागा समृद्धीची प्रतीके मिरविणाऱ्या सुवर्णमुकुटाने घ्यावी आणि मराठीने मंत्रालयाच्या दारासमोर ताटकळत उभे राहण्याऐवजी मंत्रालयाने मराठीला सन्मानाच्या पायघड्या घालाव्यात, असे दिवस अभिजाततेमुळे येऊ घातले आहेत. त्या अपेक्षांचे सोने होईल, असे काही संमेलनाच्या मंचावरून घडेल, अशीही मराठीजनांची अपेक्षा आहे. उद्धाराच्या अपेक्षेने मायमराठीला मंत्रालयाच्या दाराशी ताटकळावे लागेल, हे वास्तव आपण कित्येक वर्षे नाईलाजाने स्वीकारलेले होते. त्यामुळे राजकारण किंवा सत्ताकारण आणि मराठी साहित्य व्यवहार हे एकमेकांपासून कधी स्वतःस अलग करतील, ही समजूत आता कायमची पुसली तरच त्यासंदर्भातील वादास मूठमाती मिळेल. तसे व्हावे हीदेखील माय मराठीची अपेक्षा आहे. कारण मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीची अभिवृद्धी व्हावी यासाठी प्रयत्न करण्याचा खरा काळ सुरू झाला आहे. असे प्रयत्न करण्याची भाषाप्रेमींची इच्छा सुफळ संपूर्ण झाली, तर संमेलनांच्या परंपरेला वेगळी झळाळी येईल, यात शंका नाही.

सुमारे दीडशे वर्षांपूर्वी १८७८ साली सुरू झालेल्या साहित्य संमेलनाच्या परंपरेने यंदा ९९ व्या संमेलनाचा टप्पा गाठला, पण अनेक वर्षांपासून समोर असलेल्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यातच बराचसा काळ गेला आणि पुढे त्यात प्रश्नांची भरच पडत गेली. प्रत्येक संमेलनाच्या मावळत्या अध्यक्षाने नव्या अध्यक्षाच्या खांद्यावर प्रश्न आणि समस्यांचे ओझे सोपवावे आणि तीच परंपरा पुढेही जपली जावी, असेच साहित्य संमेलनांबाबत होत गेल्याचे दिसते. आजवरच्या साहित्य संमेलनांत केवळ प्रश्न मांडले गेले. ते अगदीच अनाठायी आहे असे नाही, पण एखाद्या तरी साहित्य संमेलनाने अगोदर मांडल्या गेलेल्या प्रश्नाची उकल केली असती, तर नव्या प्रश्नांची यादी मर्यादित ठेवता आली असती. यंदाच्या साहित्य संमेलनात उद्घाटनाच्या दिवशी, आज 'जागतिक प्रकाशन व्यवहारात मराठी प्रकाशन व्यवहार कोठे आहे,' या विषयावरील परिचर्चेतून या यादीत नवी भर पडणार असावी. आशेचा एक किरण म्हणजे उत्तराच्या शोधासाठी काहीसा अवसर या संमेलनाच्या आखणीने राखून ठेवला आहे. 'मराठी कोशवाङ्मयाच्या विस्ताराच्या दिशा' या विषयावर होणाऱ्या परिसंवादात पुन्हा मर्यादांवर चर्चा न होता, विस्ताराच्या नव्या दिशा शोधण्याचा आशादायक प्रयत्न व्हावा, अशी अपेक्षा गैर ठरणार नाही.

मराठी साहित्य, भाषा, कविता, लोकजीवन, संस्कृती, परंपरांच्या चिंतेत आता एका नव्या चिंतेची भर पडली आहे. 'मराठी समाज विचारभ्रष्ट होत आहे का, या अवस्थेतून त्याला बाहेर काढण्याची क्षमता आजच्या मराठी साहित्याकडे आहे का?' या परिसंवादातही नवा प्रश्नच मांडला गेला आहे. मुळात ते खरोखरीच तसे आहे की, साहित्यविश्वास तसा आभास होत आहे, याचा अगोदर शोध घ्यावा लागेल. त्यासाठी या विश्वात झपाट्याने पसरत चाललेल्या आभासी समजुतींच्या आहारी न जाता प्रामाणिकपणे व तटस्थतेने या प्रश्नाकडे पाहावे लागेल. कारण प्रश्नावर चर्चा करण्याची परंपरा कोठे तरी थांबली पाहिजे, शंभर साहित्य संमेलने भरवूनही केवळ प्रश्नांवरच चर्चा होत असेल, तर उत्तरांचा शोध सुरू केव्हा होणार आणि उत्तरे केव्हा सापडणार, याचाही विचार आता व्हायला हवा. 'मराठी साहित्यविश्वात भयकथा, रहस्यकथा, गूढकथांचा दुष्काळ आहे का' हाही एक चर्चेचा विषय या निमित्ताने मंचावर येणार आहे. जुन्या पिढीतील काही नामवंत लेखकांमुळे या साहित्य प्रकाराने मराठी साहित्यविश्वात आपले स्थान निर्माण केले होते, हे खरेच आहे. त्यानंतर ती परंपरा फारशी जपली गेली नाही, हेही खरे आहे. त्यामुळे 'दुष्काळ आहे' हे या प्रश्नावरील उत्तर असणार हेदेखील ओघानेच येते. मग पुन्हा त्या प्रश्नावरच चर्चा करण्यात काय हशील आहे? उलट, या दुष्काळमुक्तीसाठी संमेलनाचा मंच काय करणार त्यावर या चर्चेतून विचारमंथन व्हायला हवे. तसे होईल ही अपेक्षा करण्यात गैर नाही.

'मागे वळून पाहणे' ही मराठी संस्कृतीची सवय आहेच. ती चांगली आहे यातही शंका नाही. पण प्रत्येक इतिहास हा भविष्याची दिशा दाखविणारा ठरतो, असे म्हटले जाते. मागे वळून पाहिल्यानंतर जे काही दिसते, त्यापासून शिकून पुढच्या वाटा अधिक मोकळ्या करण्याच्या मानसिकतेची जोड या सवयीला मिळाली पाहिजे. स्त्री चळवळीच्या ५० वर्षांच्या वाटचालीकडे मागे वळून पाहताना, पुढच्या वाटचालीला संमेलनातून काय दिशा मिळते, याचीही मराठीजनांस उत्सुकता आहे. या चर्चेकडून त्या उत्तराची अपेक्षा आहे. कारण अभिजात दर्जा मिळाल्यानंतरच्या मराठीसमोरील संधी आणि आव्हानांची चर्चाही या संमेलनाच्या निमित्तनने होऊ घातली आहे. हा केवळ मराठी भाषेसमोरील आव्हानांचा किंवा संधींचा मुद्दाच नाही. तो मराठी संस्कृतीचादेखील मुद्दा आहे. मराठी संस्कृतीची जोपासना करणाऱ्या घटकांत मराठी भाषेचा- मग ती बोली भाषा असो की लिखित भाषा- मुद्दा महत्त्वाचा आहे. प्रत्येक दहा मैलावर भाषेचा लहेजा बदलतो असे म्हणतात; तरीही मराठी संस्कृतीचा एकसंधपणा मात्र टिकून असतो. तो तसाच राहिला पाहिजे, यासाठी भाषेची लय, लहिजा यांचे सारे सौंदर्य जपून आणि प्रत्येक लहेजाचा आदर राखून संस्कृतीचे संवर्धन व्हावे यासाठीही संमेलनांच्या मंचावर उत्तर शोधले गेले पाहिजे. प्रश्न अनेक आहेत, त्याची चर्चा करण्याची परंपरा आता संपावी आणि उत्तरांचा व उपायांचा शोध सुरू व्हावयास हवा. त्यासाठी शंभराव्या संमेलनाच्या उंबरठ्यावर उभे राहून त्याचा सुमुहूर्त करावयास हरकत नाही.

## प्रासंगिक

कांचन गडकरी

# सेवासदन : शिक्षण सेवेचे समृद्ध शतक

**दि. २ जानेवारी २०२६ रोजी सेवासदन शिक्षण संस्था १०० व्या वर्षात पदार्पण करीत आहे. त्यानिमित्त संस्थेच्या अध्यक्ष कांचन गडकरी यांचा लेख...**

> सेवासदन संस्थेचा भाग होणे, हा माझ्या सार्वजनिक जीवनातील समृद्ध टप्पा आहे. रमाबाई रानडे यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा चालविणाऱ्या संस्थेचे नेतृत्व करणे, हे आपणच एका शाळेत प्रवेश घेण्यासारखे होते. अ. रा. गोखले-सुशीलाबाई गोखले यांच्या संस्कारात वाढलेल्या शिक्षण संस्थेमध्ये प्रवेश घेऊन माझ्या आयुष्याचा एक नवा अध्याय सुरू झाला. अनेक ऋतू बघितलेले सेवासदन नावाचे एक भव्य वृक्ष अन् त्याची सावलीही आता १०० वर्षांची होतेय. त्या वृक्षाच्या सावलीत काम करणे, हा मी माझाच गौरव समजते.

२००७ पासून मी संस्थेची अध्यक्ष आहे. पूर्वी कार्यकारिणीत होते; संस्थेत सक्रिय नव्हते. बापूसाहेब भागवत, वासंती भागवत आणि रोहिणी गोडबोले यांच्या आग्रहामुळे संस्थेत महत्त्वाची जबाबदारी स्वीकारली. पुढच्या काळात ज्युनियर कॉलेज, सीबीएसई शाळा, सिनियर कॉलेज, एनडीए अभ्यासक्रम सुरू झाला. परिसर सुंदर झाला. शाळेची लोकप्रियता वाढली. १०० वर्षांच्या या प्रवासात संस्थेने अफलातून प्रगती केली, पण हा मार्ग सोपा नव्हता. अनेक संघर्षांवर, अडचणींवर मात करून हा टप्पा गाठला आहे. मी अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारली तेव्हा माझ्यासाठी एक व्यासपीठ तयार होते. अ. रा. गोखले यांनी शाळा सुरू केली, पण त्यांच्यासह जुन्या लोकांनी अतिशय कष्टातून सेवासदन नावाचे कुटुंब उभे केले होते. मी त्या कुटुंबात नव्याने सामील झाले होते. संस्थेतील जुनी-जाणती मंडळी आजही संस्थेसाठी झटत आहेत; त्यांनी नवे बदल करण्यासाठी, नवे उपक्रम सुरू करण्यासाठी मोलाची साथ दिली. त्यामुळे आज संस्थेने जे भव्य रूप धारण केले आहे, त्याचे श्रेय त्याच मंडळींनी जाते.

माझ्या सासुबाई कै. भानुताई गडकरी यांनी संस्थेतून मॉँटेसरीचे ट्रेनिंग घेतले होते. 'टीम वर्क' हे या संस्थेचे सर्वांत वैशिष्ट्य आहे. कुठलीही जबाबदारी पालकत्व घेऊन करण्याची कमालीची वृत्ती संस्थेत काम करणाऱ्या प्रत्येकाची आहे. एकमेकांबद्दलचा विश्वास, आपुलकी आहे. याचमुळे संस्था एवढ्या वर्षांचा समृद्ध प्रवास करू शकली. एखाद्या संस्थेतील प्रत्येक व्यक्ती शतसंवत्सरी सोहळा उत्तमरीत्या साजरा करण्याचा ध्यास घेऊन कार्य करीत असेल, तर यापेक्षा मोठे यश तरी कुठले असावे. मी अनेक संस्थांमध्ये काम केले, पण शैक्षणिक संस्थेचे काम केलेले नव्हते. त्यातही रमाबाई रानडे यांच्या विचारांचा वारसा घेऊन पुढे जाणाऱ्या संस्थेचे नेतृत्व करायचे म्हणजे आव्हानच होते. रमाबाई रानडे यांच्याबद्दल प्राथमिक माहिती मला होती. दरम्यानच्या काळात त्यांच्या जीवन चरित्रावरील पुस्तकं वाचली. त्यामुळे सोपे झाले. महत्त्वाचे म्हणजे संस्थेतील प्रत्येकाने मला समजून घेतले आणि सामावून घेतले. माझ्यापेक्षा बापूसाहेब आणि वासंती भागवत वयाने आणि अनुभवाने मोठे आहेत. त्यांची मला उत्तम साथ मिळतेय. सेवासदन हा तर या मंडळींचा श्वास आहे. सतत काहीतरी नवीन करण्याचा ध्यास त्यांच्या मनात असतो. रमाबाई रानडे शिक्षण-प्रबोधन पुरस्कार सुरू करण्याची कल्पना बापूसाहेब भागवतांनीच मांडली. हा पुरस्कार एखाद्या व्यक्तीला न देता शिक्षण क्षेत्रात समर्पित वृत्तीने काम करणाऱ्या संस्थेला देण्याचा निर्णय झाला. रमाबाई रानडे यांचे काम खूप मोठे आहे, पण त्यांच्या नावाने एकही पुरस्कार नव्हता. २०१६ पासून आम्ही हा पुरस्कार सुरू केला. पहिल्या वर्षी अर्ज मागवले, पण नितीनजींनी आम्हाला अर्ज मागवण्यापेक्षा चांगल्या संस्थांचा शोध घेण्याचा सल्ला दिला. हा पुरस्कार शिक्षण क्षेत्रात प्रतिष्ठेचा मानला जातो.

बदलत्या काळानुसार संस्थेतही अनेक नवे बदल झालेत. डिजिटल शिक्षण देणे, स्मार्ट बोर्ड उपलब्ध करून देण्यात आले. उत्तम नागरिक घडविण्याच्या दृष्टीने जे जे काही करता येईल, ते संस्था करीत असते. त्यामुळेच शिक्षक-पालकांमध्ये उत्तम संवाद आहे. बहुतांश मुलं गरीब कुटुंबातील आहेत. त्यामुळे त्यांच्या पालकांचंही भावनिक पालकत्व घेण्याची जबाबदारी संस्थेतील प्रत्येकाने स्वीकारली आहे. पाचवी ते दहावी या सहा वर्षांच्या कालावधीत प्रत्येक वर्षी एक स्तोत्र विद्यार्थ्यांना पाठ झाले पाहिजे, असा आमचा प्रयत्न असतो. या स्तोत्रांचे स्वर, संस्कार आणि महत्त्व विद्यार्थ्यांच्या माध्यमातून त्याच्या कुटुंबापर्यंत पोहोचत असते. काही मुलांचे पालक अशिक्षित आहेत, मोलमजुरी केल्याशिवाय कुटुंबाचा गाडा रेटणे शक्य नाही. अशा घरांमध्ये संध्याकाळी दिवे लागल्यानंतर, घरात कुणी पाहुणे आल्यानंतर मुलं मोठ्यांना वाकून नमस्कार करतात, तेव्हा खऱ्या अर्थाने संस्थेतून मिळणाऱ्या संस्काराचे दर्शन पालकांना घडते.

लोणावळ्यातील मनशक्ती केंद्राचे कार्यक्रम सेवासदन संस्थेतील विद्यार्थी, त्यांचे पालक आणि शिक्षकांसाठी आयोजित केले जात आहेत. उत्तम नागरिक, आदर्श शिक्षक आणि जबाबदार पालक घडविण्याच्या दृष्टीने हा अतिशय महत्त्वाचा उपक्रम ठरणार आहे. कार्यशाळांमध्ये व्यक्तिमत्त्व विकास, बाल मानसशास्त्र, ज्ञान-विज्ञान, एकाग्रता यांचे प्रशिक्षण दिले जाते.

सेवासदनने मुलींची सैनिकी शाळा सुरू करायला हवी, अशी कल्पना बापूसाहेब भागवत यांनी मांडली आहे. नाशिकला अशी शाळा आहे, पण इकडे नाही. त्यामुळे आपल्या भागातील मुलींना सैनिकी प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने हे अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. संस्थेच्या कार्यकारिणीत, शिक्षकांमध्ये, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमध्ये कुणाचाही वाढदिवस असेल तर त्याने एक पुस्तक शाळेला द्यायचे, असा उपक्रम आम्ही राबवितो.

२ जानेवारी २०२५ पासून पुढचे वर्ष सेवासदन संस्था शतसंवत्सरी वर्ष साजरे करणार आहे. हे वर्ष नव्या निर्धाराचे, नव्या निश्चयाचे असणार आहे. वर्षभरात वैविध्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून पुढचा प्रवास सुरू होणार आहे. या प्रवासातील प्रत्येक टप्पा समृद्ध व्हावा, यादृष्टीने आम्हाला पाऊल टाकायचे आहे. विद्येमुळे विनम्रता येते; विनयामुळे पात्रता येते. पात्रतेमुळे धन प्राप्त होते, धनातून धर्म घडतो आणि धर्मामुळे सुख मिळते. शिक्षण सेवा हा आमचा धर्म आहे आणि या धर्माचे योग्यरीत्या पालन करून आम्हाला आदर्श निर्माण करायचा आहे.

'विद्या ददाति विनयं, विनयाद्याति पात्रताम् ।
पात्रत्वाद्धनमाप्नोति, धनाद्धर्मं ततः सुखम् ॥'

(अध्यक्ष, सेवासदन शिक्षण संस्था)

## वेध

प्रफुल्ल व्यास

# श्रद्धेच्या पुनर्जागरणाचा नवा अध्याय

इंग्रजी नववर्षाच्या स्वागतालाही आता केवळ पार्ट्या, मद्य आणि जल्लोष इतकाच अर्थ उरलेला नाही तर वर्धेसारख्या ठिकाणी सामूहिक हनुमान चालीसा, सुंदरकांड, नामस्मरण, भजन-कीर्तन यांचा नाद उमटू लागला आहे. अयोध्या असो वा शिर्डी, शेगाव, तुळजापूर, अक्कलकोट, तिरुपती बालाजी आदी धार्मिक स्थळांवर नववर्षाच्या पहिल्या दिवशी भाविकांची उसळलेली गर्दी हे केवळ दर्शन किंवा मौजमजा, सहल नव्हे तर सश्रद्धेचे प्रतीक आहे. आज जी पिढी साठीत आहेत त्यांनी आपल्या उमेदीच्या काळात (अपवाद वगळता) आमचा देवापेक्षा आमच्या हातावर विश्वास सांगत 'दोन हस्तक आणि एक मस्तक' सांगितले जात होते. त्याही पुढे जाऊन अंधश्रद्धेलाही त्यांच्याच काळात थोडी चेतना मिळाली होती. विज्ञानाची कास धरत श्रद्धेला मागासपणा म्हटले जाऊ लागले होते. काळाच्या ओघात समाजाने काही अनुभव घेतले आणि हातावरच्या विश्वासाला संकटात आधार देणाऱ्या देवाच्या शक्तीचीही तितकीच गरज असल्याची जाणीव होऊ लागली. परिणामी देवांना, देवळांना 'गोल्डन डे' येऊ लागले. 'एक लोटी जल, सारे समस्या का हल' या विश्वासाने महादेवाच्या मंदिरात रांग लागू लागली हा सकारात्मक बदल आमची पिढी अनुभवते आहे. मराठी नववर्षाचे स्वागत करताना घराघरांत गुढी उभारली जाते. वर्धेतून गुढीपाडव्याच्या पहाटे 'पाडवा पहाट' हा कार्यक्रम सोशॉलिस्ट चौकात करण्याचा एक प्रघात पडला आणि त्याला ५ हजाराच्यावर वर्धेकर येतात. नागपूर, अमरावतीतही असाच कार्यक्रम होतो. हे सर्व केवळ परंपरा म्हणून नाही तर अभिमान म्हणून साजरे होत आहे. मराठी नववर्ष म्हणजे आपली कालगणना, आपला इतिहास, आपली संस्कृती! जसे इंग्रजी नववर्ष साजरे करणे वाईट नाही तसेच आपले मराठी नववर्षाचे विस्मरण होणे उचित नाही, याची जाणीव समाजाला होऊ लागली आहे. दोन्हीचा सुवर्णमध्य साधण्याची कला आजच्या पिढीला म्हणजे आमच्या भविष्याला साध्य होऊ लागली आहे. इंग्रजी नववर्षाच्या पहिल्या दिवशी वर्धेत सामूहिक हनुमान चालीसाचे आयोजन ही केवळ एक धार्मिक घटना नाही. ती सामूहिकतेची, संघटनाची सार्वजनिक श्रद्धा ठरते आहे. १६ वर्षांपूर्वी एका राम मंदिरातून सुरू झालेला हनुमान चालीसा जवळपास ७०० मंदिरांपर्यंत पोहोचला आहे.



दरवर्षी १ जानेवारी रोजी गल्लीगल्ली, मोहल्यामोहल्यातील मंदिरांमध्ये हनुमान चालीसा होऊ लागला. सुंदरकांडाच्या पठनातून रामकथेचा संदेश मनावर कोरला जातो. यावर्षी नववर्षाच्या स्वागताला अयोध्येतही प्रचंड गर्दी होती. शिर्डीत साईंच्या चरणी नतमस्तक होणारी गर्दी असो, शेगावला गजानन महाराजांच्या दर्शनासाठी लागलेल्या रांगा, कोल्हापूर, तुळजापूरला मातेच्या दर्शनासाठी आलेले कुटुंब असोत की अक्कलकोटला स्वामी समर्थांच्या नामस्मरणात तल्लीन झालेले भाविक असो; या सर्वात श्रद्धेचा एकसमान धागा असून तो आता जगण्याचा अर्थ शोधतो आहे. आज शेगाव येथे दर्शनाला सात तास लागले तर सप्तशृंगी येथे ३० हजार भक्तांनी दर्शन घेतले. माणूस आज पुन्हा अर्थ शोधतोय् आयुष्याचा, कष्टांचा, यश-अपयशाचा! विज्ञानाने सुविधा, वायुगती, माहिती दिली. मात्र, समाधान हिरावून घेतले. त्यानंतर एकत्र वादळ आलं. स्पर्धा आली. ताण वाढला, एकटेपणा वाढल्याने देव आठवला. त्यामुळे आजचा सामूहिक हनुमान चालीसा होणारा दिवस उगवला! इंग्रजी नववर्षाच्या स्वागताला सामूहिक प्रार्थना, भजन, नामस्मरण जोडले जाणे ही सकारात्मकताच म्हणावी लागेल. देवळं पुन्हा गजबजत आहेत; त्याचबरोबर समाजकार्य, शिक्षण, आरोग्य, सेवा यातही धार्मिक संस्थांचा सहभाग वाढतो आहे. शिर्डी, शेगाव, अक्कलकोटसारख्या ठिकाणी केवळ दर्शन नाही तर अन्नछत्र, रुग्णसेवा, शिक्षणाची सोय दिसते. हीच खरी श्रद्धा जी केवळ मागते नाही तर देतेसुद्धा. पूर्वी ज्याला सण-उत्सव कंटाळवाणे वाटत होते, तोच तरुण आज ढोल-ताशांच्या तालावर नववर्षाचे स्वागत करतो आहे, सामूहिक हनुमान चालीसात सहभागी होतो आहे.

देवळं ओस पडली अशी खंत व्यक्त केली जात होती. ती खंत इतिहासजमा होताना दिसते आहे. आता पुढे पुन्हा एक चळवळ सक्रिय करावी लागणार आहे ती म्हणजे वाढदिवसावर पाश्चात्त्यांचे आक्रमण! मेणबती विझवणे आणि केक तोंडाला फासणे या किळसवाण्या प्रकारातून बाहेर पडण्यासाठी, पाडण्यासाठीचा गतिरोधक ओलांडायाचा आहे... बघा जमले तर २१ व्या शतकातली नवीन उपलब्धी होईल.

९८८०९०३७६५


## दखल

मोरेश्वर बडगे

# शरद पवारांच्या मनात काय?

राज्यातील २९ महापालिका निवडणुकांच्या उमेदवारी अर्ज भरण्याच्या अखेरच्या दिवशी पाहायला मिळालेला अभूतपूर्व गोंधळ सुसंस्कृत राजकारणाला लाजवणारा होता. कित्येक वर्षांनंतर महापालिकांच्या निवडणुका लागल्या. त्यामुळे त्या लढण्यासाठी इच्छुकांची अस्वस्थता समजण्यासारखी आहे. पण एवढा गोंधळ कोणी अपेक्षिला नव्हता. ज्यांना उमेदवारी मिळाली ते खुश आहेत. ज्यांना मिळाली नाही ते जमेल त्या मार्गाने आपली नाराजी काढत आहेत. साऱ्याच राजकीय पक्षांमध्ये जागावाटपाची बोलणी शेवटच्या दिवसांपर्यंत रखडली होती. महायुतीच्या तिकिटाला सोन्याचा भाव आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी भाजपा आणि एकनाथ शिंदे यांची शिवसेना एकमेकांविरोधात उभे दिसतात. महाविकास आघाडीमध्येही गोंधळाचे असेच चित्र आहे. बंडखोरीला उधाण आले आहे. पुण्यात तर अजित पवारांची राष्ट्रवादी भाजपाच्या विरोधात उभी ठाकली आहे. मात्र, निकालानंतर सर्वांना महायुतीतच यायचे आहे, याची दोघांनाही कल्पना आहे. १५ दिवसांचा हा खेळ आहे. मात्र प्रचार करताना साऱ्याच नेत्यांची अडचण होणार आहे. एक चित्र स्पष्ट दिसते. याही निवडणुकीत विरोधी पक्ष कुठेही मजबुतीने दिसत नाही. नुकत्याच झालेल्या नगर परिषद निवडणुकीत हेच चित्र होते, तसल्याच निवडणुका पुन्हा होताना दिसतील. तेव्हाही महायुतीतले मित्र पक्षच एकमेकांशी टक्कर देत होते. आताही तेच दिसेल. दिसायला हा गोंधळ दिसतो. पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ही रणनीती आहे. जिंकून येईल तो आपला हा फॉर्म्युला आहे.

२९ महापालिकांमध्ये निवडणुका असल्या, तरी खरी चुरस मुंबईमध्ये आहे. गेली २५ वर्षे मुंबई महापालिका ठाकरे कुटुंबाकडे एकहाती होती. पुढेही ती आपल्याकडे ठेवण्यासाठी उद्धव ठाकरे यांची केविलवाणी धडपड सुरू आहे. गेल्या निवडणुकीत युतीचे सरकार असताना भाजपा आणि शिवसेना विरोधात लढले होते. तेव्हा एकसंध शिवसेनेला ८४ जागा मिळाल्या होत्या तर भाजपाला ८२. दोन जागांचा फरक होता. आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईची निवडणूक प्रतिष्ठेची केली आहे. कुठल्याही परिस्थितीत मुंबईत भाजपाचा महापौर बसवायचा यासाठी फडणवीस यांनी फार आधीपासून व्यूहरचना केली आहे. भाजपाला तोंड देऊ पाहणाऱ्या उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेची दयनीय अवस्था आहे. शिवसेना फुटली आहे. शिवसेना हा पक्ष, त्याचे निवडणूक चिन्ह... सारे काही एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडे आले आहे. मुख्यमंत्री होण्याच्या हव्यासापायी उद्धव ठाकरेंनी भाजपाला दगा दिला. महाविकास आघाडी करून ते शरद पवारांच्या मांडीवर बसले. ती महाविकास आघाडी आज मोडीत निघाली आहे. काँग्रेस प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीसोबत लढते आहे. शरद पवारांची मुंबईमध्ये फारशी ताकद नाही.



मुंबईचा निकाल काय लागणार हे उघड आहे. १३ महिन्यांपूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपाला ४६ टक्के मतं मिळाली होती. शिवसेनेला २३ टक्के तर मनसेला अवघ्या ७ टक्के मतांवर समाधान मानावे लागले होते. आताही हीच टक्केवारी चालणार. संकटकाळाची कुमक म्हणून उद्धव ठाकरेंनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सुप्रीमो राज ठाकरे यांच्याशी युती केली आहे. ठाकरे बंधूंनी मराठी अस्मिता हा निवडणुकीचा मुद्दा केला आहे. जुलैमध्ये हे भाऊ एक मंचावर आले होते. तेव्हाच ते कामाला लागले असते तर 'ठाकरे ब्रँड' म्हणून आज चांगली हवा तयार झाली असती. पण निवडणूक युती जाहीर करायला दोघांनी खूप वेळ घेतला. ठाकरे बंधू एकत्र आले याचा खूप गाजावाजा झाला. पण जागावाटपात राज ठाकरेंच्या वाट्याला अवघ्या ५२ जागा आल्या. मुंबईतल्या २२७ जागांपैकी फक्त ५२ जागा. आपल्या भावाची ही पत केली उद्धव ठाकरेंनी. युतीत ठाण्यामध्ये मनसेला २७, नाशिक व पुण्यात प्रत्येकी २५ जागा लढायच्या आहेत. मुंबईमध्ये फडणवीस यांनी एकनाथ शिंदेंना सोबत घेतले आहे. काँग्रेसने वंचितला सोबत घेतले असले तरी फायदा भाजपा-शिंदे सेनेलाच होताना दिसतो आहे. कारण दलित आणि मुस्लिम मतं विभागली जाणार आहेत. लोकसभा निवडणुकीत मुस्लिम मतं ठाकरेंना मिळाली होती. यावेळी तो सारा फायदा ठाकरेंना मिळणार नाही. शिंदे यांच्यामुळे ठाकरेंची मराठी मतं विभागली जाणार आहेत. शरद पवारांच्या करिष्म्यावर ठाकरे विसंबून होते. पण पवारांचा उद्धव ठाकरे यांच्यातला 'इंटरेस्ट' केव्हाच गेला आहे. शरद पवार यांनी पुणे महापालिकेत पुतण्याशी युती केली आहे. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र भाजपाशी लढत आहेत. शरद पवार पूर्वीचे राहिलेले नाहीत. पुतण्यासोबतच्या त्यांच्या बैठका वाढल्या आहेत. मतचोरीच्या मुद्द्यावर शरद पवार बोलत नाहीत हे एव्हाना तुमच्या लक्षात आले असेल. ईव्हीएमबद्दल आपली तक्रार नाही, हे आता सुप्रिया सुळेही सांगू लागल्या आहेत. सुप्रिया सुळे यांच्या बोलण्यातला फरकही लक्षात घेण्यासारखा आहे. 'आम्ही व्यावसायिक राजकारणी आहोत' असे त्या मीडियाशी बोलताना म्हणाल्या. पवार कुटुंब कुठल्या दिशेने निघाले आहे याचे हे ट्रेलर आहे. उद्योगपती गौतम अंबानी सदैव विरोधी पक्षांच्या रडारवर असतात. धारावी पुनर्विकास, बंदर तसेच विमानतळ अदानींना दिले म्हणून काँग्रेस आणि उबाठा यांनी अदानी यांच्यावर हल्लाबोल चालवला आहे. त्याच गौतम अदानी यांचे नुकतेच पवार कुटुंबाने बारामतीत जंगी स्वागत केले. महापालिका निवडणुकीच्या धामधुमीच्या तोंडावर हा सोहळा झाला. शरद पवार, अजित पवार यांच्यापासून सारे पवार झाडून या स्वागताला होते. दोन्ही राष्ट्रवादी पुण्यात वेगवेगळे लढणार असे सुरुवातीला जाहीर झाले होते. मात्र, गौतम अदानी यांच्या भेटीनंतर किल्ली फिरली. दोन्ही राष्ट्रवादी एकत्रच नव्हे तर आता दोन्ही राष्ट्रवादीचे विलीनीकरण होणार अशी हवा आहे. महापालिका निवडणुकीच्या निकालानंतर हे घडू शकते. शरद पवारांनी एनडीएसोबत जाण्याची तयारी केली आहे. त्यांचा जीव मुलीमध्ये अडकला आहे. ५० वर्षे राजकारणात राहूनही आपण आपल्या मुलीला 'सेटल' करू शकलो नाही, याची खंत शरद पवारांना टोचते आहे. आता पुढची साडेतीन वर्षे निवडणुका नाहीत. या काळात मुलीची काय अवस्था होईल, याची या बापाला कल्पना आहे. वयाच्या ८५ व्या वर्षी हा बाप थकला आहे, दमला आहे. शरद पवार सत्तेशिवाय राहू शकत नाहीत, असा त्यांचा आतापर्यंतचा रेकॉर्ड आहे. शाहू-फुले-आंबेडकर विचारधारेच्या गोष्टी ते करतात. मात्र 'जिधर बम उधर हम' हीच त्यांची विचारधारा राहिली आहे. त्याच अंतर्गत सुप्रिया सुळे लवकरच केंद्रात मंत्री झालेल्या दिसतील. भाजपासोबत बसण्याच्या हालचाली फार आधीपासून सुरू आहेत. ८० तासांचे सरकार काकाच्याच आशीर्वादाने उभे झाले होते. उद्धव ठाकरे पुढे आल्याने तो प्रयोग बारगळला. अजितदादा वैतागले होते. त्यातूनच राष्ट्रवादीचे दोन तुकडे झाले. आपला पक्ष फुटतो आहे हे शरद पवारांनी कळत होते. पवारांनी अनेक पक्ष फोडले, घरं फोडली. त्यांना आपल्या घरात काय चाललंय ते कळत नसेल अशातला भाग नाही. शरद पवारांनाच ते घडवून आणायचं होतं. यातला पहिला अंक झाला आहे. पुढचा अंक लवकरच पार पडेल. मात्र, संभ्रमावस्था हा पवारांचा स्वभावविशेष आहे. त्या हिशोबाने अजूनही ते उघडपणे पुढे यायला मागेपुढे पाहत आहेत. त्यांच्या मनात काय चाललंय याचा थांगपत्ता लागत नाही. त्यामुळेच एकत्रीकरण लांबतंय का? याची त्यांच्याच सहकाऱ्यांमध्ये चर्चा आहे.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

# कुमार विश्वास यांनी उलगडले भाजपाच्या तीन पिढ्यांचे 'कार्यसूत्र'

प्रसिद्ध कवी डॉ. कुमार विश्वास यांनी लखनौ येथील कार्यक्रमात भारतीय जनता पक्षाच्या तीन पिढ्यांमधील कार्यशैलीतील बदलाचे अत्यंत मार्मिक विश्लेषण केले. त्यांनी कचरा (अव्यवस्था) साफ करण्याच्या एका साध्या उदाहरणातून भारतीय राजकारणातील हा वैचारिक प्रवास मांडला.

पहिली पिढी : अटलबिहारी वाजपेयी (संस्कार आणि संयम) : अटलजींचे नेतृत्व हे आदर्शवाद आणि लोकशाही मूल्यांचे प्रतीक होते. कुमार विश्वास यांच्या मते, ही अशी पिढी होती जिथे ''शेजाऱ्याने कचरा टाकला तरी तो आपण स्वतः साफ करावा'' इतकी सहनशीलता आणि सुसंस्कृतपणा होता. या काळात विरोधापेक्षा समन्वयाला आणि स्वतःच्या आचरणातून आदर्श उभा करण्याला महत्त्व दिले गेले.

दुसरी पिढी : नरेंद्र मोदी आणि राजनाथ सिंह (शिस्त आणि जबाबदारी) : दुसऱ्या पिढीने व्यवस्थेत उत्तरदायित्व आणले. या नेतृत्वाने स्पष्ट भूमिका घेतली की, ''कचरा ज्याने टाकला आहे, त्यानेच तो साफ केला पाहिजे.'' पंतप्रधान मोदींच्या कार्यकाळात प्रशासकीय शिस्त आणि कामाचा जाब विचारण्याची पद्धत रूढ झाली. ही पिढी केवळ स्वतः काम करण्यावर मर्यादित न राहता, चुका करणाऱ्याला त्याची जबाबदारी स्वीकारायला लावणारी ठरली.

तिसरी पिढी : योगी आदित्यनाथ (निर्णायक आणि कठोर प्रशासन) : आजच्या तिसऱ्या पिढीचे नेतृत्व, विशेषतः मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, अधिक आक्रमक आणि परिणामकारक भूमिकेत आहेत. विश्वास यांच्या शब्दात, ''हे नेतृत्व केवळ कचरा साफ करत नाही, तर कचरा टाकणाऱ्या प्रवृत्तीलाच साफ करते.'' गुन्हेगारी आणि भ्रष्टाचाराविरोधात झीरो टॉलरन्सचे धोरण स्वीकारून प्रशासकीय वचक निर्माण करण्याचे काम या पिढीने केले आहे.

निष्कर्ष : कुमार विश्वास यांनी या विश्लेषणातून हे अधोरेखित केले की, उत्तर प्रदेशसारख्या मोठ्या राज्यात झालेला सकारात्मक बदल हा केवळ योगायोग नसून ती प्रबळ राजकीय इच्छाशक्ती आहे. नेतृत्वाच्या बदलत्या शैलीमुळे व्यवस्था कशी अधिक कणखर आणि जबाबदार बनते, हे त्यांनी आपल्या भाषणातून स्पष्ट केले.

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

## वाचक पत्रे

### सेवा सुविधांचे विकेंद्रीकरण व्हावे

रस्ते, मेट्रो, मोनो, विमानतळ, जलवाहतूक, डबल डेकर बस, उन्नत भुयारी मार्ग, सागरी महामार्ग, एक्सप्रेस वे, फ्री वे या व अशा अनेक सुविधा प्रकल्प, महाप्रकल्प हे केवळ मुंबई, ठाणे या जिल्ह्यांच्या ठरावीक भागातच आकार घेत आहेत. विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील जनतेला या सुविधा आणि प्रकल्प केवळ टीव्ही आणि फोटोतच पाहायला मिळतात. जर मुंबई, ठाणे यासारख्या शहरी भागांना सुविधा मिळत असतील तर आम्हाला का मिळत नाही असा प्रश्न ग्रामीण भागातील जनतेला पडला आहे. एकीकडे मुंबई, ठाण्याला इतक्या अत्याधुनिक सुविधा मिळत असताना सीमा भागातील नागरिकांना रस्ते, पाणी, वीज, शाळा, महाविद्यालये, दवाखाने यासारख्या मूलभूत सुविधाही मिळत नाही. देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे उलटूनही पायाभूत सुविधा मिळत नसल्याने सीमा भागातील गावे कर्नाटक, गुजरात, तेलंगणात जाण्यासाठी उत्सुक आहे. सेवा सुविधांचे ठरावीक विकेंद्रीकरण झाल्याने ही वेळ आली आहे. सेवा सुविधांचे ठरावीक भागातच विकेंद्रीकरण झाल्याने सीमा भागातील व उर्वरित महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील जनतेची नाराजी स्वाभाविक आहे. सेवा सुविधांचे हे केंद्रीकरण राज्याचा समतोल विकासाला बाधक आहे म्हणूनच सेवा सुविधा केवळ एका भागापुरतेच मर्यादित न राहता संपूर्ण राज्याला मिळायला हव्यात. सेवा सुविधांचे विकेंद्रीकरण व्हायला हवे.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

### रोजगार उपलब्ध होणे आवश्यक

आपल्या भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशामध्ये रोजगाराच्या असंख्य संधी उपलब्ध व्हायला पाहिजेत. प्रत्येक सुशिक्षित तरुणांच्या हाताला काम असलेच पाहिजे. त्यासाठी उद्योगांची उभारणी करणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. परंतु उद्योगधंदे वाढीसाठी गुंतवणुकीची गरज असते; त्यानुषंगाने जगभरातील गुंतवणूकदार भारताकडे आकर्षित होण्यासाठी सरकारही प्रयत्नशील असायला पाहिजे. त्यातूनच देशातील क्रयशक्तीचा योग्य वापर होऊ शकेल. माहिती आणि तंत्रज्ञान या क्षेत्रातील उद्योगांमध्ये सध्या एआयचा वापर वाढत चालल्यामुळे त्याचा प्रतिकूल परिणाम तरुणांच्या नोकऱ्यावरही होणार असल्याचा अंदाज आहे. एआय तंत्रज्ञान आज जगातील तंत्रज्ञान क्षेत्रातील परवलीचा शब्द झाला आहे. त्यामुळे या क्षेत्रातही भारताने मागे राहून चालणार नाही. आगामी २०३० पर्यंत देशात अमेझॉनसारखी दिग्गज कंपनी पस्तीस अब्ज डॉलरची गुंतवणूक करणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. आणि त्यातून अडोतीस लाख रोजगार निर्माण होणार असे म्हटले आहे. एआयचा कंपनीचा भर असला तरी त्यामुळे रोजगारांची संख्या कमी होणार नसल्याची ग्वाही दिली जात आहे.

देशातील छोट्या उद्योजकांना देखील सरकारकडून विशेष प्रोत्साहनाची गरज आहे. कारण असे छोटे उद्योगही देशांतर्गत रोजगार निर्मितीसाठी महत्त्वाची भूमिका बजावत असतात. आपल्याच देशात पुरेसे रोजगार उपलब्ध झाल्यास परदेशात जाणाऱ्या सुशिक्षितांचा ओघ कमी होऊ शकेल. सध्याच्या काळात जगावर वर्चस्व गाजवण्यासाठी उद्योग-व्यवसाय यांचाच उपयोग केला जात आहे. ज्यामध्ये सध्या चीन आणि अमेरिका यासारखी राष्ट्रे भारताच्याही पुढे आहेत.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी महाविद्यालयाची एनबीए मानांकनात हॅटट्रिक

**तभा वृत्तसेवा**

**औसा, दि. २ जानेवारी :** ग्रामीण भागात अभियांत्रिकी शिक्षणाच्या क्षेत्रात दर्जा, गुणवत्ता आणि शैक्षणिक शिस्त यांचे आदर्श उदाहरण ठरलेल्या औसा तालुक्यातील आलमला येथील श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित विश्वेश्वरय्या इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी महाविद्यालयाला नॅशनल बोर्ड ऑफ अक्रेडिटेशन (एनबीए), नवी दिल्ली यांच्याकडून सलग तिर्सय़ांदा मानांकन प्राप्त झाले असून हटट्रिक पुर्ण झाली आहे.

या मानांकनासाठी महाविद्यालयाच्या कॉम्प्युटर इंजिनीयरिंग, सिव्हिल इंजिनीयरिंग, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनीयरिंग, इलेक्ट्रिकल इंजिनीयरिंग आणि मेकॅनिकल इंजिनीयरिंग या पाच प्रमुख शाखांकरीता एनबीए मानांकनाची मागणी करण्यात आली होती. या पाचही शाखांना मानांकन प्राप्त झाले आहे. या

### महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची भक्कम पावती

सर्व शाखांना सलग तिर्सय़ांदा एनबीए मानांकन मिळाल्यामुळे संस्थेच्या शैक्षणिक दर्जावर व पुन्हा एकदा राष्ट्रीय स्तरावर भक्कम शिक्कामोर्तब झाल्याचे मत संस्थेचे सचिव बसवराज धाराशिवे यांनी व्यक्त केले.

एनबीए मानांकन प्रक्रिया अत्यंत कठोर व बहुआयामी निकषांवर आधारित असते. अभ्यासक्रमाची रचना, अध्यापन पद्धती, शिक्षकांची शैक्षणिक व संशोधन पात्रता, प्रयोगशाळा, अत्याधुनिक ग्रंथालय व पायाभूत सुविधा, उद्योगांशी



असलेली सांगड, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, निकालांची गुणवत्ता, प्लेसमेंट तसेच संस्थेचे दीर्घकालीन शैक्षणिक धोरण या सर्व बाबींचा सखोल अभ्यास करून मानांकन दिले जाते. या सर्व निकषांवर महाविद्यालयाने सातत्याने उत्कृष्ट कामगिरी केल्यामुळे हे मानांकन मिळाल्याचे स्पष्ट झाले आहे.

संस्थेचे अध्यक्ष शिव-चरण धाराशिवे, उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, सचिव बसवराज धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, संचालक जयशंकर हुरदळे, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी आलमला चे चेअरमन विश्वनाथ बिराजद-ार, योगेश धाराशिवे, अमरसिंग हजारी व सर्व संचालक मंडळ यानी समाधान व्यक्त केले.महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, सर्व विभाग

**लातूर जिल्ह्याचा अभिमान उंचावला**

ग्रामिण भागातील विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी महाविद्यालयाने केलेली कामगिरी केवळ संस्थेसाठीच मर्यादित नसून लातूर जिल्ह्याचा आभिमान उंचावणारी आहे. असे मत प्राचार्य प्रशांत धाराशिवे यांनी व्यक्त केले.

प्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या एकत्रित प्रयत्नांचे हे फलित असून, विशेषतः गुणवत्तापूर्ण अध्यापन, कौशल्याधारित शिक्षण, संशोधनास प्रोत्साहन, तसेच विद्यार्थिींना उद्योगाभिमुख बनवण्यावर महाविद्यालयाचा भर असल्याचे संस्थेचे अध्यक्ष शिवचरण धाराशिवे यांनी सांगितले.

महाविद्यालय भविष्यातही नाविन्यपूर्ण शिक्षण पद्धती, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, संशोधन व स्टार्टअप संस्कृतीला चालना देत विद्यार्थ्यांना जागतिक स्पर्धेसाठी सक्षम करण्याचा संकल्प करत असल्याचे संस्थेच्या वतीने सचिव बसवराज धाराशिवे यांनी स्पष्ट केले. या उल्लेखनीय यशाबद्दल शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे, दगडोजीराव देशमुख डी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. कैलास कापसे, ब्ल्यू बर्ड इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्या स्वाती कापसे, विश्वेश्वरय्या इन्स्टीटयुट ऑफ मॅनेजमेंट ॲन्ड टेक्नॉलॉजीचे प्राचार्य किशोर जेवे यांच्यासह सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# राष्ट्रीय स्पर्धेत यशवंतचा साईप्रसाद ठरला गोल्डन बॉय

## जान्हवी जारोधव व रोहिणी पाटील ठरल्या सुवर्णकन्या

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. २ जानेवारी :** २६ ते ३१ डिसेंबर २०२५ दरम्यान छत्रपती संभाजी नगर येथे



६९ व्या १७ वर्षा खालील गटाच्या राष्ट्रीय शालेय तलवारबाजी क्रीडा स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत यशवंत विद्यालयाच्या गुणवंत खेळाडूंनी उत्तम यश संपादन करुन गोल्ड मेडल प्राप्त केले.

सदरील स्पर्धेत यशवंत विद्यालयाचे साईप्रसाद संग्राम जंगवाड,जान्हवी गणपतराव जारोधव, रोहिणी देवराव पाटील यांनी महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करताना साईप्रसादने इपी वैयक्तिक व सांघिक प्रकारात भारता-तून प्रथम क्रमांक पटकावत दोन सुवर्णपदके मिळविली .तर जान्हवी व रोहिनी यांनी इपी सांघिक प्रकारात भारतातून प्रथम क्रमांक मिळवत सुवर्णपदकाची कमाई केली आहे. याचबरोबर जान्हवीची वरिष्ठ गटाच्या आशियाई स्पर्धेसाठी पटियाला येथील प्रशिक्षण शिबिरासाठी निवड झाली आहे.

नूतन वर्षात हा सुवर्णयोग यशवंत विद्यालयाला प्राप्त झाला आहे. जान्हवी व रोहिणी यांनी नुकत्याच दिल्ली येथे पार पडलेल्या वरिष्ठ गटाच्या राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेतही रौप्य पदकही पटकावलेले आहे. वरील यशस्वी खेळाडूंना शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्राप्त दत्ता गलाले, क्रीडा शिक्षक संतोष कदम यांचे मार्गदर्शन लाभले.

या उल्लेखनीय यशाबद्दल टागोर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.अशोक सांगवीकर, संस्थेचे सचिव डी. बी.लोहारे गुरुजी, उपाध्यक्ष डॉ. भालचंद्र पैके,सहसचिव डॉ. सुनिता चवळे, प्राचार्य गजानन शिंदे, उपमुख्याध्यापक माधव वाघमारे, पर्यवेक्षक रामलिंग तत्तापुरे, शिवाजी सुर्यवंशी, क्रीडा शिक्षक, दिपक हिंगणे, प्रभावती मिरजकर, शिक्षकेत्तर कर्मचारी व पालकांनी अभिनंदन करुन त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# लाच घेताना गुंजरगा तलाठी मुंडे रंगेहाथ सापडला

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. २ जानेवारी :** निलंगा तालुक्यातील गुंजरगा सज्जाचा तलाठी कमलाकर विठ्ठलराव मुंडे यांनी उत्पन्नाच्या दाखल्यासाठी २५०० रुपयांची लाच स्वीकारताना लातूरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात सापडला.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, निलंगा तालुक्यातील सोनखेड येथील विमलबाई मोहन सोळंके यांना श्रावण बाळ इंदिरा गांधी वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजनेचा लाभ घेण्यासाठी सादर करावयाच्या अर्जा सोबत उत्पन्नाच्या दाखल्याची गरज होती. उत्पन्नाचे प्रमाणपत्र देण्यासाठी गुंजरगा येथील ग्राम महसूल अधिकारी अर्थात तलाठी कमलाकर विठ्ठलराव मुंडे यांना ५००० रुपयांची मागणी केली होती.

यासंदर्भात तक्रारदारांनी लातूरच्या लातूरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली होती. लाजलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी याबाबतची पडताळणी करून गुरुवार दिनांक १ जानेव-ारी २०२६ रोजी दुपारी शहरातील दत्तनगर भागातील खाजगी तलाठी कार्यालयात तडजोडी अंती २५०० रुपये स्वीकारताना तलाठी कमलाकर मुंडे यांना ताब्यात घेण्यात आले. या प्रकरणी पोलीस उपाधीक्षक संतोष धनसिंग बर्गे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून निलंगा पोलीस ठाण्यात कमलाकर मुंडे यांच्यावर गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे

# सायबर गुन्ह्यांपासून बचावासाठी सतर्कता हाच उपाय : भातलवंडे

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. २ जानेवारी :** आजच्या डिजिटल युगात सायबर फसवणुकीचे प्रकार वाढत असून विद्यार्थ्यांनी विशेष सतर्कता बाळ-गावी, असे आवाहन डीवायएसपी गजानन भातलवंडे यांनी केले, ला-तूर जिल्हा पोलीस प्रशासन तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनानुसार महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात आयोजित सायबर सुरक्षा जागरूकता सत्रात ते बोलत होते.

या वेळी डीवायएसपी भातलवंडे यांनी मोबाईल प्स, ओटीपी, आंतरराष्ट्रीय कॉल्स तसेच डिजिटल अरेस्टसारख्या फसवणुकीच्या प्रकारांबाबत सविस्तर माहिती दिली. अनोळखी लिंक किंवा प्सवर विश्वास ठेवू नये, केवळ अधिकृत स्त्रोतांमधूनच प्स डाउनलोड करावेत व अनावश्यक परवानग्या देऊ नयेत, असे त्यांनी स्पष्ट केले. ओटीपी हा वैयक्तिक पासवर्ड असल्याने तो कोणालाही देऊ नये, बँक अधिकारी किंवा पोलिस असल्याचे सांगून मागितला तरीही ओटीपी शेअर करू नये, असा इशाराही



त्यांनी दिला. तसेच आंतरराष्ट्रीय किंवा संशयास्पद कॉल्स टाळावेत, कॉल फॉरवर्डिंग सुविधा बंद ठेवावी आणि कोणत्याही प्रकारची सायबर फसवणूक झाल्यास त्वरित हेल्पलाईनवर तक्रार नोंदवावी, असे मार्गदर्शन त्यांनी केले. विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शनाचा प्रत्यक्षात अवलंब करून स्वतःसह कुटुंबाचेही सायबर गुन्ह्यांपासून संरक्षण करावे, असे आवाहन यावेळी पी आय राजकुमार पुजारी यांनी केले.

या कार्यक्रमास प्राचार्य डॉ. आर. के. मस्के, उपप्रा-चार्य डॉ. एस. एन. हल्लाळे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पीआय राजकुमार पुजारी आणि पीएसआय सुधाकर केंद्रे, महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

# राजस्व अभियानांतर्गत डोंगरकोनाळी येथे प्रमाणपत्र वितरण

**तभा वृत्तसेवा**

**जळकोट, दि. २ जानेवारी :** महाराष्ट्र राज्य शासनाच्या महसूल विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान अंतर्गत तहसील कार्यालय जळकोट व संबंधित विविध विभागांच्या संयुक्त विद्यमाने डोंगरकोनाळी ता. जळकोट येथे दाखले वितरण व सेवा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या राजस्व शिबिरामध्ये विविध विभागांचे स्वतंत्र स्टॉल उभारून नागरिकांना अनेक शासकीय सेवांचा लाभ देण्यात आला. यावेळी ई-राशन कार्ड वाटप, शेतकऱ्यांना ७/१२ व ८-अ



उतारे, जॉबकार्ड वाटप करण्यात आले. तसेच एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प कार्यालय जळकोट व अंगणवाडीच्या वतीने बेबी केअर किट, आरोग्य तपासणी, कृषी विभागामार्फत फवारणीसाठी औषधांचे वाटप करण्यात आले. ई-केवायसी कॅम्प, दिव्यांग अन-ुदान ई-केवायसी कॅम्प, तसेच उत्पन्न, रहिवासी, ईडब्ल्यूएस व शेतमजूर प्रमाणपत्रांचे वितरणही करण्यात आले. हे शिबिर लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे व उदगीरचे उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.

यावेळी तहसीलदार राजेश लांडगे, नायब तहसीलदार सुहास मुजोळकर, नायब तहसीलदार रंगनाथ कराड, पुरवठा निरीक्षक अधिकारी अर्पण राऊत, शिक्षण विस्तार अधिकारी के. पी. बिराजदार आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्या हस्ते लाभार्थ्यांना दाखले वितरित करण्यात आले.

तहसीलदार राजेश लांडगे यांनी बोलताना म्हणाले जककोट तालुक्यातील नागरिकांना शासकीय कार्यालयांचे खेटे मारावे लागू नयेत, यासाठी शासन यंत्रणाच थेट जनतेपर्यंत पोहोचत असून हे एक जनताभिमुख अभियान आहे, यांचा पुरेपुर आपण लाभ घ्यावेत असे बोल-ताना सांगितले. त्यांनी अधिकाधिक गरजू लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहनही केले.

शिबिरासाठी शासनाच्या विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या शिबिरास या परिसरातील गावातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शासन आपल्या दारी येऊन विविध सेवा गावातच उपलब्ध करून दिल्याबदल गावकऱ्याच्या चेहऱ्यावर काहीशे समाधान दिसून येत होते.



# वेटलिफ्टिंग स्पर्धेत अभिषेक निडवंचे जिल्ह्यात प्रथम

**तभा वृत्तसेवा**

**देवणी, दि. २ जानेव-ारी :** तालुक्याचा सुपुत्र अभिषेक किशोर निडवंचे याने धनपूर जिल्हा मेडीसीटी मेडीकल कॉलेज तेलंगणा राज्यातील धनपूर जि मेडचल या कॉलेज मधुन डब्लू पी सी असोसिएशनच्या वतीने आयोजित वेटलिफ्टिंग पावर चंपीयन्सीपमध्ये ६७.५ वजन गटातून १ क्विंटल ५० किलो वजन उचलून तेलंगणातील मेडचल जिल्ह्तून प्रथम क्रमांक पटकावून देवणीचे नाव देशपा-तळीवर उंचावले असून देवणीच्या शिरपेचात एक मानाचा तुरा रोवला आहे.

या यशाबद्दल सुधाकरराव पाटील निटुरकर, संदीप पाटील आदि सह नातेवाईक व मीत्र परिवारातून अभिनंदन होत आहे.

# म.गांधी महाविद्यालयाचा संघ बॉल बॅडमिंटनमध्ये प्रथम

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. २ जानेवारी :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व महात्मा फुले महाविद्यालय किनगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विभागीय बॉल बॅडमिंटन स्पर्धेमध्ये महात्मा गांधी महाविद्यालयाचा मुलांचा संघ प्रथम आला आहे. सदरील स्पर्धा किनगाव येथील महात्मा फुले महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर संपन्न झाल्या असून, या स्पर्धेत महाविद्यालयातील सय्यद फैजान, सय्यद सईद, सदाशिव शिरोळे, सूर्यवंशी ऋषिकेश, सय्यद अरहान, तांबोळी खलीफ या खेळाडूंनी अत्यंत चुरशीची व चांगली खेळी खेळून महाविद्यालयाच्या क्रीडा विभागाच्या उज्ज्वल व यशस्वी परंपरेत मोलाची भर घातली आहे. या खेळाडू विद्यार्थ्यांना माजी खेळाडू पी.एस. आय. असद शेख व क्रीडा संचालक डॉ विनोद माने यांचे मार्गदर्शन लाभले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयात सत्कार करून संस्थेचे अध्यक्ष अँड किशनराव बेंडकुळे, सचिव अँड पी. डी कदम, कोषाध्यक्ष रामचंद्रराव शेळके, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. पी. पवार, क्रीडा संचालक तथा सिनेट सदस्य, विनोद माने, स्टाफ सेक्रेटरी डॉ. ए. पी. कांबळे, श्री सिद्धेश्र्वर चोथवे, शंकर शेळके व महाविद्यालय परिवाराने हार्दिक अभिनंदन केले आहे.

# निलंगा येथे भीमा कोरेगाव शौर्यदिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. २ जानेवारी :** निलंगा शहरातील अशोक नगर येथे २०८ वा भीमा कोरेगाव शौर्य



दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल व डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या वतीने अशोक नगर येथील बुद्ध विहारात २०८ वा भीमा कोरेगाव शौर्यदिनाचे आयोजन करण्यात आले होते.

स्वतःच्या न्याय हक्कासाठी व माणूस म्हणून सन्माननीय जगण्याचा अधिकार मिळावा यासाठी १जानेवारी १८१८ रोजी ५०० महार सैनिकांनी रणसंग्राम पुकारला होता. यात शहीद झालेल्यांना मानवंदना देऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी तानाजी सुरवसे, अमित गायकवाड, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष धम्मानंद काळे, केतन सुरवसे,नगर सेवक सचिन गायकवाड, ड बी. आर. धैर्य, धम्मानंद सुर्यवंशी, कुलभूषण कांबळे, साहिल, मानव, प्रेम, चेतन गायकवाड, चेतक, ऋतिक, बुद्धभूषण, पवन कांबळे, अर्जुन, सिद्धार्थ सुरवसे, पांडुरंग पात्रे,साकेत विशाल गायकवाड, समता सैनिक, विदिशा विशाल गायकवाड, महिला प्रतिनिधी मदाळेताई, सर्व समता सैनिक दल उपस्थित होते. यावेळी इंद्रजित कांबळे सर समता सैनिक वाढली पाहिजे यावर मार्गदर्शन केले, तसेच समता सैनिक प्रमुख विशाल गायकवाड यांनी शौर्य दिनाचे महत्व सांगितले सामाजिक समता स्थापित करण्यासाठी शील संपन व्यक्ती घडविण्यासाठी समता सैनिक दलाची गरज आहे.

# बिटरगाव शाळेच्या विज्ञान प्रयोगची राज्यस्तरावर निवड

**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर, दि. २ जानेवारी :** तालुक्यातील बिटरगाव शाळ-ेला अहमदपूर येथे झालेल्या ५३ व्या जिल्हास्तरीय विज्ञान२०२५-२०२६ प्रदर्शनात बिटरगाव जि प शाळेला मोठे यश मिळाले असून या शाळेच्या प्रयोगास राज्यस्तरावर निवड झाल्याची माहिती शाळेचे मुख्याध्यापक राजेश्र्वर व्यवहारेंनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना दिली.

या शाळेचा प्राथमिक गट इयत्ता पहिली ते आठवी या गटात द्वितीय क्रमांक मिळाला यापूर्वी तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात याच प्रयोगाला तालुकास्तरीय दुहेरी दोन प्रथम बक्षीस मिळाली. या प्रयोगाचे नाव अटर सॉफ्टवेअर द्वारे रोबोटला स्वयंचलित करणे असे असून कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून विद्यार्थ्यांने रोबोटला स्वयंचलित करून प्रयोग सादर केला. या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी कृष्णा भराडिया गटविकास अधिकारी सुमित जाधव, शिक्षण विस्तार अधिकारी देशपांडे, लहाने, खंदाडे, जाधव, मुख्याध्यापक बळीराम चव्हाण शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष गोपाळ आलापुरे, सरपंच महेंद्र पाटील, सायांन्ना तोटावाड, शोभा कांबळे, शकुंतला कदम ,वर्षा ठोंबरे, कल्पना कटके, माणिक पवार, प्रमोद कटके यांनी विद्यार्थी शिक्षक त्यांचे अभिनंदन केले.

## जाहीर प्रगटन/सायटेशन नोटीस

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूर अनंतपाळ यांचे कार्यालय (दंडनीय विभाग)**

जा.क्र. २०२५एमएजी कावि ०८ दि.१/१/२६

तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूर अनंतपाळ यांच्या न्यायालयात

**जाहीर प्रगटन**

**जन्म मृत्यू नोंदणी बाबत**

श्री. ईस्माईल खाजा शेख विरुद्ध ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय बाकली ज्याअर्थी नामे कासीम इस्माईल शेख रा. बाकली ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर यांचा/यांच्या मुलाचा/ मुलीचा/ नाताचा/ना-तीचा जन्म दि.१२/४/२००३ रोजी मौजे बाकली ता. शिरूर अनंतपाळ जि.लातूर येथे झाला आहे. ज्याअर्थी अर्जदार इस्माईल खाजा शेख रा. बाकली यांनी या न्यायालयात त्यांच्या मुलाच्या/ मुलीच्या/ नाताच्या/ नातीच्या जन्माची नोंद करण्यासाठी आदेशित करावे असा अर्ज दाखल केला आहे. त्या पृष्ठयार्थ त्याने शपथ पत्र ग्रामपंचायत कार्यालय बाकली ता. शिरूर अनंतपाळ जि.लातूर येथे त्यांच्या जन्मबाबतची नोंद नसल्याचे प्रमाणपत्र जोडले आहे. त्याअर्थी सदरहु नामे कासीम इस्माईल शेख रा. अंकुलगा राणी ता. शिरूर अनंतपाळ जि.लातूर ह्याचा/ हिचा जन्म दि.१२/४/२००३ रोजी झाला नाही, असे कोणाला सांगावयाचे असेल तर या जाहीरनाम्याच्या तारखेपासून पंधरा दिवसाचे आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदरहु नामे कासीम इस्माईल शेख रा.बाकली ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर यांच्या जन्म तारखेबाबत लागलीच पुरावा घेऊन अर्जदाराच्या हक्कात सदरहू जन्म तारखेबाबत आदेश देण्यात येईल.

**स्वाक्षरीत**
**तहसीलदार तथा**
**तालुका दंडाधिकारी कार्यालय**
**शिरूर अनंतपाळ**

## जाहीर प्रगटन/सायटेशन नोटीस

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूर अनंतपाळ यांचे कार्यालय (दंडनीय विभाग)**

जा.क्र. २०२५ एमएजी कावि दि.१/१/२६

तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूर अनंतपाळ यांच्या न्यायालयात

**जाहीर प्रगटन**

**जन्म मृत्यू नोंदणी बाबत**

श्री. ईस्माईल खाजा शेख विरुद्ध ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय बाकली ज्याअर्थी नामे इरफान इस्माईल शेख रा. बाकली ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर यांचा/यांच्या मुलाचा/ मुलीचा/ नाताचा/ना-तीचा जन्म दि.८/५/२००८ रोजी मौजे बाकली ता. शिरूर अनंतपाळ जि.लातूर येथे झाला आहे. ज्याअर्थी अर्जदार इस्माईल खाजा शेख रा. बाकली यांनी या न्यायालयात त्यांच्या मुलाच्या/ मुलीच्या/ नाताच्या/ नातीच्या जन्माची नोंद करण्यासाठी आदेशित करावे असा अर्ज दाखल केला आहे. त्या पृष्ठयार्थ त्याने शपथ पत्र ग्रामपंचायत कार्यालय बाकली ता. शिरूर अनंतपाळ जि.लातूर येथे त्यांच्या जन्मबाबतची नोंद नसल्याचे प्रमाणपत्र जोडले आहे. त्याअर्थी सदरहु नामे इरफान इस्माईल शेख रा. अंकुलगा राणी ता. शिरूर अनंतपाळ जि.लातूर ह्याचा/ हिचा जन्म दि.८/५/२००८ रोजी झाला नाही, असे कोणाला सांगावयाचे असेल तर या जाहीरनाम्याच्या तारखेपासून पंधरा दिवसाचे आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदरहु नामे इरफान इस्माईल शेख रा.बाकली ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर यांच्या जन्म तारखेबाबत लागलीच पुरावा घेऊन अर्जदाराच्या हक्कात सदरहू जन्म तारखेबाबत आदेश देण्यात येईल.

**स्वाक्षरीत**
**तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी कार्यालय**
**शिरूर अनंतपाळ**

# दत्तभक्तांसाठी पावन पर्व : श्री दत्त संस्थान बालाघाट येथे पौष शुद्ध पौर्णिमा उत्सव

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ जानेवारी**

बीड तालुक्यातील कपिलधारवाडी (मांजरसुंबा) येथील श्री दत्त संस्थान बालाघाट येथे पौष शुद्ध पौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त शनिवार, दि. ०३ जानेवारी २०२६ रोजी भव्य धार्मिक उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा उत्सव प.पु.ष.ब्र. श्री १०८ शिवानंद शिवाचार्य महाराज (तमलुरकर) यांच्या कृपाशीर्वादाने तसेच दत्त उपासक वैजिनाथ महाराज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात येत आहे. पौष शुद्ध पौर्णिमा हा दत्तभक्तांसाठी अत्यंत पवित्र व महत्त्वाचा दिवस मानला जात असून, यानिमित्त दरवर्षी मोठ्या संख्येने भाविक बालाघाट येथे दर्शनासाठी उपस्थित राहतात.

उत्सवानिमित्त सकाळपासून अभिषेक, पूजा-अर्चा, धार्मिक विधी व भजन आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, या महाप्रसादासाठी जगन्नाथ दगडू शिंदे (कपिलधारवाडी, छ. संभाजीनगर) व गोरख देवराव शिंदे (कपिलधारवाडी) हे अन्नदाते म्हणून लाभ घेणार आहेत.या पावन प्रसंगी पंचक्रोशीतील तसेच परिसरातील सर्व दत्तभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शन व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री दत्त संस्थान बालाघाट यांच्या वतीने करण्यात आले आहे.बालाघाट येथील श्री दत्त मंदिर हे परिसरातील श्रद्धेचे प्रमुख केंद्र असून येथे सातत्याने होणाऱ्या धार्मिक उपक्रमांमुळे भाविकांमध्ये भक्तीभाव अधिक दृढ होत आहे. भाविकांचा वाढता प्रतिसाद लक्षात घेता, भविष्यात अधिक व्यापक स्वरूपात धार्मिक उत्सव, सेवा उपक्रम तसेच समाजोपयोगी कार्यक्रम राबविण्यात येणार असल्याचे संस्थानच्या वतीने सांगण्यात आले.

या सर्व उपक्रमांना प.पु.ष.ब्र. श्री १०८ शिवानंद शिवाचार्य महाराज (तमलुरकर) यांचे आशीर्वाद लाभत असून, दत्त उपासक वैजिनाथ महाराज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थानचा धार्मिक व सामाजिक कार्याचा विस्तार होत आहे. यापुढील प्रत्येक शुद्ध पौर्णिमेला भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दत्तसेवेचा लाभ घ्यावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ.गीताभाभी बाळराजे पवार यांचा पदग्रहन सोहळा उत्साहात



**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२ जानेवारी**

विश्वास खूप मोठी आणि जबाबदारीची गोष्ट असून, शहरातल्या नागरिकांनी मोठा विश्वास दाखवला आहे. हा विश्वास जाती - पातीच्या भिंती भेदून विकासाचा मार्ग दाखवणारा असून, गेवराईच्या मतदारांनी टाकलेल्या विश्वासाला कदापी तडा जाऊ देणार नाही. असे प्रतिपादन भारतीय जनता पक्षाचे नेते बाळराजे पवार यांनी येथे केले. गेवराई शहराने कौल दिला. शहराच्या सर्वांगीण विकासात आम्ही कमी पडणार नाही. आता, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत विजय मिळवून इतिहास करू, दादा-आबांच्या नेतृत्वाला बळ देण्यासाठी सज्ज व्हा,असे आवाहन माजी मंत्री बदामराव पंडित यांनी येथे बोलताना केले आहे.गेवराई नगरपरिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. गीताभाभी पवार यांचा पदग्रहण समारंभ गुरुवार दि. १ जानेवारी २०२६ रोजी नगर परिषद कार्यालय, येथे मोठ्या उत्साहात पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी मंत्री बदामराव पंडित, मुख्याधिकारी विक्रम महाडूरके, माजी सभापती युध्दाजित पंडित, रोहित पंडित, नानी मोटे, अमोल करांडे, भाजपाचे नेते श्रीकांत सानप, शिवराज पवार, ज्येष्ठ नगरसेवक राजेंद्र राक्षसभुवनकर, माजी नगराध्यक्ष सुशिल जवंजाळ, आदित्य बाळराजे पवार, दादासाहेब गिरी, यांच्यासह सर्व नवनिर्वाचित नगरसेवक उपस्थित होते.

पुढे बोलताना बाळराजे पवार यांनी आपली भूमिका मांडताना सांगितले की, विकास ही एक दिवसात पूर्ण होणारी बाब नसून ती निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेला अधिक गती देण्याचे काम आपण सर्वांनी मिळून करायचे आहे.

# प्रभाग २ मधील मतदारांचे ऋण कधीच विसरणार नाही – बाळराजे पवार

## गणेश नगर येथे नवनिर्वाचित नगराध्यक्षा व नगरसेवकांचा भव्य नागरी सत्कार सोहळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२ जानेवारी**

गेवराई नगरपरिषद निवडणुकीत प्रभाग क्रमांक २ मधील मतदारांनी आपल्यावर भरभरून विश्वास टाकत दिलेल्या भक्कम पाठिंब्याचे ऋण आपण कधीही विसरणार नाही, असे प्रतिपादन भाजपचे नेते बाळराजे पवार यांनी केले. प्रभाग २ मधील गणेशनगर येथील दत्त मंदिर परिसरात आयोजित नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. गीताभाभी बाळराजे पवार व सर्व नगरसेवकांच्या नागरी सत्कार सोहळ्यात ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. गीताभाभी पवार, माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या सुविद्य पत्नी सौ. गिरीकाभाभी पवार, युवा नेते यशराज पंडित, शिवराज पवार, माजी नगराध्यक्ष सुशील जवंजाळ, उपनगराध्यक्ष राजेंद्र राक्षसभुवनकर, अमोल करांडे, दादासाहेब गिरी, ड. भगवान घुंबर्डे, मधुकर तौर, सुभाष सुतार, गणेश क्षीरसागर, बबलू खराडे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

बाळराजे पवार पुढे म्हणाले की, गत निवडणुकीत प्रभाग क्रमांक २ मधील आमला एक उमेदवार अवघ्या दोन मतांनी पराभूत झाला होता. मात्र त्या पराभवाचा राग मनात न ठेवता या प्रभागाचा विकास कुठेही थांबू नये, यासाठी त्या उमेदवाराला स्वीकृत सदस्य म्हणून संधी देण्यात आली



होती. विकास हा व्यक्तीवर नव्हे तर प्रभागाच्या हितावर आधारित असावा, हीच आमची भूमिका आहे.

मात्र यावेळी प्रभागातील जनतेने मागील पराभवाचा वचपा काढत दोन्ही नगरसेवकांसह नगराध्यक्ष पदासाठीही मोठी मताधिक्याची आघाडी दिली आहे. हा विश्वास आमच्यासाठी प्रेरणादायी असून प्रभाग २ च्या विकासासाठी आम्ही सदैव कटिबद्ध राहू, असे त्यांनी ठामपणे सांगितले. गेवराई नगरपरिषदेच्या माध्यमातून शहराचा सर्वांगीण व शाश्वत विकास साधण्याचा आमचा निर्धार आहे. केवळ आश्वासनांची खैरात न करता प्रत्यक्षात लोकाभिमुख कामे करून दाखवण्यावर आमचा भर राहील. विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर पारदर्शकता आणि लोकसहभाग जपला जाईल. गेवराई शहरासह प्रभाग क्रमांक २ मधील जनतेचे ऋण कधीही विसरणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.

हा नागरी सत्कार सोहळा यशस्वी करण्यासाठी कमलाकर पाठक, ड. सोपान मडके, शेळके काका, सुरज अर्दड, गणेश वारे, अर्जुन तपासे, राहुल वणवे, बाळासाहेब राठोड, अशोक मोताळे, प्रसन्ना जोशी, मुहेश कुलकर्णी, बाळू पोपळघट, पुरुषोत्तम जोशी, प्रदीप वाघमारे, गवारे काका, संतोष तपासे, अतुल उबाळे, हरीश कांडेकर यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कमलाकर पाठक यांनी केले, सूत्रसंचालन पत्रकार भागवत जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन ड. सोपान मडके यांनी केले.

**गेवराईला एक आदर्श शहर बनवून देशाच्या नकाशावर नेऊ – सौ.गीताभाभी पवार**

नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. गीताभाभी पवार यांनी आपल्या भाषणात सांगितले की, येणाऱ्या काळात गेवराई शहराच्या विकासासाठी महिलांचा सक्रिय सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. महिलांनी पुढे येऊन शहर विकासात योगदान द्यावे. तुम्ही सर्वजण माझ्या सोबत ठामपणे उभे रहा, मी तुमच्यासाठी सदैव तत्पर राहीन. लोकसहभागाच्या बळावर आपण गेवराई शहराला एक आदर्श शहर बनवून राज्यासह देशाच्या नकाशावर नेऊ, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# वाचन संस्कृतीच्या संवर्धनासाठी पुस्तकांशी मैत्री करा

## जयभवानीत वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमांतर्गत भव्य ग्रंथप्रदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**पाटोदा दि.२ जानेवारी**

पाटोदा येथील जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा ग्रंथालय विभागाच्यावतीने दि. ०१ – ०२ जानेवारी २०२६ रोजी 'वाचन



संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत महाविद्यालयात भव्य ग्रंथप्रदर्शन भरविण्यात आले. यावेळी भारतीय ग्रंथपालनशास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांना अभिवादन करण्यात आले. या ग्रंथप्रदर्शनाचे उदघाटन श्री.शिवाजीराव पंडित महाविद्यालय, शिवाजीनगर,गढी चे प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांनी केले. वाचन संकल्प महाराष्ट्राचा या कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे, प्रा.डॉ. सुनील जाधव ,प्रा.सोमनाथ घाडगे हे उपस्थित होते तर महाविद्यालयीन समिती सदस्य ग्रंथपाल प्रा. ज्योती रकटे, प्रा. डॉ. वंदन जाधव, प्रा. बापू घोक्षे, अंतर्गत मूल्यमापन समितीचे प्रमुख प्रा. विनोद किर्दक, रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.लोखंडे बंडू, प्रा. डॉ.शिवाजी काकडे, कनिष्ट विभाग प्रमुख प्रा. प्रकाश नाईकवाडे, प्रा. सतीश जरांगे यांची उपस्थिती होती. प्रास्ताविकात ग्रंथपाल प्रा. ज्योती रकटे यांनी ग्रंथप्रदर्शनामागील भूमिका स्पष्ट केली. 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या मोहिमेद्वारे महाविद्यालयात एक समृद्ध वाचन संस्कृती रुजवून, विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाला चालना देणे आणि त्यांना ज्ञानाधिष्ठित समाजाचे जबाबदार घटक बनवणे, हे या उपक्रमाचे मूळ उद्दिष्ट आहे असे सांगितले. उद्घाटनाप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. विश्वास कदम म्हणाले कि, आजच्या डिजिटल आणि वेगवान युगात युवा पिढीचा कल पुस्तकांपेक्षा स्क्रीनकडे अधिक वाढत आहे. या पार्श्वभूमीवर, विद्यार्थ्यांना दर्जेदार साहित्याची प्रत्यक्ष ओळख करून देऊन त्यांच्यात वाचनाची अभिरुची पुन्हा निर्माण करणे तसेच पुस्तके ही केवळ माहितीची साधने नसून ती विद्यार्थ्यांची वैचारिक प्रगल्भता आणि चरित्र घडवणारे सच्चे मित्र आहेत. या ग्रंथ प्रदर्शनात वाचनीय पुस्तके, विविध संदर्भग्रंथ, कथा, कादंबरी ठेवण्यात आले होते. वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाच्या माध्यमातून महाविद्यालयातील ग्रंथसंपदा वाचकांना उपलब्ध करून देण्यात आली. सदर वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत ०१ जानेवारी ते १५ जानेवारी या कालावधीत वाचन पंधरवडा राबविण्यात येणार असून या उपक्रमाच्या माध्यमातून प्रश्नमंजुषा, निबंध स्पर्धा, सामुहिक वाचन, वाचन संवाद, वाचन कौशल्य कार्यशाळा यासारखे अनेक उपक्रम या दरम्यान घेण्यात येणार आहेत. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ अशोक देवगुडे यांनी केले तर आभार प्रा. डॉ. प्रा. लोखंडे बंडू यांनी मानले. या ग्रंथप्रदर्शनात सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर वृंद, विद्यार्थी तसेच वाचकांनी आपला सहभाग नोंदवला.

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या रा.से.यो.शिबिराचे उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२ जानेवारी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने शाश्वत विकास, पाणलोट व्यवस्थापक व पडीक जमीन विकासासाठी युवा शक्ती या ब्रीदा अंतर्गत दि १ जानेवारी रोजी रामपिंपळगाव येथे सात दिवशीय शिबिराचे उद्घाटन संपन्न झाले.

दि. १ ते ७ जानेवारी २०२६ या कालावधीत सात दिवसीय विशेष निवासी शिबिर रामपिंपगाव येथे आयोजित करण्यात आले आहे.उद्घाटनपर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जी.के.सानप होते तर उद्घाटन सरपंच रामेश्वर चाळक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. एन. के. मुळे,उपप्राचार्य डॉ. एम.ए.कव्हळे, उपसरपंच लांबुड,तलाठी इंगळे मॅडम, शुभम वाणी,मुख्याध्यापक कांबळे,कार्यक्रमाधिकारी बिलास काळे यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी बोलताना सरपंच रामेश्वर चाळक म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिराच्या माध्यमातून गावात नक्कीच सकारात्मक बदल घडेल असा आशावाद व्यक्त व्यक्त करून सहकार्याची भावना व्यक्त केली. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. जी. के.सानप म्हणाले की, युवकांनी शिक्षणाबरोबरच सामाजिक विषयांवर व्यक्त झालं पाहिजे. सामाजिक प्रश्नांची उकल करण्याची क्षमता युवकांमध्ये आहे. युवकांच्या या क्षमतेला राष्ट्रीय सेवा योजनेच्या विविध उपक्रमांच्या माध्यमातून चालना मिळते. राष्ट्रीय सेवा योजनेमुळे विद्यार्थ्यांचा सामाजिक प्रश्नांकडे बघण्याचा दृष्टिकोन सकारात्मक बनतो. यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. एन. के. मुळे, उपप्राचार्य डॉ. एम. ए.कव्हळे यांनी मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. बिलास काळे यांनी केले. सूत्रसंचालन स्वयंसेविका नंदनी गर्गे तर आभार प्रतीक्षा ढगे हिन मानले.याप्रसंगी रासेयो स्वयंसेवक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# देश महासत्ता होण्यासाठी तरुणांनी उद्योग व्यवसायाकडे वळावे–अभय कोकड

## सिद्धेश्वर महाविद्यालयात उद्योजकता विकास कार्यशाळेचे उदघाटन

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२ जानेवारी**

देश महासत्ता होण्यासाठी तरुणांनी उद्योग व्यवसायाकडे वळावे असे प्रतिपादन सिद्धेश्वर महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड यांनी केले. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर व श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित उद्योजकता विकास कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.





अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी हे तर महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी अमृत पुणे चे जिल्हा व्यवस्थापक विशाल जोशी, जिल्हा उद्योग केंद्राचे प्रकल्प अधिकारी दत्तात्रय क्षीरसागर उपस्थित होते. पुढे बोलताना अभय कोकड म्हणाले की, विद्यार्थ्यांनी विद्यार्थी जीवनापासूनच स्वतःचा छोटा मोठा लघुउद्योग सुरू करावयास हवा ज्या माध्यमातून आपल्याला अर्थप्राप्ती होऊ शकते. त्यासोबतच सोशल मीडियाचा प्रभावी वापर करून आपल्या उत्पादनाचे प्रभावी मार्केटिंग हे केले पाहिजे. विशाल जोशी म्हणाले की, शासनाने विद्यार्थ्यांच्या भविष्यात उद्योग व्यवसायासाठी सारथी भारती महाज्योती अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ यांच्या माध्यमातून स्वयंरोजगाराचे विविध साधने निर्माण केले आहे. दुसऱ्या सत्रामध्ये दत्तात्रय क्षीरसागर म्हणाले की, आपण आपल्या उद्योगातूनच आपली सामाजिक प्रतिष्ठा निर्माण करू शकतो. नोकरीच्या पाठीमागे न लागता छोटे-मोठे उद्योग जर तुम्ही आता सुरू केले तर भविष्यात तो तुमचा उद्योग तुम्हाला नक्कीच पैसा व प्रतिष्ठा मिळवून देईल. मार्केटिंग, संवाद कौशल्य, आपण जर आत्मसात केली तर आपल्याला मोठ्या प्रमाणात बँका भांडवल उपलब्ध करून देतील. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी म्हणाले की, छोटे छोटे कौशल्यातून देखील तुम्ही स्वतःचा व्यवसाय सुरू करू शकता. रांगोळी, मेहंदी, फुलांची ज्वेलरी तयार करणे यासारख्या छोट्या उद्योगातून देखील तुम्हाला भरपूर प्रमाणात आर्थिक उत्पन्न मिळू शकते. प्रास्ताविक संयोजक डॉ. महेश देशमुख यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. रमेश गटकळ यांनी केले तर आभार संयोजक प्रा. अशोक होके यांनी मानले. कार्यशाळेसाठी उपप्राचार्य डॉ. गजानन होंन्ना, डॉ. युवराज मुळये, प्रा. अंकुश साबळे, पर्यवेक्षक प्रा. परमेश्वर खेत्री, प्रा.प्रवीण गिल्डा, प्रा. अभय येवतेकर, प्रा. नामदेव हेडे तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गुरुकृपा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसीचे प्रा.डॉ. अमित बिंदू यांना पीएच.डी. पदवी प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२ जानेवारी**

गुरुकृपा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी येथील प्राचार्य आणि गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अमित बिंदू यांनी पीएच.डी. सर्वोच्च शैक्षणिक पदवी प्राप्त केल्याबद्दल शिक्षणक्षेत्रात आनंद व अभिमानाची भावना व्यक्त होत आहे. डॉ. अमित बिंदू यांना राजस्थान येथील सनराईज या प्रतिष्ठित विद्यापीठातर्फे फार्मास्युटिक्स या विषयात पीएचडी मिळाली आहे. त्यांनी सादर केलेल्या संशोधन प्रबंधाचा विषय फॉर्म्युलशन, डेव्हलपमेंट अँड ईव्होल्युएशन ऑफ स्मुथ अँटीफंगल नॅनोजल हा होता. त्यांच्या या उल्लेखनीय शैक्षणिक यशाबद्दल गुरुकृपा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी परिवाराच्या वतीने त्यांचे सहर्ष अभिनंदन करण्यात आले आहे.



डॉ. अमित बिंदू यांच्या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेत भर पडली असून विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड निर्माण होण्यास निश्चितच चालना मिळणार आहे असे प्रतिपादन गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे अध्यक्ष डॉ यशवंत राजेभोसले यांनी कौतुक सोहळ्यात केले.

# घोषवादन-नवति स्वरशक्ती चा रविवारी बीड येथे भव्य जागर ....

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ जानेवारी**

राष्ट्रसेविका समिती स्थापनेला ९० वर्षे पूर्ण होत असताना, घोषवादन -नवति स्वरशक्ती चा भव्य जागर बीड येथे होत आहे. राष्ट्रसेविका समिती विविध कार्यक्रमातून समाजात सेवा, समर्पण, राष्ट्रभक्तीचा भाव निर्माण करते.

घोषवादन हे केवळ संगीत नसून आपल्यात एकाग्रता ,अनुशासन निर्माण करणारी एक साधन आहे .राष्ट्रसेविका समितीच्या शाखेतून स्त्री शक्तीचे संघटन हा मंत्र जपत, व्यायामयोग, खेळ, गीत असे शारीरिक आणि बौद्धिक कार्यक्रम होत असतात. घोष हा शारीरिक विभागाचे अभिन्न अंग आहे . सैन्यदलात बँडवर पश्चिमात्य शैलित वादन होत असे, त्याला भारतीय रचनेत बसून संघ आणि समितीत घोषवादन सुरू झालेले आहे .



आपल्या परंपरेत भगवान श्रीकृष्णाने पांचजन्य आणि अर्जुनाने देवदत्त' घोषणाद युद्धप्रसंगी केलेला आहेच ,सैन्याचे मनोबल वाढवणे, प्रतिस्पर्ध्याचे खच्चीकरण करण्यासाठी हा घोषणाद महत्त्वपूर्ण ठरतो .शूरवीरांच्या माथ्यावर टिळा, त्याप्रमाणे युद्धात घोषणाद.

निवृत्त सेनाअधिकाऱ्याच्या मार्गदर्शनाखाली स्वयंसेवक,सेविकांनी भारतीय रचना घेऊन घोषवादन सुरू केले, यात अनक, पणव ,त्रिभुज, शंख, झल्लरी,तूर्य ,गोमुख ,स्वरदा,नागांग ही वाद्य महत्त्वाची ,यासाठी प्रशिक्षणवर्ग ,घोष शिबिरे घेऊन आज हजारो स्वयंसेवक, समितीच्या सेविका घोषवादन करतात.

कदम से कदम, और मन से मन जोडकर संघटन बढाने हेतू हे घोषवादन महत्वपूर्ण कार्य करते .एक एक पावला जुळताना पावलाचे रे मन जुळताना संघाचा विश्वास आहे की पावलं जुळले की मन जुळतात म्हणून पाऊल जुळवण्यासाठी शूर वीर रसातील घोषवादन करून वीर रसाचा संचार करतात,यातून मनमनामधील लहान थोर भावना विलुप्त होऊन आम्ही सर्व एका दिशेने चालणारे समान आहोत ही भावना वाढीस लागते.

भारतीय रचना आता नौसेनादलात आणि मोठ्या समारंभातून देखील वाजवल्या जात आहेत .सहयोग ,संस्कार आणि समता याची रुजवण या घोषनादातुन होते .ओंकार या महानादातून सृष्टी निर्माण झाली, नादस्वर, ध्वनी परमेश्वराकडे घेऊन जात चित्त स्थिर करतो, असे घोषवादन 'स्वर शक्ती चा जागर बीडमध्ये होणे ही एक पर्वणीच आहे ,हे स्वर आणि त्याचे महत्व कानी पडावे यासाठी उपस्थित राहणे हे भाग्यवंताचे ठरणारे आहे.

९० पेक्षा जास्त सेविका, गणवेशात हे घोषवादन ,मातृभूमी वंदन करणार आहेत. यावेळी पुणे येथील सौ धनश्री केदार- फाटक आणि राष्ट्रीय कीर्तनकार ह. भ. प. प्रज्ञा भरतबुवा रामदासी यांची ही प्रमुख उपस्थिती आहे ,तर यायलाच पाहिजे.... रविवारी बरोबर दुपारी चार वाजता ,सिद्धिविनायक संकुलात.



गेवराईच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष सौ.गिताभाभी यांच्या पदग्रहण सोहळ्या निमित्त नगराध्यक्षा सौ गिताभाभी पवार व बाळराजे दादा पवार यांचा मा.उपनराध्यक्ष दादासाहेब गिरी व सौ.संगिता गिरी यांनी शुभेच्छा दिल्या

# नववर्षाच्या पहिल्याच दिवशी बालविवाह निर्मूलनाचा निर्धार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ जानेवारी**
जिल्ह्यात एकही बालविवाह घडू नये यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध असून, बालविवाह प्रतिबंधासाठी सर्व संबंधित यंत्रणांच्या संयुक्त विद्यमाने प्रभावी उपाययोजना राबविण्यात येत आहेत. नववर्षाच्या पहिल्याच दिवशी बालविवाह निर्मूलनाचा ठाम निर्धार व्यक्त करत जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली विवाहसेवा पुरवठादारांची महत्वपूर्ण बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली.
जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीत बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ संदर्भात सविस्तर माहिती देण्यात आली. जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी बालविवाहाची सद्यस्थिती, त्यामागील कारणे व होणारे दुष्परिणाम याबाबत मार्गदर्शन केले. बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ मधील तरतुदी स्पष्ट करताना त्यांनी सांगितले की, शाळेचे अभिलेख, मॅट्रिक किंवा समतुल्य प्रमाणपत्र, जन्म दाखला आदी दस्तऐवजांच्या आधारे वयाची पडताळणी करणे अनिवार्य असून, कोणतेही दस्तऐवज उपलब्ध नसल्यास प्रकरण बालकल्याण समितीकडे पाठविणे बंधनकारक आहे.
यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी विवाहसेवा पुरवठादारांना स्पष्ट सूचना देत सांगितले की, बालविवाह होत असल्याचे आढळल्यास कोणतीही सेवा देण्यास नकार द्यावा व तात्काळ चाईल्ड हेल्पलाईन १०९८ वर तक्रार करावी. तक्रारदाराची ओळख गोपनीय ठेवण्यात येते तसेच ८५४५०८८५४५ या क्रमांकावर व्हॉट्सअ‍ॅपद्वारेही तक्रार नोंदविता येते. प्रत्येक मंगल कार्यालयात नोंदणी रजिस्टर ठेवून प्रत्येक विवाहाची नोंद करणे, शाळा सोडल्याच्या दाखल्याची सत्यप्रत, स्वाक्षरी व शाळेचा शिक्का तपासणे तसेच बालविवाह प्रतिबंधाबाबत जनजागृती करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. ज्या गावात बालविवाह घडेल, त्या गावाला शासनाचा कोणताही निधी दिला जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.
या बैठकीस एकूण ४५ विवाहसेवा पुरवठादार उपस्थित होते. यामध्ये मंगल कार्यालय व्यवस्थापक, प्रिंटिंग प्रेस संघटनेचे अध्यक्ष, फोटोग्राफर, केटरर्स, मंडप डेकोरेटर, विविध धर्मांचे धार्मिक संघटनांचे प्रतिनिधी, भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष व सदस्य तसेच सर्व धर्मांचे धर्मगुरू सहभागी झाले होते.
बैठकीच्या शेवटी उपस्थित सर्व सेवा पुरवठादारांनी बालविवाहास कोणतीही सेवा पुरविणार नाही असा सामूहिक संकल्प केला. तसेच नवीन वर्षाच्या शुभदिनी हिंगोली जिल्हा बालविवाहमुक्त करण्यासाठी आपल्या स्तरावरून सर्वतोपरी प्रयत्न करण्याची ग्वाही दिली.
बैठकीस उपस्थित सर्व सेवा पुरवठादारांचे आभार सदस्य सचिव, बालविवाह निर्मूलन जिल्हा कृती दल तथा जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी संतोष दरपलवार यांनी मानले. या बैठकीच्या यशस्वीतेसाठी जिल्हा बाल संरक्षण अधिकारी सरस्वती कोरडे, राजरत्न पाईकराव, वरिष्ठ प्रकल्प समन्वयक बाळू राठोड, प्रकल्प समन्वयक मोनाली धुर्वे, जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे अनिरुद्ध घनसावंत, हिंगोली चाईल्ड हेल्पलाईन १०९८ चे अंकुर पाटोडे, विकास लोणकर, सुरज इंगळे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# दोन लाख पर्यंतच्या पीक कर्जावर मुद्रांक माफ- मंत्री बावनकुळे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ जानेवारी**
राज्य शासनाने शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी पात्र शेतकऱ्यांचे पीक कर्ज ३ जून २०२६ पर्यंत माफ करण्याचा निर्णय घेतला असून, तसेच यापुढे दोन लाख रुपयांपर्यंतच्या पीक कर्जावर कोणतेही मुद्रांक शुल्क आकारले जाणार नाही. तसेच तहसील व उपविभागीय अधिकारी कार्यालयातील कागदपत्रे ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यामुळे प्रलंबित प्रकरणे एका वर्षात निकाली काढली जातील, असेही त्यांनी सांगितले.
राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी मराठवाड्याच्या दुष्काळमुक्तीसाठी शासनाने जलयुक्त शिवार योजना, नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना तसेच शेतरस्ते मोकळे करण्यासारखे ऐतिहासिक निर्णय घेतल्याचे नमूद केले. जलेश्वर तलावातील गाळ काढल्यामुळे जलसाठा वाढून शहराच्या सौंदर्यात भर पडली असून, चिरागशहा तलावातील गाळ काढण्यासाठीही निधी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.
आमदार तानाजी मुटकुळे यांनी सांगितले की, जलेश्वर तलावातून जवळपास दोन लाख टिप्पर गाळ काढण्यात आला असून, यामुळे सुमारे एक हजार एकर जमीन सुपीक झाली आहे. नोंदणी केलेल्या जवळपास ३०० शेतकऱ्यांना प्रती हेक्टरी ३६ हजार रुपयांच्या मर्यादेत लाभ देण्यात आला आहे. पुढील आठ दिवसांत चिरागशहा तलावातील गाळ काढण्यासाठी ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन त्यांनी शेतकऱ्यांना केले.
जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी प्रास्ताविकात जलेश्वर तलावातील गाळ काढल्यामुळे जलाशयाची पाणीपातळी वाढली असून, ३०९ पात्र शेतकऱ्यांना प्रती हेक्टरी ३५ हजार ७५० रुपयांच्या मर्यादेत अनुदान देण्यात येणार असल्याची माहिती दिली.
कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रातिनिधिक स्वरुपात दहा शेतकऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते अनुदानाचे वितरण करण्यात आले. यावेळी शेतकरी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मोबाईल वाहतूक नियम अंमलबजावणी प्रणाली कार्यान्वित

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ जानेवारी**
रस्ता सुरक्षेच्या दृष्टीने हिंगोली जिल्ह्यात उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, हिंगोली यांच्या वतीने मोबाईल वाहतूक नियम अंमलबजावणी प्रणाली (मोबाईल ट्रॅफिक एन्फोर्समेंट सिस्टिम) ही अत्याधुनिक कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित प्रणाली सुरू करण्यात आली आहे. या प्रणालीचे उद्घाटन आज जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात पार पडले.
यावेळी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल गावडे, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक अतुल बानापुरे, विकास नाईकवाडी, गजानन बंदुके, रमाकांत जोगेवार तसेच उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकारी- कर्मचारी उपस्थित होते. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित प्रणालीचा रस्त्यावर वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर स्वयंचलितपणे नजर ठेवण्यासाठी वापर करण्यात येणार आहे. एमएच ०४ एमएफ ४४३८ या क्रमांकाच्या वाहनावर ही प्रणाली बसविण्यात आली आहे.
या प्रणालीमध्ये उच्च दर्जाचे हाय रिझोल्युशन कॅमेरे, इन्फ्रारेड सेन्सर्स तसेच रडार प्रणाली बसविण्यात आली असून, त्यांच्या सहाय्याने रस्त्यावर होणाऱ्या वाहतूक नियमभंगाची अचूक नोंद घेतली जाणार आहे. इन्फ्रारेड सेन्सर्सच्या माध्यमातून हेल्मेट न घालता दुचाकी चालविणे, सीट बेल्ट न वापरणे तसेच तिहेरी प्रवास (ट्रिपल सीट) करणाऱ्या वाहनांची अचूक ओळख पटविली जाणार आहे.हाय रिझोल्युशन कॅमेऱ्यांद्वारे नियमभंग करणाऱ्या वाहनांचे स्पष्ट छायाचित्र, वाहन क्रमांक व घटना स्थळाची नोंद घेतली जाणार असून, ही माहिती पुरावा म्हणून वापरण्यात येणार आहे. तसेच रडार प्रणालीद्वारे वेगमर्यादा ओलांडणाऱ्या वाहनांचा वेग अचूकपणे मोजून अतिवेगातील वाहनांची नोंद घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार आहे.
या प्रणालीद्वारे संकलित सर्व माहिती क्लाऊड आधारित प्रणालीवर पाठविण्यात येणार असून, त्यानुसार ई-चलन प्रणालीद्वारे नियमभंग करणाऱ्या वाहनधारकांवर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. या आधुनिक तंत्रज्ञानामुळे मानवी हस्तक्षेप कमी होऊन पारदर्शक, अचूक व प्रभावी वाहतूक अंमलबजावणी शक्य होणार आहे. या प्रणालीच्या माध्यमातून हिंगोली जिल्ह्यात रस्ता सुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे निर्देश उप प्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल गावडे यांनी दिले.



**हिंगोली- जिल्ह्यात होणाऱ्या पोलिस पाटील भरती तसेच आपले सरकार सेवा केंद्र याबाबत जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली. ही प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक होणार असून उमेदवारांनी कोणत्याही आमिषाला बळी पडू नये असे आवाहन केले. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### कळमनुरी तालुक्यातील ८९ पोलिस पाटील पदांसाठी ५ जानेवारीला आरक्षण सोडत

हिंगोली-कळमनुरी येथील उपविभागीय दंडाधिकारी कार्यालयाच्या आस्थापनेवरील कळमनुरी तालुक्यातील ८९ गावांतील रिक्त असलेल्या पोलीस पाटील पदांची भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने पोलीस पाटील पदांच्या रिक्त ८९ पदांसाठी शासनाने निश्चित केलेल्या निकषानुसार गावनिहाय आरक्षण ठरविण्यासाठी आरक्षण सोडतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. ही आरक्षण सोडत प्रक्रिया सोमवार, दि. ५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता कळमनुरी उपविभागीय अधिकारी कार्यालयातील डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम सभागृहात पार पडणार आहे. या आरक्षण सोडतीच्या वेळी कळमनुरी तालुक्यातील सर्व संबंधित नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच, ज्या नागरिकांना या प्रक्रियेबाबत आक्षेप किंवा हरकती असतील, त्यांनी आपले लेखी स्वरूपातील आक्षेप दि. ६ ते ७ जानेवारी २०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत उपविभागीय दंडाधिकारी, कळमनुरी यांच्या समक्ष उपस्थित राहून सादर करावेत. विहित मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी, असे आवाहन उपविभागीय अधिकारी प्रतिक्षा भुते यांनी केले आहे.

### शामराव धोंगडे यांना साई जीवन गौरव पुरस्कार



औंढा नागनाथ- शिरड शहापूर येथील लोक कलावंत शामराव नारायणराव धोंगडे यांना गोंधळ जागरण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरीबद्दल दि १० जानेवारी २०२६ रोजी शिर्डी येथील ओम साई विकास प्रतिष्ठान बीबीसी फिल्म प्रॉडक्शनच्यावतीने राष्ट्रीय पातळीवरील साई जीवन गौरव समाज भूषण पुरस्कार जाहीर झाला असून मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात येणार आहे. त्यांच्या निवडीबद्दल जिल्ह्यातील सर्व लोक कलावंतांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

### काँग्रेसची कार्यकारणी जाहीर होणार- कांबळे

हिंगोली- जिल्ह्यात काँग्रेसला पुन्हा उभारी देण्यासाठी पक्षांतर्गत राजकीय हालचाली सुरू झाल्या असून लवकरच काँग्रेसची नूतन जिल्हा कार्यकारणी निवडली जाणार आहे. यामध्ये जिल्हा कार्यकारणी, तालुका कार्यकारणीमध्ये रिक्त असलेल्या पदांवर कार्यकर्त्यांच्या नियुक्त्या केल्या जाणार आहेत. तर वरिष्ठ पातळीवर नेत्यांचे दौरेही होणार आहेत. यावेळी पक्षाचे चांगले काम करणाऱ्या कार्यकर्त्यांवर संघटन मजबूत करण्याची जबाबदारी दिली जाणार आहे. मागील काळात काँग्रेसमधील नेत्यांच्या गटबाजीमुळे सामान्य काँग्रेस कार्यकर्ता बाजूला राहीला होता. परंतु आता गटबाजी करणारे नेतेच पक्षातून गेल्यामुळे काँग्रेस पक्षाला उभारी मिळेल अशी माहीती पक्ष निरीक्षक कांबळे यांनी दिली.

# स्थानिक गुन्हे शाखेची भरीव कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ जानेवारी**
सन २०२५ मध्ये स्थानिक गुन्हे शाखा, हिंगोली चे वतीने खुनाचे (०२) गुन्हे उघड करून (०४) आरोपींना अटक करण्यात आली. दरोडाचे (०२) गुन्हे उघड करून,रू.४४,४९,०० चा मुद्देमाल जप्त करून, (१२) आरोपींना अटक करण्यात आली आहे. जबरी चोरीचे (०५) गुन्हे उघड करून, रू.११,३२,००० चा मुद्देमाल जप्त करून, (१३) आरोपींना अटक करण्यात आली आहे. घरफोडीचे (२१) गुन्हे उघड करून, रू. १०,६६,३४० चा मुद्देमाल जप्त करून, (२०) आरोपींना अटक करण्यात आली आहे. चोरीचे एकुण (४५) गुन्हे उघड करून, रू.५९,८३,३४० चा मुद्देमाल जप्त करून, (५७) आरोपींना अटक करण्यात आली आहे. फसवणुकीचे (०७) गुन्हे उघड करून, रू.१४,९१,००० चा मुद्देमाल जप्त करून, (०९) आरोपींना अटक करण्यात आली आहे. दरोडा टाकण्याचे तयारीत असलेले गुन्हेगारांच्या वेळीच मुचक्या अवळुन त्यांचेविरूध्द (०२) गुन्हे दाखल करून, रू.२,७३,११० चा मुद्देमाल जप्त करून, (०९) आरोपींना अटक करण्यात आले आहे.
सन २०२५ मध्ये स्था.गु.शा. हिंगोली चे वतीनेएकुण (८५) गंभीर स्वरूपाचे गुन्हे उघड करून त्यामध्ये रू. १,४३,९४,७९० रू चा मुद्देमाल हस्तगत करून (१२५) आरोपींना अटक करण्यात आली आहे.
तसेच स्था.गु.शा. हिंगोली चे वतीने इतर जिल्हयातील दरोडा, जबरी चोरी, घरफोडी, बँक फोडी, कार चोरी, मोटार सायकल चोरी सारखे गंभीर स्वरूपाचे एकुण (०८) गुन्हे उघड केले आहे. तसेच एम.पी.डी.ए. कायदया अंतर्गत (०३) इसमांना स्थानबध्द करण्यात आले असुन, कलम ५५ महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये एकुण (२९) प्रकरणांमध्ये (९२) इसमांना हिंगोली जिल्हयातुन तडीपार करण्यात आले. यामध्ये हिंगोली जिल्हयातील अवैध वाळु वाहतुक करणारे, अवैध्द दारूविकी करणारे, अवैध्दरीत्या जुगार, मटका चालवीणारे व अवैध व्यवसाय करणारे एकुण (२६) प्रकरणांमध्ये (७२) इसमांना हिंगोली जिल्हयातुन तडीपार करण्यात आले आहे.
सदरची कार्यवाह पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मोहन भोसले, सपोनि शिवसांब घेवारे, पोउपनि माधव जिव्हारे, पोउपनि दिलीप मोरे व सर्व स्थानिक गुन्हे शाखेचे व सायबर चे पोलीस अंमलदार यांच्या पथकाने केली आहे.

# कर सहाय्यकास २० हजारांची लाच घेतांना एसीबीकडून अटक

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ जानेवारी**
सेनगाव येथीक कृषी सेवा केंद्राला लावण्यात आलेल्या ४३ हजार ९०४ रूपयांचा व्यवसाय कर व दंड माफ करण्यासाठी २० हजारांची लाच घेतांना लाचलूचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने गुरूवारी रंगेहाथ पकडले. याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार सेनगाव येथील कृषी सेवा केंद्र व मशिनरी विक्रीच्या दुकान मालकाने सदर व्यवसायासाठी जीएसटी क्रमांक आवश्यक असल्याने दि ८ सप्टेंबर २०२५ रोजी ऑनलाईन अर्ज केला होता. त्यानंतर त्यांना दि १० ऑक्टोबर रोजी व्यवसाय कर अधिकारी राऊत यांनी नोटीस काढली. त्यामध्ये दि १९ डिसेंबर २०१७ ते दि ३१ मार्च २०२५ या कालावधीतील व्यवसाय कर व त्यावरील दंड व्याज असे ४३ हजार ९०४ रूपये भरण्याचे नमुद करण्यात आले होते. सदर नोटीस घेऊन कर सहाय्यक उमेश सरकटे हा दि २९ डिसेंबर रोजी सेनगाव येथील दुकानावर गेला होता. मात्र त्याची भेट झाली नाही. त्यानंतर सरकटे याने संबंधित तक्रारदारांना नोटीस रद्द करतो तसेच कर, व्याज, दंड भरायचा नसेल तर तडजोड करावी लागेल असे मोबाईलवरून संपर्क करून सांगितले.
याप्रकरणी तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात तक्रार दाखल केली. पडताळणीनंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने दि १ जानेवारी रोजी वस्तू व सेवा कर कार्यालयाच्या बाहेर सापळा रचला. ठरल्याप्रमाणे कर सहाय्यक उमेश सरकटे याने तक्रारदाराकडून २० हजार रूपयांची लाच स्विकारताच पथकाने त्याला लाच घेतांना रंगेहाथ पकडले. सदरील कामगिरी लाचलुचपतचे उपाधिक्षक विकास घनवट, पोलिस निरीक्षक राजेश मलपिल्लू, सपोनि शेख युनूस, जमादार भगवान मंडलीक, राजाराम फुफाटे, गजानन पवार, शिवाजी वाघ, विजय शुक्ला, विनोद पुंडगे, रवींद्र वर्णे, शेख अकबर यांच्या पथकाने बजावली आहे. कर सहाय्यक उमेश सरकटे याला ताब्यात घेऊन शहर पोलिस ठाण्यात आणल्यानंतर त्याच्यावर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# विद्यादान, रक्तदान हे श्रेष्ठदान- अ‍ॅड सतीश देशमुख



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ जानेवारी**
हिंगोली येथील शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन वर्षानिमित्त व श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सेवानिवृत जिल्हा शिक्षणाधिकारी शिवाजीराव पवार यांच्या वाढदिवसाच्या औचित्य साधून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते यावेळी
जीवनात दानाचे महत्व अनन्य साधारण महत्व असून एखादा वाढदिवस साजरा करताना रक्तदान, विद्यादान, अन्नदानाचे पुण्य पदरी पडणे यासारखे अन्य कुठलेही श्रेष्ठदान नाही असे प्रतिपादन बार कॉन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा चे सदस्य अ‍ॅड. सतीश देशमुख यांनी काढले. हिंगोली येथील शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन वर्षानिमित्त व श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सेवानिवृत जिल्हा शिक्षणाधिकारी शिवाजीराव पवार यांच्या वाढदिवसाच्या औचित्य साधून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलतांना अ‍ॅड देशमुख म्हणाले की, मागील २५ वर्षापासून हजारो विद्यार्थ्यांचं शैक्षणिक भविष्य घडत जावून आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी हे देश विदेशात नावलौकिक प्राप्त करत आहेत.
यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेच्या अध्यक्षा सौ मंदाताई पवार, पत्रकार डॉ. विजय निलावार, कोषाध्यक्ष डॉ.प्रल्हाद शिंदे, प्रभारी प्राचार्य डॉ. रामदास मुक्टे, प्रा.सौ मेघा फडणवीस उपस्थित होते. यावेळी २५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्तदात्यांचा प्रमुख मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. रक्त संकलनासाठी रक्त संक्रमण अधिकारी संदीप सोळुंके, स्वप्निल दिपके, प्रयोगशाळा तंत्रज्ञ विजय दुरुगे, परिचर संतोष पोटे, डॉ. पल्लवी चव्हाण, डॉ. विद्या लोंढे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामदास मुक्टे यांनी केले, सूत्रसंचालन प्रा. धाराशिव शिराळे तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. किशोर इंगोले यांनी केले. कार्यक्रमला शिक्षक, प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पवार पब्लीक स्कूलमध्ये आनंद नगरीचे आयोजन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ जानेवारी**
पवार पब्लिक स्कूलमध्ये शिवाजीराव पवार यांचा वाढदिवस सर्व विद्यार्थ्यांसोबत साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त शाळेत आनंद नगरीचे आयोजन करण्यात आले होते. मुलांनी आनंद नगरी मधे मोठ्या संखेने सहभाग घेतला होता. मुलांनी बाहेरील पदार्थ आरोग्याला हानिकारक असणारे जसे की फास्ट फूड न खाता घरगुती पौष्टिक पदार्थ खावे आणि खरेदी विक्री करून त्यांना व्यवहार करण्याच्या पद्धती कळव्यात हा संदेश आनंद नगरी मधून देण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष सौ मंदाताई पवार, मेघा फडणीर्स, प्रीती पवार तसेच यावेळी शाळेचे संचालक प्रणव पवार, कोमल अग्रवाल, सचिन धामणे,सॉली केसी, जॉबीन जॉर्ज यांच्यासह शिक्षिका, शिक्षक उपस्थित होते.

# मनपा निवडणूकीच्या रिंगणात ४९१ उमेदवार

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २ जानेवारी-**

नांदेड वाघाळा शहर महानगपालिकेच्या निवडणुकीसाठी आज अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी ३७६ उमेदवारांनी माघार घेतली असून, ४९१ उमेदवार आता निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेसाठी एकूण ८६७ उमेदवार वैध ठरले होते. यापैकी आज अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत ३७६ उमेदवारांनी माघार घेतली आहे.यात निवडणूक निर्णय अधिकारी क्र.१ मधून ५८ उमेदवारांनी माघार घेतली तर ८९ उमेदवार रिंगणात आहेत. त्याचप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी क्र.२ मधून ६३ उमेदवारांनी माघार घेतली.त्याठिकाणी ६८ उमेदवार रिंगणात आहेत.निवडणूक निर्णय अधिकारी क्र.३ मधून ७६, क्र.४ मधून ३२, क्र.५ मधून ६०, क्र.६ मधून ५२ तर क्र.७ मधून ३५ उमेदवारांनी माघार घेतली आहे. तर निवडणूक निर्णय अधिकारी क्र.३ मधून ६३, क्र.४ मधून ६७, क्र.५ मधून ८५, क्र.६ मधून ६४ तर क्र.७ मधून ५५ उमेदवार रिंगणात असल्याची माहिती नांदेड मनपा जनसंपर्क अधिकाऱ्यांनी दिली आहे.

# सागी वृक्षाची विना परवाना तोड तर तब्बल दहा दिवसानंतर कारवाई करण्याचा फार्स

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. २ जानेवारी-**

इस्लापूर वनपरिक्षेत्र कार्यालय अंतर्गत मूळझरा येथील शेत सर्वे नंबर २९ मधून गेल्या आठ ते दहा दिवसांपूर्वी तब्बल १७ सागवानी वृक्षाची वन विभागाची परवानगी न घेताच बेसुमार रित्या तोड करण्यात आली. याप्रकरणी वनविभागाची कुठलीही परवानगी ही नसताना या वृक्षाची तोड करण्यात आली. असल्याची धक्कादायक माहिती आज वन विभागाकडूनच उजेडात येत आहे.



कुणाच्याही शेतातील मालकी पट्ट्यातील सागवान वृक्षाची तोड करायची असेल तर त्या शेतकऱ्यांना प्रथमता इस्लापूर वनपरिक्षेत्र कार्यालयाकडे वृक्षतोड करण्यासंदर्भात परवानगी मागावी लागते त्यानंतर नांदेड उपप्रादेशिक विभागामार्फत त्या शेतकऱ्याला तोडीची परवानगी मिळते या संपूर्ण कारवाईस किमान तीन ते चार महिने लागतात. विशेषतः ही गंभीर बाब असून या प्रकरणाची माहिती वनविभागाला आठ दिवसापूर्वीच मिळाली होती. पण वन विभागाच्या स्थानिक च्या कर्मचाऱ्यांनी व वनपालांनी या संदर्भात कुठलेही पावले उचलली नाहीत. त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांनी सतरा सागवानी वृक्षाची विनापरवाना तोंड केली. ही बाब मूळझरा येथील वन्यप्रेमी मंडळी कडून उघडकीस आल्यानंतर इस्लापूर वन विभागाच्या वनपाल आणि व स्थानिक च्या वनरक्षकांनी शेतकऱ्याला महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियम १९६४ अंतर्गत नोटीस बजावून लेखी खुलासा सादर करण्यास कळविले. शेतकऱ्यांनी अवैद्यरित्या वृक्षतोड केल्याचे मान्य करून नियमानुसार दंड भरण्यास तयार असल्याचे कळविले आहे. पण या प्रकरणांमध्ये वन विभागाने सदरील शेतकऱ्याचे नाव उघड करण्यास कमालीची गोपनीयता पाळली. या मागचे गोड बंगाल काय? हे एक वन विभागाच्या अधिकाऱ्यास न उमजणारे कोडेच म्हणावे लागेल? तरीपण वनविभागाचे अधिकारी म्हणतात. आम्ही वृक्षतोड अधिनियम १९६४ च्या कायद्यानुसार सदरील शेतकऱ्याला ८५००/-( अक्षरी आठ हजार पाचशे रुपये ) इतका दंड आकारून रक्कम शासन जमा केला. पण सदरील सागवानाची वृक्षतोड होण्याअगोदर या ठिकाणच्या वनपाल व कर्मचाऱ्यांनी त्या शेतकऱ्याला का रोखले नाही हा सुद्धा प्रश्न अनुत्तरितच आहे? सदरील प्रकरणी साडेआठ हजार रुपये दंड आकारून आम्ही कारवाई पूर्ण केली असल्याचा केविलवाणा प्रयत्न वन विभागाने चालवला व आपली पाठ थोपटून घेण्याचा प्रयत्न केला असल्याचे पुन्हा एकदा दाखवून दिले हे म्हणणे वावगे ठरणार नाही. याप्रकरणी डोळे झाक करणाऱ्या कर्मचाऱ्यावर वन विभाग काय कारवाई करणार याकडे आता या भागातील वन्यप्रेमी मंडळीची लक्ष लागले आहे. सदरील प्रकरणातील दोषी कर्मचारी विरुद्ध निलंबनाची कारवाई करावी अशा स्वरूपाची मागणी सुद्धा या निमित्ताने पुढे येत आहे



## देगलूरमध्ये भंगार दुकानाला भीषण आग; नागरिकांच्या सतर्कतेमुळे अनर्थ टळला

**देगलूर** -देगलूर शहरातील मदनूर रोडवरील रफाई गार्डन परिसरात आज सायंकाळी साडेचारच्या दरम्यान एका भंगाराच्या दुकानाला अचानक आग लागल्याची घटना घडली. या आगीत दुकानात साठवलेले भंगार साहित्य व विविध साधने मोठ्या प्रमाणात जळून खाक झाली. मात्र, स्थानिक नागरिकांची तत्परता आणि नगरपरिषदेच्या फायर ब्रिगेड विभागाच्या जलद कारवाईमुळे मोठा अनर्थ टळला. आग नेमकी कशामुळे लागली याचे स्पष्ट कारण अद्याप समजू शकले नसले तरी ही आग अचानक भडकल्याचे सांगण्यात येते. भंगार साहित्य ज्वलनशील असल्याने आग वेगाने पसरत होती. त्यामुळे आजूबाजूच्या परिसरातील दुकाने, घरे व नागरिकांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होण्याची शक्यता होती. मात्र, वेळीच आग विझवण्यात आल्याने परिसरात आग पसरण्याची भीती पूर्णतः टळली. घटनेची माहिती मिळताच नगरपरिषदेच्या फायर ब्रिगेडच्या जवानांनी तत्काळ घटनास्थळी दाखल होऊन शर्थीचे प्रयत्न करत आग आटोक्यात आणली. स्थानिक नागरिकांनीही साधने व आवश्यक मदत पुरवून बचावकार्याला हातभार लावला. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसल्याचे सांगण्यात येते, ही दिलासादायक बाब आहे. स्थानिक नागरिकांची जागरूकता आणि नगरपरिषदेच्या फायर ब्रिगेड विभागाची सतर्कता यामुळेच मोठी दुर्घटना टळली असून त्यांच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# AI युगातही शिक्षकांची भूमिका अढळ: अविनाश धर्माधिकारी

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. २ जानेवारी-**

AI च्या काळात तंत्रज्ञानाचा वापर न करणारा शिक्षक कालबाह्य ठरू शकतो; मात्र चारित्र्यवान विद्यार्थी घडविण्याचे कार्य कोणतेही तंत्रज्ञान करू शकत नाही. हे सामर्थ्य केवळ शिक्षक व मुख्याध्यापकांकडेच आहे, असे प्रतिपादन माजी सनदी अधिकारी व शिक्षणतज्ज्ञ अविनाश धर्माधिकारी यांनी केले.



संस्कृती संवर्धन मंडळ, सगरोळी यांच्या वतीने कर्मयोगी बाबासाहेब देशमुख यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित राज्यस्तरीय मुख्याध्यापक अधिवेशनाच्या उद्घाटनप्रसंगी त्यांनी अभासी पद्धतीने उपस्थित मुख्याध्यापकांशी संवाद साधला. शिक्षण म्हणजे फक्त माहिती नव्हे, तर माणूस घडविण्याची प्रक्रिया असून हेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे मुख्य सूत्र असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विषयावर प्रभुत्व, सतत अद्ययावत ज्ञान, विद्यार्थ्यांना आनंदातून शिकविण्याची कला, संशोधनाची वृत्ती व प्रेमभाव या पंचसूत्रांवर शिक्षकांची ओळख ठरते, असे सांगत त्यांनी भारतीय संस्कृतीत शिक्षकांचे स्थान अढळ व अजरामर असल्याचे अधोरेखित केले. काळ बदलला, तंत्रज्ञान बदलले तरी शिक्षकांची गरज कधीही संपणार नाही, असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात संस्थेचे चेअरमन प्रमोद देशमुख यांनी मुख्याध्यापक हा शाळेचा कणा असल्याचे नमूद करत, शाळा व्यवस्थापनात त्यांना अधिक स्वातंत्र्य मिळावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. संचालक रोहित देशमुख यांनी संस्थेच्या शैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली. या अधिवेशनाला मराठवाडा, विदर्भ व पश्चिम महाराष्ट्रातील दोनशेहून अधिक मुख्याध्यापक उपस्थित होते.

यावेळी व्यासपीठावर गटशिक्षणाधिकारी बालाजी पाटील, अरविंद देशमुख, संजीव सगरोळीकर, संभाजी गायकवाड, केशव शिंदे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

# सिडको भागात ५५ उमेदवार रिंगणात

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २ जानेवारी-**

नांदेड जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी दिनांक २ जानेवारी रोजी निवडणूक कार्यालय सिडको येथे प्रभाग क्रमांक १९ व २० मधून एकूण ९० उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आली होती. त्यापैकी ३५ जणांनी माघार घेतली असून निवडणूक रिंगणामध्ये दोन्ही प्रभागातून एकुन ५५ उमेदवार निवडणूक लढवणार आहेत. अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी स्वाती दाभाडे यांनी दिली.

सिडको हडको नवीन नांदेड भागातील प्रभाग क्रमांक १९ वसरणी कौठा येथुन मनपा निवडणूक लढवण्यासाठी एकूण ४८ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी आज दिनांक २ जानेवारी रोजी मागे घेण्याच्या प्रक्रिये नंतर १७ उमेदवारांनी आपली उमेदवारी अर्ज मागे घेतल्या असून ३१ उमेदवार निवडणूक लढवण्यास रिंगणात उतरले आहेत.तर सिडको भागातील प्रभाग क्रमांक २० मधून पाच उमेदवारांसाठी एकूण ४२ उमेदवारांनी अर्ज दाखल करून घेण्यात आले होते. दिनांक २ जानेवारी रोजी अर्ज मागे घेण्याच्या प्रक्रियेमधून १८ उमेदवारांनी अर्ज मागे घेतला असून २४ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. अशाप्रकारे १९ व २० या दोन्ही प्रभागातून नऊ जागांसाठी ५५ उमेदवार आपले नशीब आजमावणार आहेत

तेव्हा अपक्ष उमेदवारांना दिनांक ३ जानेवारी रोजी चिन्ह वाटप होणार आसुन त्यानंतर निवडणुकीच्या प्रचार रणधुमाळी सुरू होईल. प्रभाग क्रमांक १९ वसरणी कौठा मधुन भारतीय जनता पार्टीचे अनुसूचित जाती प्रवर्गातून अभिषेक सौदे, अनुसूचित जमाती दिपाली संतोष मोरे,ना.मा.प्र. महिला प्रवर्गातून सुलोचना धोंडीबा काकडे, सर्वसाधारण महिला अनुराधा राजू काळे हे आपले नशीब आजमत आहेत. तर सिडको भागातील प्रभाग क्रमांक २० मधून भारतीय जनता पार्टीचे अनुसूचित जाती महिला प्रवर्गातून निरंजना राजू लांडगे,ना.मा.प्र. महिला प्रवर्गातून मंगला गजानन देशमुख, ना्.मा.प्र.पुरुष प्रवर्गातून वैजनाथ ईश्वरराव देशमुख, सर्वसाधारण महिले सुवर्णा सतीश बसवदे, सर्वसाधारण पुरुष संजय शिवाजीराव पाटील घोगरे हे आपले नशीब आजमावत आहेत. या दोन प्रभागांमध्ये अटीतटीच्या सामन्यात शिवसेना शिंदे गट आणि भारतीय जनता पार्टी त्यांच्या काट्याची टक्कर होताना दिसून येईल. तर या ठिकाणी काँग्रेस पक्षाचे उमेदवार एकही नसल्याने बायलेट मशीनवर काँग्रेस निशाणीही दिसून येणार नाही हे चित्र स्पष्ट दिसून येते वरील पक्षश्रेष्ठीच्या युतीच्या वादातून काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांना एबी फॉर्म मिळालेला नाही. यावरून उमेदवारांमध्ये व जनतेमध्ये काँग्रेस पक्षश्रेष्ठी बाबत उलट सुलट चर्चेला उदान आले आहे.

## श्वेता ठाकूर यांना पीएच.डी. प्रदान

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २ जानेवारी-**



येथील ग्यान माता विद्याविहार शाळेच्या शारीरिक शिक्षिका सौ. श्वेता जयपाल ठाकूर यांना नुकतीच पीएच. डी. प्रदान करण्यात आली. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने त्यांना 'शारिरीक शिक्षण' (रोल ऑफ इन्टेसिव्ह युसेज ऑफ मोबाईल विथ सोशल मीडिया इन हेल्थ रिलेटेड फिजिकल फिटनेस अँड ॲकॅडेमिक परफॉर्मन्स अमॉग द हायर सेकंडरी स्टुडंट्स) या विषयात संशोधन पूर्ण केल्याबद्दल ही पदवी बहाल केली. सौ. श्वेता ठाकूर यांना शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विठ्ठलसिंह परिहार यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# वाळू चोरी करून नेणारे दोन ट्रॅक्टर पकडले; १२ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. २ जानेवारी-**

माहूर तालुक्याला वळसा घालून वाहणाऱ्या पैनगंगा नदी पात्रातील पाच वाळू घाटांचा लिलाव झाला आहे आणि काही दिवसांतच तेथून वाळू उपलब्ध होणार आहे. असे असतानाही वाळू तस्कर रात्रीला अंधाराचा फायदा घेऊन वाळु चोरी करण्याचा प्रयत्न करत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून वसराम नाईक तांडा शिवारातील दोन ट्रॅक्टर धारक नदीपात्रातून वाळू चोरुन आणत असल्याची माहिती मिळाल्याने तहसीलदार अभिजीत जगताप यांनी सदरील ठिकाणी वाहन जाण्यासाठी रस्ता नसल्याने चक्क एक किलोमीटर धावत जाऊन पाठलाग करत ट्रॅक्टर पकडल्याची धाडसी कारवाईची घटना शुक्रवार दि. ०२ जानेवारी रोजी दुपारी ०१वाजताच्या सुमारास घडली असून जवळपास दहा ते बारा लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

माहूर तालुक्यातील अतिदुर्गम भागात असलेल्या वसराम नाईक तांडा ते पैंनगंगा नदी पात्रादरम्यान रस्त्यावर विना नंबरचे दोन ट्रॅक्टर नदीपात्रातून ट्रॅक्टर मध्ये वाळू भरून आणत असल्याची माहिती मिळाल्यावरुन तहसीलदार अभिजित जगताप यांनी सिंदखेडचे सपोनी रमेश जाधवर यांना दूरध्वनी वरून याबाबत माहिती देऊन मंडळ अधिकारी, तलाठी आणि पोलिसांच्या संयुक्त पथकासह या रस्त्यावर अचानकपणे गेले असता काही शेतकऱ्यांनी रस्त्यात पाणी सोडून दिले तर अरुंद रस्ता असल्याने तहसीलचे वाहन मुख्य रस्त्यावर थांबवावे लागले. परंतु तहसीलदारांनी पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या ट्रॅक्टरला पकडण्यासाठी चक्क एक किलोमीटर पर्यंत धावत जाऊन पाठलाग करत दोन्ही ट्रॅक्टरला पकडून तहसील कार्यालयात आणून जमा केले.

या धाडसी कारवाईत तहसीलदार अभिजीत जगताप यांचेसह सिंदखेड सपोनि रमेश जाधवर,ग्राम महसूल अधिकारी साहेबराव गावंडे, मनोहर शेळके, सी.पी. बाबर, सुनील वनवे, दयानंद एरडलावार, अभिजीत कुडमेते, महसूल सेवक सागर हिवाळे, पवन पाटील, विवेक नागपुरे, चालक विलास शेडमाके यांचेसह कर्मचारी सहभागी होते.

## जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांवर सकारात्मक चर्चा

**नांदेड** -जिल्हा परिषद अंतर्गत वर्ग-३ व वर्ग-४ संवर्गातील विविध कर्मचारी संघटनांच्या प्रलंबित मागण्यांच्या अनुषंगाने गुरुवार दिनांक १ जानेवारी रोजी जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या उपस्थितीत बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले, सामान्य प्रशासन विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, उप मुख्य कार्यकारी अधिकारी डी.बी. गिरी, अमित राठोड, प्रशांत थोरात, मयूर आंदेलवाड, मुख्य लेखा व वित्त अधिकारी शिवप्रसाद चन्ना, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. प्रवीणकुमार घुले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, प्राथमिक शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता राहुल रावसाहेब, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता संजय शिंदे, कृषी विकास अधिकारी डॉ. नीलकुमार ऐतवडे, समाजकल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. विभागीय आयुक्त कार्यालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सामान्य प्रशासन विभागातर्फे आयोजित या बैठकीत कर्मचारी संघटनांच्या प्रलंबित मागण्यांवर सविस्तर व सकारात्मक चर्चा करण्यात आली. यावेळी जिल्हा परिषद लिपिक वर्गीय कर्मचारी संघटना, कास्ट्राईब कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी संघटना, शासकीय व निमशासकीय वाहन चालक संघटना, परिचर संघटना, ग्रामपंचायत अधिकारी संघटना, तांत्रिक ग्रामपंचायत कर्मचारी संघटना, सेवा निवृत्त कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद आरोग्य सेवा संघटना, अभियंता संघटना आदी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीत पाणीपुरवठा विभागातील मागील तीन महिन्यांचे रखडलेले वेतन, नव्याने रुजू झालेल्या कनिष्ठ लिपिकांना जॉब चार्टनुसार काम देणे, शासन निर्णयानुसार १२ महिन्यांच्या पदोन्नती निवडी पूर्ण करणे, सेवा ज्येष्ठता यादीतील त्रुटी तपासून आक्षेप मागवणे व याद्या सुरळीत करणे, डीसीपीएस सन २०१६ ते २०१८ मधील प्रलंबित रक्कमा जमा करून डीसीपीएस स्लिप देणे, वर्ग-४ कर्मचाऱ्यांना गणवेश व धुलाई भत्ता देणे, कंत्राटी ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचे मानधन वेळेत अदा करणे यासह विविध मागण्या व अडचणी मांडण्यात आल्या. सर्व मागण्यांचा सखोल अभ्यास करून नियमांच्या चौकटीत योग्य निर्णय घेण्यात येतील, असे आश्वासन मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी यावेळी दिले.

## प्रा.डॉ.संग्राम आंदे यांना पंडित जवाहरलाल नेहरू नॅशनल अवार्ड पुरस्कार जाहीर

**मुखेड**-महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागातील प्रा.डॉ. संग्राम आदे,यांना शहीद भगतसिंग आयकॉन अवार्ड २००२५ चा पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्यात येणार असल्याचे सूत्राकडून माहिती मिळाली आहे. निती आयोग भारत सरकार तर्फे हा पुरस्कार नवी दिल्ली या ठिकाणी वितरित करण्यात येणार असल्याचं समजते त्यांच्या शैक्षणि आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात येणार आहे आतापर्यंत त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झाले असून त्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अडकिने, तसेच एस बी. गोणे, प्राचार्य मस्के सर, प्रा.आहेर सर, इत्यादींनी त्यांचे कौतुक व अभिनंदन केले आहे.



## नांदेड शहरात जड वाहनांना प्रवेशबंदी

**नांदेड**- जड वाहनामुळे नांदेड शहरात वाहतुक कोंडी, अपघात अशा समस्या उद्भवत आहेत. या अनुषंगाने नांदेड शहरात ७ जानेवारी २०२६ पासून जड वाहनांना सकाळी ५ ते रात्री १० वाजेपर्यंत प्रवेशबंदी राहणार आहे. याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे. याबाबत अधिसुचना निर्गमीत करण्यात आली असून या अधिसुचनेचा अंमल ७ जानेवारी २०२६ पासुन सुरु होईल.

# हिमायतनगर येथील नडवा पुलाचे काम निकृष्ट



**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. २ जानेवारी-**

हिमायतनगर गावातील सर्वात मोठा व महत्वाचा नडवा पूल सध्या गंभीर वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. या पुलाचे काम रेतीऐवजी डस्टचा वापर करण्यात येत असल्याचे दिसते. नियमानुसार आवश्यक असलेल्या लोखंडी सळ्यांऐवजी ८ एमी व १० एमी गजांचा वापर केला जात तसेच क्युरींगसाठी पाण्याचा वापर कमी प्रमाणात केला जात असल्याचे निदर्शनास आले आहे. हे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याचा आरोप पुलानजिक शेतकरी व गावकऱ्यांनी केला आहे.

हा पूल गावासाठी जीवनवाहिनी मानला जातो. मात्र अशा प्रकारचे हलगर्जी व दर्जाहीन काम भविष्यात मोठ्या दुर्घटनेला आमंत्रण देणारे ठरू शकते. तरीही या गंभीर बाबीकडे प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या कामाची देखरेख करणारे अभियंता कानिदे व संबंधित अधिकाऱ्यांचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करणारी पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे. सदर कामाची तांत्रिक चौकशी तात्काळ करण्यात यावी, तसेच निकृष्ट काम करणाऱ्या ठेकेदारावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

नडव्यापासून ते सिरपल्ली पर्यंत प्रधानमंत्री सडक योजनेचे कामही अत्यंत संत गतीनें व निकृष्ट पद्धतीने केल्या गेले. त्यामुळे अल्पावधीतच तो रस्ता मातीत मिसळून गेला आहे. अशाच प्रकारचे काम या नडव्याच्या पुलाचे होत असल्याने या रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या विविध शाळेचे विद्यार्थी नागरिक व शेतकरी वर्गातुन ठेकेदाराच्या मनमानी कारभाराबाबात नाराजी व्यक्त केली जात असून, अंदाजपत्रक प्रमाणे दर्जेदार पद्धतीने काम करून पुलाची उंची वाढविण्यात यावी अन्यथा या विरोधात नागरिक शेतकरी आंदोलनाच्या पावित्र्यात आहेत.

# श्रद्धा आणि सबुरीचा संदेश देत देगलूर-शिर्डी २२५ भाविकांची पदयात्रा उत्साहात रवाना

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. २ जानेवारी-**

साईबाबांच्या श्रद्धा आणि सबुरी या अमूल्य संदेशाचा जागर करत मागील तब्बल १७ वर्षांपासून अविरत सुरू असलेली देगलूर ते शिर्डी भाविकांची पदयात्रा यंदाही मोठ्या भक्तिभाव व उत्साहात देगलूर येथून रवाना झाली. सन २००९ पासून सुरू असलेल्या या पवित्र पदयात्रेत यावर्षी २२५ भाविक पदयात्री सहभागी झाले असून महाराष्ट्रासह कर्नाटक व तेलंगणा या राज्यांतूनही साईभक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.



ही पदयात्रा दरवर्षी १ जानेवारी रोजी देगलूर येथून प्रस्थान करते. सलग पायी प्रवास करत भाविक १४ जानेवारी, मकरसंक्रांतीच्या दिवशी शिर्डी येथे साईबाबांना तिळगुळ अर्पण करून आपली श्रद्धा व्यक्त करतात, अशी माहिती भाविकांनी दिली. दिवसेंदिवस या पदयात्रेत भाविकांचा सहभाग वाढत असून, ही दिंडी साईभक्तांसाठी आस्था, संयम आणि सेवाभावाचे प्रतीक ठरत आहे. पदयात्रेच्या प्रारंभी देगलूर येथे भव्य आरती, भजन-कीर्तन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. साई रामच्या जयघोषात संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला. साईबाबांच्या चरणी सेवा करण्याच्या पवित्र भावनेतून ही पदयात्रा शिस्तबद्ध व नियोजनबद्ध पद्धतीने शिर्डीकडे मार्गस्थ झाली.

या शुभप्रसंगी देगलूर शहरातील विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, तसेच सामाजिक, धार्मिक व सार्वजनिक क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून या दिंडीचे दर्शन घेत भाविकांना शुभेच्छा दिल्या. गेल्या १७ वर्षांपासून सातत्याने सुरू असलेली ही पदयात्रा सामाजिक सलोखा, भक्ती आणि श्रद्धेचा आदर्श निर्माण करत आहे. साईबाबांच्या कृपेने सर्व पदयात्री सुखरूपपणे शिर्डी गाठून दर्शन घेऊन परत यावेत, अशी सामूहिक भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# नूतन नगराध्यक्ष शरद पवार यांचा विश्वकर्मा पांचाळ समाजाच्या वतीने सत्कार

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. २ जानेवारी-**

सकल विश्वकर्मा पांचाळ समाज बांधवांच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सरकारला उत्तर देताना नवनिर्वाचित नगराध्यक्ष शरद पवार म्हणाले, पुढील काळात शहरातील सर्व कामे नाली, साफसफाई, रस्ते, वीज, पाणी, शहरात स्वच्छतागृह बांधण्यात येईल तसेच घरकुलाची रखडलेले कामे तात्काळ मार्गी लावण्यात येणार आहे. शहरातील जनतेने



दाखवून दिलेला विश्वासाला तडा जावू देणार नसल्याचा निर्वाळा पवार यांनी केला. आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली लोहा शहराचा कायापालट करू विश्वकर्मा मंदिरासाठी जागा उपलब्ध असेल तर सभामंडपासाठी आ. चिखलीकर यांच्या मार्फत निधी उपलब्ध करून देऊ. यावेळी प्रभू श्री विश्वकर्मा समाजातील ज्येष्ठ हभप आत्माराम महाराज रामेज्वार, विठ्ठल पांचाळ, पत्रकार शिवाजी पांचाळ, दिलीप पांचाळ, वीरेंद्र पांचाळ, दिगंबर पांचाळ मंगरूळकर,देवानंद पांचाळ, स्वप्नील पांचाळ, केशव पांचाळ फळेकर, माधव पांचाळ, विनोद पांचाळ, संतोष पांचाळ सुनेगावकर, गोपाळ पांचाळ सह बहुसंख्येची उपस्थिती होती.

### जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येले की, अर्जदार श्री. शिवाजी मारोती जाधव वय ४५ रा.जय भवानी नगर, असर्जन ता. जि.नांदेड मो.नं. ९७६३७४१३३१ या कार्यालयात त्यांचे मुलाचे जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणेकरीता मागणी केली आहे.

जन्म झालेल्याचे नाव सचिन शिवाजी जाधव वय १५ रा. जय भवानी नगर, असर्जन ता.जि.नांदेड सदर व्यक्तीचा राहते घर, जय भवानी नगर, असर्जन ता. जि. नांदेड या ठिकाणी दिनांक २६.१०.२०१० या दिवशी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणेकरीता आदेश होणेसाठी सदर कार्यालयात दिनांक २३.१२.२०२५ रोजी तहसिल कार्यालय नांदेड येथे अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या तहसिल कार्यालय नांदेड येथे सादर करावा, दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक २६.१२.२०२५
स्थळ -नांदेड

तहसिलदार नांदेड करिता